# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : २६** **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मंजूर विकास योजना, अहमदनगर (मुळ हद्द) (दुसरी सुधारीत) शासनाच्या सामाजिक कल्याण विभागाच्या मालकीच्या मौजे, सावेडी स.नं.२३१/ब/२अ, २३२/१अ, २३३/अ व २३४ ।/१अ क्षेत्र १ हेक्टर या समाईक जागेतुन प्रस्तावित केलेला १८.०० मी.रुंदीचा पुर्व-पश्चिम रस्ता वगळणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम ३७ अन्वये फेरबदलाची वैधनिक कार्यवाही करणे बाबत...

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.श्री.रामदास आठवले,केंद्रीयमंत्री, सामाजिक न्याय विभाग, भारत सरकार यांचे दिनांक ०१/०८/२०१७ रोजी प्राप्त झालेले पत्र.

२) शासनाच्या नगरविकास विभागाचे पत्र क्र.टीपीएस१११७/५०६ दिनांक २६/०७/२०१७

३) समाज कल्याण विभागाचे पत्र क्र.२१०३ दिनांक २२/०६/२०१७.

४) श्री.अशोक गायकवाड,राज्य सचिव -प्रवक्ते,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र दिनांक ०४/०८/२०१७

५) या कार्यालयाचा प्रस्ताव क्रमांक ५८५० दिनांक ०३/१०/२०१८

६) नगरसचिव यांचेकडील पत्र क्रमांक ३२८ दिनांक २१/१२/२०१९

७) मा.विधानसभा सदस्य लहु कानडे, श्रीरामपुर, यांचे पत्र प्राप्त दिनांक १७/०२/२०२१

८) सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, अहमदनगर, यांचेकडील पत्र ७८० दिनांक २५/०२/२०२१ प्राप्त दिनांक ०२/०३/२०२१.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने या विभागाचा अहवाल व पुर्वपिठीका खालील प्रमाणे सादर करीत आहे.

१) शासनाच्या समाज कल्याण विभागाने सन २००८ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन बांधकामासाठी एस.टी.महामंडळाकडुन सावेडी स.नं.२३२/१अ, २३३/अ व २३४ ।/१अ मधील क्षेत्र १ हेक्टर इतकी जागा खरेदी केलेली होती. सदर जागा ही सावेडी एस.टी.स्टॅण्डच्या (पश्चिमेकडील) मागील बाजुची होती. त्यामुळे सदर जागेसाठी एस.टी.महामंडळाच्या जागेतुन १२.०० मी.रुंद रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला होता. तथापि सदर जागा अहमदनगर शहराच्या मंजुर विकास योजनेत वाहतुक विभागात (TRANSPORTATION ZONE) दर्शविलेली असल्याने त्यावेळेस महानगरपालिका सदर जागेत या बांधकामास परवानगी देवू शकली नाही.

२) वर नमुद हडचणीमुळे समाज कल्याण विभागाने सदर जागा वाहतुक विभागातुन वगळणेसाठी महानगरपालिकेस अर्ज केला होता व त्या अनुषंगाने महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ अन्वये विभाग बदल करणे बाबत प्रस्ताव तयार केला होता.

३) सदर प्रस्तावात विषयांकित जागा नगर-मनमाड रस्त्याच्या आतील बाजुस असल्याने त्या जागेस रस्त्याची योग्य ती सन्मुखता मिळणेसाठी महानगरपालिकेने वर नमुद १२.०० मी. ऐवजी १८.०० मी रुंदीचा

इंग्रजी एल आकाराचा रस्ता समाईक हद्दीत प्रस्तावित केलेला होता. सदर प्रस्तावास शासनाने मंजुरी दिलेली आहे.

४) मध्यंतरीच्या काळात समाज कल्याण विभागाने सावेडी एस.टी.स्टॅण्डच्या मागील बाजुच्या (पश्चिम बाजु) जागे ऐवजी नगर-मनमाड रस्त्यासन्मुख असलेली एस.टी.महामंडळाची सदर स.नं.मधील १.०० हेक्टर इतकी जागा बदलुन घेतली. त्यामुळे वर नमुद १८.०० मी.रुंद रस्त्याची समाज कल्याण विभागास आवश्यकता उरली नाही.

५) शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक १४/०६/२०१७ रोजी सदर जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर ससामाजिक न्यायभवनाचे बांधकाम करणेस ना-हरकत मिळणे बाबत प्रस्ताव महानगरपालिके कडे सादर केला होता. या प्रस्तावास वर नमुद १८.०० मी.रुंदीचा समाईक रस्ता दर्शवुन विहीत मुदतीत मंजुरी देण्यात आलेली आहे. या मंजुरीत विषयांकित सामाजिक न्याय भवन इमारत दक्षिणेस ९.०० मी हलविणे बाबत अट नमुद करुन मंजुरी दिलेली आहे.

तथापि विकास योजनेतील १८.०० मी.रुंद रस्ता या जागेच्या समाईक हद्दीमधुन जात असल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवनाच्या बांधकामाच्या नियोजनास बाधा येत आहे. असे मत समाजकल्याण विभागाने व्यक्त करुन हा रस्ता रद्द करणे बाबत संदर्भीय पत्रान्वये मागणी केलेली आहे.

तसेच मा.ना.श्री.रामदास आठवले, केंद्रीय मंत्री, सामाजिक न्याय विभाग, भारत सरकार, यांनी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवनाच्या बांधकामाच्या नियोजनास बाधा येत असल्याने सदर रस्ता वगळणे बाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पत्र दिलेले आहे. व सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाच्या नगरविकास विभागाने संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये प्रस्तुत प्रकरणी स्वयंस्पष्ट अहवाल सादर करणे बाबत कळविलेले आहे.

सबब समाज कल्याण विभागाच्या विषयांकित जागेतुन जाणारा प्रस्तावित १८.०० मी. रुंद पुर्व-पश्चिम विकास योजना रस्ता वगळणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ अन्वये वैधानिक कार्यवाही पुर्ण अहमदनगर महानगरपालिकेने पुर्ण केलेली असुन, सदर विकास योजनेतील १८.०० मी. रुंद रस्ता वगळणे बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणे कामी निर्णयासाठी मा.महासभेपुढे सादर करण्यांत आलेला होता. तथापि सदर बाबत ९० दिवसाच्या आत निर्णय न झाल्याने नगरसचिव अहमदनगर महानगरपालिका यांनी सदर प्रस्ताव जा.क्र. ३२८ दि.२१/१२/२०१९ अन्वये परत या कार्यालयाकडे पाठविलेला आहे.

उपरोक्त विकास योजनेतील १८.०० मी.रुंद रस्ता वगळणे बाबत मा.विधान सभा सदस्य लहु कानडे, श्रीरामपुर व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, अहमदनगर यांनी अनक्रमे संदर्भ क्रं. ७ व ८ अन्वये कळविलेले आहे.

सबब विषयांकित मंजुर विकास योजनेतील रस्ता वगळणे बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणे बाबत पुढील निर्णयासाठी मा.महासभेपुढे सादर करणे योग्य होईल. असे मत आहे.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :**

**मा.महापौर साहेब :** सभा सुरु करा.

**मा.श्रीमती.चितळे :** मुलीच्या लग्नाचे वय 21 केले.त्या बद्दल मा.पंतप्रधान मोदी साहेबांचे आभार. महिलांसाठी शक्ती कायदा लावला त्याबद्दल मा.मुख्यमंत्री साहेब यांचे आभार

**मा.बाबासाहेब वाकळे :** हा विषय घेण्यामागचा हेतू काय

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** ऑफिस रिपोर्ट वाचा.

**मा.बाबासाहेब वाकळे :** रस्ता वगळण्या मागील उद्देश काय आहे.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :** 16 मे, 2015 मध्ये मुळ डी.पी. नव्हता 16 मे, 2015 ला शासनाने ट्रक टर्मिनेस मंजूरकरतांना शासनाने रस्ता दर्शविला आहे. एस.टी.महामंडळाची जागा 9 मीटर व ट्रक टर्मिनन्स च्या जागेतून 9 मीटर रस्ता गेला. मनमाड रोड व लिंक रोडला जोडणारा हा रस्ता आहे. एस.टी.महामंडळा कडुन समाजकल्याण विभागाने जागा खरेदी केली आहे. वापर मंजूर झाल्यानंतर सामाजीक न्याय विभागाचे काम सुरु झाल्यानंतर सामाजिक संघटना, रिपब्लीकन पार्टी या संघटनेमार्फत हा रस्ता वगळणेबाबत मागंणी केली आहे . वगळणे हा पार्ट नाही 18 मीटर ऐवजी 9 मीटर रस्ता करायचा आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** हा रस्ता विकसीत झालेला नाही. 9 मीटर रस्ता विकसीत झालेला नाही. कुठेही रस्ता विकसीत झालेला नाही तेथे रहिवासी आहेत. कमी का असेना पण रस्ता राहू द्या जागेवर रस्ता अजिबात नाही.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :** WBM रोड विकसीत झालेला आहे. देवांग कोष्टी समाजाच्या मागे रस्ता विकसीत झाला आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** 9 मीटर रस्ताच अस्तीत्वात नाही .

**मा.श्री.गणेश कवडे :** 12 मीटर विकसीत केला तर चालेल.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :** गट नकाशात 18 मीटर रस्ता आहे डिस्ट्रीक्ट कमर्शिअल सेंटर विकसीत करतांना जागा हस्तांतरण केली आहे.

**मा.श्री.गणेश कवडे :** लोकांची गैरसोय झाली नाही पाहिजे. 12 मीटर करावा.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :** आपल्याच मालकीची जागा आहे 9 मीटर रस्त्यावर कमर्शिअलची कामे होणार नाही.

**मा.श्री.शाम नळकांडे :** 12 मीटर केला तर पुढची गैरसोय टाळली जाईल.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** या ठिकाणी सर्व पक्षाच्या नगरसेवकांनी समक्ष पाहणी करावी.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 18 मीटर रस्ता वगळण्या संदर्भात विषय घेतला आहे. सामाजिक न्याय विभागाची जागा 1 हेक्टर आहे. शासनाची जागा आहे. आजुबाजुला जे शेतकरी असतील उद्या त्यांना ले आऊट करायचा असेल तर तेथे उद्याच्या काळात गाड्या लागल्या तर 12 मीटर केला तरी जायला यायला रस्ता राहील का. 12 मीटर करणे कितपत योग्य आहे. उद्याच्या

काळात रस्ताही कमी केला तर त्रास होणार नाही का. महापौर जे रुलिंग देतील ते मान्य करु. नगर शहर झपाट्याने वाढत आहे. सावेडी परिसरात वाढ होत आहे. 2017 साली याचा आपण ठराव केला आहे. शासनाकडे पाठवला शासनाचे काय उत्तर आले.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :** हरकती मागवून सुनावणी घेण्यात आली आहे.
आता जो सभा निर्णय घेईल तो शासनाकडे जाईल मागचा ठराव गेलेला नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :** माझे मत  9 मीटर किंवा 12 मीटर योग्य आहेत शेजारचे उद्या कोर्टात गेले तर अडचणीचे ठरणार नाही का.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :** शेजारी जर कोर्टात गेले तर अडचणीचे ठरेल. आयुक्त साहेब या ठिकाणी आहेत योग्य तो निर्णय घ्यावा. शेजारच्या शेतक-यांची बाजू ते जर कोर्टात गेले तर स्ट्रॉंग होईल. या सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा असे माझे ठाम मत आहे.

**मा.महापौर साहेब :** आता विषय स्थगीत ठेवण्यांत येत आहे. प्रत्यक्ष पाहणी करुन पुढच्या सभेत विषय घेवू. पुढचा विषय घ्या.

**मा.श्री.गणेश कवडे :** 26 नंबरचा विषय तहकुब करण्यापेक्षा प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी कर व त्या ठिकाणी निर्णय घेवू. विषय तहकूब करु नका.

**मा.श्री.संपत बारस्कर :** ऑक्झीलियम शाळेच्या संस्थेस 100 वर्षे पूर्ण होत आहेत. या शाळेतून अनेक विद्यार्थी मोठया पदावर गेले आहेत. त्यामुळे नगर-मनमाड हायवे ते ऑक्झीलियम शाळा ते पाईप लाईन रोड पर्यंतच्या रस्त्यास ऑक्झीलियम कॉन्व्हेंट रोड असे नांव देण्यांत यावे.

**मा.महापौर साहेब :** ठिक आहे.पहाणी करुन निर्णय घेउ.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेली साधक बाधक चर्चा पाहता मंजूर विकास योजना, अहमदनगर (मुळ हद्द) (दुसरी सुधारीत) शासनाच्या सामाजिक कल्याण विभागाच्या मालकीच्या मौजे, सावेडी स.नं. 231/ब/2अ, 232/1अ, 233 /अ, व 234 ा/1अ क्षेत्र 1 हेक्टर या सामाईक जागेतुन प्रस्तावित केलेला 18.00 मी रुंदीचा पुर्व - पश्चिम रस्ता न वगळता सदर ठिकाणी नागरिकांच्या रहदारीकरीता किंवा जा-ये करण्यासाठी 12.00 मीटरचा रस्ता ठेवून उर्वरीत रस्ता वगळणे बाबत महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम 37 अन्वये फेरबदलाची वैधनिक कार्यवाही करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

मा.विरोधीपक्षनेते श्री.संपत बारस्कर यांनी दिलेल्या पत्रानुसार नगर- मनमाड हायवे ते

ऑक्झीलियम शाळा ते पाईप लाईन रोडपर्यंतच्या रस्त्यास **"ऑक्झीलियम कॉन्व्हेंट रोड"** असे नामकरण करणेसही सभा मान्यता देत आहे. सदर बाबत संबंधित विभागाने पुढील कार्यालयीन कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

**सुचक -** मा.श्री.शाम किसन नळकांडे

**अनुमोदक -** मा.श्री.गणेश खंडेराव कवडे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : २७ दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** सावेडी स.नं.१०४ अ पैकी, या जागेच्या मंजुर रेखांकनातील मधिल खुली जागा क्षेत्र ११७४.८७ चौ.मी. या जागेवर सांस्कृतीक भवन विकसित करणेसाठी सिंध हिंद सेवा मंडल चॅरीटेबल ट्रस्ट यांना परवानगी देणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- सेक्रेटरी सिंध हिंद सेवा मंडल चॅरीटेबल ट्रस्ट यांचा दि.१५/०४/२०२१ रोजीचा अर्ज

विषयांकित प्रकरणी संदर्भीय अर्जान्वये सिंध हिंद सेवा मंडल चॅरीटेबल ट्रस्ट यांनी सावेडी स.नं.१०४अ, या जागेच्या मंजुर रेखांकनातील मधील खुली जागा क्षेत्र ११७४.८७ चौ.मी.या जागेवर सांस्कृतीक भवन विकसित करणेसाठी परवानगी मिळणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाचे अभिप्राय खालील प्रमाणे सादर करीत आहे.

१) विषयांकित सावेडी स.नं.१०४ अ पैकी या जमिनीच्या मंजुर रेखांकनातील खुली जागा क्षेत्र ११७४.८७ चौ.मी.इतकी आहे.

२) सदर खुली जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे. (सोबत सात-बारा उतारा जोडलेला आहे.)

३) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक ०२ डिसेंबर २०२० रोजीच्या अधिसूचनेव्दारे अहमदनगर महानगरपालिकेसाठी एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर व लागु केलेली आहे. सदरहु नियमावलीतील नियम क्र.३.४.२ मध्ये खालील तरतुदी समाविष्ट आहेत.

१) On sanction of the devolopmission, ercreational open space shall deem to have vested in the society/association of the residents/occipants. In case such society or association is to be formed, the possession/cistody of recreational open space shall remain with the Commissioner until sucg association/society is formed. In case of group housing scheme, if the developrt/ owner intend to develop such open space for bonfide ise of resident, then the Commissioner may allow the same while granting the development permission. The recreational open space shall not be dold/ leased out to any other

person and it shalll not be put to any other user except for the common use of residents/occupants.

२) If the Municipal Commissioner is convinced that there is misise of open space: in such case the Municipal Commissioner shall take over the land of recreational open space.

३) उक्त नियमावलीतील नियम क्र.३.४.७ नुसार मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत सांस्कृतीक भवन हा वापर अनुज्ञेय आहे.

म्हणजेच मंजुर रेखांकनातील खुली जागा ही त्याच रेखांकनातील भुखंड धारकांसाठी असुन ती इतर कोणासही विक्रीने अथवा भाड्याने देता येणार नाही. तसेच ती त्याच रेखांकनातील भुखंडधारकांच्या सामाईक वापरासाठीच ठेवणे आवश्यक आहे.

सबब खालील अटींच्या अधिन राहुन अहमदनगर सावेडी स.नं.१०४ अ पैकी जमिनीच्या मंजुर रेखांकनातील खुली जागा (क्षेत्र ११७४.८७ चौ.मी.) सांस्कृतीक भवन या वापरासाठी खालील अटींवर विकसित करणस परवानगी देण्यास हरकत नाही.

अटी :- १) प्रचलित विकास नियंत्रण नियमावली नुसार खुल्या भुखंडाच्या क्षेत्राच्या १५ टक्के इतके बांधकाम अनुज्ञंय आहे. तथापि ते तळमजला १० टक्के व पहिला मजला ५ टक्के या प्रमाणे बांधता येईल परंतु सदर बांधकाम करणेपुर्वी त्यास महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. ही परवानगी संस्थेच्या नावाने मिळणार नाही. ही परवानगी फक्त भुखंडधारकांच्या नावे व सर्व भुखंडधारकांची स्वाक्षरी/संमती नकाशावर घेतल्या नंतर देण्यांत येईल.

२) सदर जागेचा वापर रेखांकनातील भुखंडधारकांच्या समाईक वापरासाठी करणे आवश्यक आहे. तीचा कोणत्याही वाणिज्य प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.

३) सदर जागेचा नियमबाह्य अथवा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर दिलेली विकसन परवानगी रद्द करुन खुली जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यांत येईल.

४) रेखांकनातील भुखंडधारकांनी हरकत घेतल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.

वर नमुद अटींवर अर्जदार संस्थेस मंजुर रेखांकनातील खुली जागा सांस्कृतीक भवन या सार्वजनिक वापरासाठी विकसित करणेसाठी परवानगी देणे बाबतचा प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी मा.महासभेपुढे सादर करणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

चर्चा :

**मा.श्री.अनिल शिंदे** : ऑफिस रिपोर्ट मंजूर करा.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे** : या विषयात महानगरपालिकेला फायदा काय त्याचे डीटेल्स द्या. आपल्याला भाडे देणार का. सांस्कृतिक भवन विकसीत करणेसाठी सिंध हिंद संवा मडल चॅरीटेबल ट्रस्ट यांना जागा देणार आहोत. उत्पन्नाचे साधन करुन तुम्ही जर पैसे कमवले तर?

**इंजिनियर श्री.बल्लाळ :** रोटरी क्लबला जी जागा देणार त्या जागेचे नियमाप्रमाणे भाडे ते देणार आहे. नियमाप्रमाणे भाडे घ्यावे लागणार त्रिसदस्य समिती जे भाडे ठरवणार ते घ्यावे लागेल.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** 22 नंबर 21 डिसेंबर, 2021 ला प्रस्ताव नगरसचिव विभागाने परत निकाली न काढलेले किती प्रस्ताव परत पाठविले याची माहिती द्यावी.

**नगरसचिव श्री.तडवी :** नगरसचिव विभागाकडे प्रस्ताव सादर होतात 90 दिवसाच्या आत पिठासीन अधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करतो त्यावर जर निर्णय झाला नाही तर 90 दिवसानंतर परत संबंधित विभागाकडे प्रस्ताव पाठवून देतो. यादी मागवून माहिती देतो.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** याची जबाबदारी निश्चीत करा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** किती विषय पाठवले याबाबत नगरसचिव माहिती दिली दोन दिवसात लेखी माहिती द्यावी. याबाबत नगरसचिवांना आदेश देतो.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** आर. क्र .300 विकसीत करण्यासाठी मी कागदपत्र मागीतले आहे. अजुन माहिती दिली नाही. नगररचना विभागानी माहिती दिली नाही. नगररचनाची माहिती का दिली नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** दोन दिवसात माहिती देतो.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** आत्ताच माहिती द्या युडीसीपीआर मध्ये जेवढया बांधकाम परवानगी दिली याची माहिती देत नाही. प्रभागातर्फे साधे चेंबर रिपेअर होत नाही. आमच्यावरच अन्याय का आयुक्त साहेबांवर कारवाई करा. त्यांची मुक संमती दिसते आहे.असा माझा आरोप आहे.

**मा.श्री.अशोक बडे :** सन्माननीय नगरसेवक किरकोळ मुद्दे मांडतात ते सुध्दा कामे होत नाही.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** सभेतच आम्हाला प्रश्न विचारायला संधी मिळते.

**मा.श्री.अशोक बडे :** प्रशासन काम करीत नाही.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** हे अधिकारी 3 वर्षे काढुन गोळा करुन निघुन जातात असा माझा स्पष्ट आरोप आहे. मागच्या वेळेस फेज-2 वर कनेक्शन शिफ्ट करतांना कोणतेही दर आकारु नये असे महापौर यांनी आदेश दिलेले असतांना आयुक्तांनी असे करता येणार नाही असे आदेश दिले. ठेकेदाराच्या घशात घालायचे का.

**मा.आयुक्त साहेब :** आपलयाला माहित आहे फेज-2 चे सगळया लोकांनी कनेक्शन ऑलरेडी घेतले दर वगैरे पॉलिसी घेवून ठरवले ते कमी कसे करणार एका भागासाठी एक न्याय व दुस-या साठी दुस-यासाठी वेगळा न्याय असे करता येणार नाही.दर रद्द करायचे असा सभागृहात निर्णय झालेला नाही. ज्या लोकांनी पैसे भरले मग त्यांचे पैसे परत करायचे का व्याज आकारायचे नाही. जे कनेक्शन बेकायदेशीर घेतले त्यावर काय निर्णय घ्यायचे ते ठरवा.

**मा.महापौर साहेब :** व्याज आकारु नका असा विषय झाला.

**मा.श्री.अनिल शिंदे :** जे अनधिकृत कनेक्शन असतील त्यांच्यावर फौजदारी कारवाई करायचे असा निर्णय मागच्या सभेत झाला आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** तसा ठराव घ्यावा लागेल असे कमी होणार नाही.

**मा.श्री.योगीराज गाडे :** नविन कनेक्शन घ्या असे अवाहन कचरा गाडीवर अलौसिंग करा.

**मा.आयुक्त साहेब :**आम्ही फेज-2 च्या लाइनवर नविन कनेक़्शन घेणेबाबत जाहीर आवाहन पेपरमध्ये दिले. अलौसिंग केले. नोव्हेंबर पर्यंत अधिकृत साठी संधी देवू माझी पॉलिसी ठरवतो. पण 30 नोव्हेंबर पर्यंत नागापुर ,बोल्हेगाव वॉर्डातील लोकांना नळ कनेक़्शन साठी आवाहन केले पण लोकांनी अजुन रिसपॉन्स दिला नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :** भालेराव हा कर्मचारी नागरिकांना नळ कनेक्शन साठी पैसे मागतो. आपले कर्मचारी यांना सांगा सरंजाम शाही बंद करा. आपले कर्मचारी त्रास देतात. फिल्डवर येत नाही. मी यापुर्वी पत्र दिले ज्यावेळेस बांधकाम परवानगी देतो त्याचवेळेस पैसे भरुन घ्या. बिल्डर घर बांधून निघून जातो. व नंतर अडचणी येतात. बिल्डरने बांधलेल्या पुर्ण युनिटचे नळ कनेक्शनचे पैसे भरुन धेतल्याशिवाय परवानगी देवू नये बिल्डर कनेक्शन धेत नाही एखाद्या ठिकाणी 30 फ्लट आहेत त्यापैकी 10 फ्लट धारक कनेक्शन घेतात. माझे असे मत आहे सर्वांनी यात लक्ष घालून जेवढया फ्लटची बांधकाम परवानगी काढली तेवढे कनेक्शन घेतले की नाही हे पाहिले पाहिजे.

**मा.आयुक्त साहेब :** बांधकामासाठी पाणी लागणार असेल तर तो बांधकामासाठी घेतो. कुठलाही बिल्डर स्वतःच्या नावावर कनेक्शन घेणार नाही. प्लम्ब अडवला तर जाणून बुजून प्लम्ब अडवला असे म्हणेल फायनल कंम्प्लीशन देतो त्यावेळी देवू नये असे ठरवू शकतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :** बिल्डर विकुन मोकळे होतात.

**मा.आयुक्त साहेब :** एनओसी दिल्याशिवाय बिल्डर विकणार नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :** बोल्हेगाव, नागापुर भागात नव्याने वसाहती होत आहे. कित्येक ठिकाणी फेज-2 ची पाईपलाईन पडलेली नाही. ठेकेदार म्हणतो पाईप संपले. तोडमल हा

ठेकेदार कोव्हीड मध्ये वारला त्याची 3 लाख 62 हजार बाकी आहे. ती सुध्दा दिली नाही.ठेकेदार काम करायला तयार होत नाहीत त्यांची बिले लवकर दिले पाहिजे.

**नगरसचिव श्री.तडवी :** दोन तीन दिवसांपूर्वी चेक दिला आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** बिल्डरने बांधलेल्या प्रॉपर्टीना नळ कनेक्शन नविन भागात पाईपलाईन कशी टाकायची हे कायद्यात बसवून करा.

**मा.सौ.पुष्पा बोरुडे :** सर्व पदाधिका-यांना वाहन प्रतिपूर्ती मंजुर करावी. त्यांना नागरिकांपर्यंत पोहोचावे लागते.

**मा.श्री.कुमार वाकळे :** विषय क्रमांक 27 माहिती पाहीजे ती जागा कोठे आहे. एरिया कोठे आहे.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :** साईदिप हॉस्पीटल शेजारी विराज कॉलनीचे पालिकेच्या लेआउट मधला ओपन स्पेस आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** त्यांच्या हॉल मध्ये दुस-याला कार्यक्रम करता येईल का. अशी समाजाला जागा देता येते का ?

**इंजिनियर श्री.बल्लाळ :** यापुर्वी दिलेली आहे. पुर्वीचे ले आउट मध्ये जागा आपल्या मालकीच्या झालेल्या आहेत. 2020 च्या आगोदरच्या ले आउट मध्ये देता येईल. नंतरची मालकी ले आउट धारकाकडे जाते.

**मा.श्री.कुमार वाकळे :** जागा मागणीसाठी कोणती कागदपत्र देणे आवश्यक आहे. ले आउटची कॉपी व संख़्या काय अक्टीव्हीटी करतात ही कागदपत्र आवश्यक आहेत .

**आयुक्त साहेब :** विद्युत विभागाकडे आपण मागीतलेली एलईडीची माहिती मी द्यायला सांगीतले आहे जोशी होते त्यांना कोरोना झाला त्या विभागात आजून काम करायला अधिकारी नाही.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** संबंधित ठेकेदार आम्हाला पैसे मागतो.

**मा.आयुक्त साहेब :** वायर वगैरे द्यायचे काम महानगरपालिकेचे आहे फक्त फिक्चर तो लावणार आहे. 9500-10000 लाईट लावून झाले आहेत. जर लक्स मध्ये फरक दिसला तर दंडात्मक कारवाई 100 % करतो. पूर्वीच्या लक्स पेक्षा कमी जर लावले तर 100% कारवाई करतो. महानगरपालिकेचा 85% आस्थापना खर्च आहे तो कमी होत नाही तो पर्यंत नवीन पद भरती करता येणार नाही.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** इलेक्ट्रीक विभागात माणूस नाही तो बंद करुन टाका एमएसईबी कडे देवून टाका कोटयावधीची उधळपट्टी चालू आहे. आमचे छोटे छोटे कामे होत नाहीत.

**उपमहापौर श्री.गणेश भोसले :** आता पुढचा विषय घ्या आसिफ सुलतान यांनी

विचारलेल्या प्रश्नांची लेखी उत्तर देण्यांत येतील.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** पाणी पुरवठा अमृत योजनेचे जे काम पाहतात त्यांना बोलवा.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 27 नंबरचा जो विषय आहे 1174.87 चौ.मी. मध्ये 12643 होती तो प्लॉट देतो या ठिकाणी आत्तापर्यं ब-याचशा संस्थांनी मागणी केली त्यांना आपण ओपन स्पेस दिले आपण ले आउट मंजूर करतो.कोणी पहाणी करतो का त्या ठिकाणी . ओपन स्पेस 1 रुपया नाममात्र दराने जागा नावावर करतो.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** 2500 ओपन स्पेस पैकी 1200 ची नांव लागले आहे. जुन्या हद्दीतील ले आउट ट्रान्सफर झाले नाहीत. बाकीच्यांची प्रोसेस चालू आहे.

**मा.आयुक्त साहेब :** चेंबर झाकणा बाबत माहिती देतो. नव्याने बनवून घेतले प्रशासन काहीच करत नाही अशी भूमीका घेवू नये.

**मा.श्री.अनिल शिंदे :** चांगल्या लोकेशनच्या जागा आपण कोणाला देवून मोकळे होतो. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे कोणीतरी बघणार आहे कि नाही. कमिटी करा. सर्व्हे करा 5000 हजाराच्या पुढे भाव आहे त्या ठिकाणी कोणीतरी पाहते का. आपले हित पाहीले पाहिजे त्या ठिकाणी गाळे काढून उत्पन्न मिळू शकते. हे शहर उद्याच्या काळात बदलणार का नाही. मोक्याच्या ठिकाणी कॉम्प्लेक्स बांधुन मिळू शकते. सभागृहात जागा देवून मोकळे व्हायचे. आयुक्त साहेब तुम्ही  पाण्याचे काम चांगले केले आहे. आनंद नगर मध्ये 10-12 घरासाठी पाईपलाईन टाकायचे आहे त्याठिकाणचे ड्राईंग मध्ये तो भाग आहे. मग त्या ठिकाणचे पाईप कोठे गेले. रस्ते 3 त्याठिकाणी मंजूर झाले आहेत. पण ते करता येत नाही. एस्टीमेटमध्ये पाईप धरलेले आहेत मग ते उपलब्ध का होत नाही.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेत जे ड्राईगमध्ये धरले त्या ठिकाणी पाईप लाइन टाकण्यात आल्या आहेत. वाढीव भागात काही संदस्यांचे पत्र आल्यानंतर तांत्रिक मंजूरी घेवून त्या ठिकाणी पाईप लाईन टाकण्यांत येत आहे.अस्तित्वाच्या भागात 40 मीटर किंवा 80 मीटर राहिला आहे. हाच प्रकार आनंदनगर मध्ये आहे. तो राहुन गेला आहे. या प्लॅनमध्ये आहे त्याठिकाणी ठेकेदाराला टाकावेच लागणार वाढीव भागात पाईपलाईन ठेकेदार टाकू शकत नाही.

**मा.आयुक्त साहेब :** फेज-2 च्याबाबतीत पाहिले गेले तर 8 ते 10 वर्ष या योजनेचे काम चालु आहे मी पदभार घेतल्यानंतर वारंवार  आढावा घेवून पाणी पुरवठा योजना पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केला आहे. 800 ठिकाणी जॉईन्ट जोडून झाले आहेत. त्याठिकाणी जॉईन्ट जोडल्या शिवाय पाणी सोडू शकत नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :** फेज-2 अतिशय चांगले काम माझ्या वॉर्डात झाले. पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन नागरिकांनी घेतले, नविन ठिकाणी लाईन टाकणे आवश्यक आहे. त्या बाबतचा निर्णय घ्यावा. माझ्या प्रभागात 15 ते 20 फुट पाणी उडले आहे. तुमच्या सर्वांचे आभार.

**मा.आयुक्त साहेब :** गप्र काढायचे काम केले पाणी जोपर्यंत टाक्यातुन सोडत नाही ते 10-20% काम बाकी आहे,ते झाल्याशिवाय फेज-2 चालू करु शकत नाही याचा पुढचा टप्पा जी.एस. मधुन ESR मध्ये कसे भरायचे मी पाणी पुरवठा विभागाला आदेश दिले. पाणी कसे डायरेक्ट भरता येईल. याबाबत पाणी पुरवठा विभागास आदेश दिले. ज्या ठिकाणी नविन भाग वाढला स्वतत्र एस्टीमेट बनवावे लागेल. ठेकेदार काम करणार नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 25 वी घटना दुरुस्ती झाली त्यामध्ये शेवटच्या घटकापर्यत न्याय मिळाला पाहिजे.अशी तरतुद केलेली आहे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** उपनगरात काही ठिकाणी वस्ती वाढल्या त्या ठिकाणी नाही करता येणार. स्वतंत्र वेगळा निधी करावा लागेल. पाईपची लेंथ संपली आहे.

**उपमहापौर श्री.गणेश भोसले :** कुठे कुठे टाकायचे त्याचे पत्र घ्या व त्याचे एस्टीमेट बनवा.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 1300, 7/12 वर नांव लावायचे शिल्लक आहे ते किती दिवसात करणार श्री.पठाण यांनी काम केले 750 एकर जागा महानगरपालिकेच्या नावावर त्यांनी करुन दिली. आयुक्त साहेब यांनी ओपन स्पेसची पाहणी करावी काही ठिकाणी विट भट्टया झाल्या आहेत.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** पूर्ण यादी 8 दिवसात देतो.

**मा.श्री.अनिल शिंदे :** पुढच्या सभेपर्यंत द्या.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** अमृत योजने बाबत द्या

**इंजिनिअर सातपुते -** 2017 ला 107 कोटी वर्क ऑर्डर दिली. महापौर बाबासाहेब वाकळे यांच्या काळात 80% काम पूर्ण झाले जागा ताब्यात घेणे, कोर्टाची अडचण असणारी प्रकरणे, यात वेगवेगळे शेततळे होते, घरे होते विळदला टेस्टींग केली.

**मा.श्री.अनिल शिंदे :** वर्क ऑर्डर कोणाच्या काळात दिले. सुरेखा कदम यांच्या काळात काहीच काम झाले नाही का. त्यांचे नांव घ्याना.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** काम किती बाकी आहे.

**इंजिनियर श्री.सातपुते :** अमृत कार्यक्रमा अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेचे काम मे. शोनन इंजिनिअरींग प्रा.लि.पुणे मार्फत प्रगती पथावर आहे. सदर काम 88

टक्के पर्यत पूर्ण झालेले आहे. योजनेच्या अशुध्द पाणी गुरूत्ववाहिनीचे मुळाडम ते विळद जलशुध्दीकरण केंद्रा पर्यतचे काम सर्व अडथळे मनपा मार्फत दूर करण्यात येवून पूर्ण झालेले आहे. विळद जलशुध्दीकरण ते वसंतटेकडी पर्यत मार्गातील बहुतेक अडथळे मनपा मार्फत दूर करण्यात येवून 16050 मीटर लांबीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरित पाईप लाईन टाकण्याचे काम जागा उपलब्धतेनुसार प्रगतीपथावर आहे. तथापी उर्वरित लांबीपैकी सुमारे 825 मीटर लांबीचे काम पूर्ण करणे अदयाप अडथळयामुळे बाकी आहे. विळद जलशुध्दीकेद्राजवळ श्री रवि चव्हण यांचे जागेतील सुमारे 65 मीटर लांबीचे काम , कातोरे प्लॉट कार्यक्षेत्रात श्री कांडकर यांनी दोन ठिकाणच्या आरसीसी चेअर्स सह नाला क्रासिंगचे काम करण्यास विरोध दर्शविला आहे, श्री.गिते यांच्या मालकीच्या कार्यक्षेत्रातील किमान 250 मीटर लांबीच्या कामाबाबत  सहमती प्राप्त नाही, श्री.डोंगरे यांच्या मालकीच्या कार्यक्षेत्रातील 120 मीटर लांबीचे काम, औरंगाबाद बायपास जवळील खाजगी शोरूमच्या मालकी क्षेत्रातील 20 मीटर लांबीचे काम, श्री.शेळके यांच्या संत्राबाग हद्दीतील 200 मीटर लांबीचे काम करण्यास अदयाप सहमती प्राप्त झालेली नाही. सुखकर्ता कॉर्नर जवळ 80 मीटर लांबीचे काम कायम स्वरूपी बांधकामामुळे करता आले नाही. . खाजगी जागा मालकांनी विरोध दर्शविल्याने सदर काम प्रलंबित आहे.  1200 मीटर काम बाकी आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** 1200 राहीलच नाही कमी राहीले.

**इंजिनियर श्री.सातपुते :** डम ते विळद पर्यंत पूर्ण

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** विळद पाण्याची टाकी  पासून 22 मीटर काम शिल्लक आहे रवि सातपुते, चव्हाण जागेचा मोबदला मागतो.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** एखाद्याचा 7/12 नसेल तरी काम तुम्ही थांबवता थांबवू नका. चार वेळा मुदतवाढ दिली तुम्ही कामे मागे का ठेवता कोणाचा हितसंबंध आहे का. का शहराला वेठीस धरले जाते. आपली संस्था आहे आपण जागेवर का जात नाही.

**इंजिनियर श्री.सातपुते :** 1200 मीटर पै 600-700 मीटरचे काम बाकी आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** आपण किरकोळ प्रश्न सोडवत नाही. धरणात पाणी आहे तरी आम्हाला पाणी मिळत नाही. नागरीक असे प्रश्न विचारतात शहराला पाणी मिळत नाही सर्वाच्या वॉर्डातला प्रश्न आहे.

**इंजिनियर श्री.सातपुते :** जागे बाबत अडचण नाही.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** किती दिवसात पूर्ण होईल ते आयुक्त यांनी सांगावे 700 मीटरचे काम बाकी आहे. पीएमसी ते पंप हाउसवर मोटर धरली का.

**मा.आयुक्त साहेब :** योजनेमधला जो पंपाचा गप्र आहे. मंगळवारी मी प्रधान सचिवाकडे जाणार आहे.एस एल टी सी ची बॅाठ्क जर पुढच्या आठ ते दहा दिवसात लागली व मंजुरी मिळाली तर पंप येण्यासाठी दोन ते अडीच महिने लागतील.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** ट्रान्सफॉर्मर आहे का घेतला पाहीजे. केबल टाकली पाहीजे.

**मा.आयुक्त साहेब :** 1500 चा लोड आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** पीएमसी ला कळाले नाही का त्यांच्या ही बाब लक्षात यायला हवी होती. नविन पंप बसवावा लागेल. त्याठिकाणी ट्रान्सफार्मर, केबल बसवाव्या लागतील एवढया दिवसात पुर्तता व्हायला पाहिजे होती.

**मा.आयुक्त साहेब :** एस एल टी सी ची मिटींग झाल्यानंतर मंजुरी मिळाल्यानंतर पंपाची ऑर्डर दिल्या नंतर मक्झीमम एप्रिल पर्यंत पाणी येईल

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** यात जे कोणी इंजिनियर दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करा.

**इंजिनियर श्री.सातपुते :** पाईप पुरवठा झाल्यानंतर 20 ते 22 दिवसात पाईप टाकुन देवू.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** तुम्ही स्वतः उभे राहुन काम करुन घ्या

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** एक महिन्यात 600-700 मीटर पाईपलाईन टाकुन झाली पाहीजे नाहीतर तुम्हाला जबाबदार धरु.

प्रतिनिधी SLTC मंजूर झाल्यानंतर अडीच तीन महिन्यात पंप येतील. 10 दिवसात बसवू.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** 3 महिन्यात पाणी येईल अशी सभागृहात माहिती द्या.

**मा.आयुक्त साहेब :** SLTC च्या मंजूरीनंतर तीन महिन्यात पाणी येईल. आपल्याला माहिती आहे. किलोस्करचे पंप चांगले आहेत. SLTC ची मंजूरीनंतर शासन 4-5 कोटी देणार आहेत. त्यामुळे काम थांबवले आहे. विळद मुळा डम्र, वसंतटेकडी वर मीटर बसविले जाणार आहेत. कोणीही पाहू शकतो. पाणी कीती वाढले. डिस्ट्रीब्युशन मधल्या चुका सुधारल्या शिवाय सर्वांना पाणी मिळणार नाही यासाठी कनेक्शन घेणे गरजेचे आहे. दोन्ही लाईन काही ठिकाणी चालू आहे. राजकीय विरोध घेवून मी आगरकर मळयात मी एक लाईन बंद केली.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** 15 दिवसात याबाबत बैठक घ्या. अडचणी असल्यास त्यावर निर्णय घेण्यात यावा.

**मा.सौ.बारस्कर :** नगरसेवक स्वेच्छा निधी कशृ केला त्याबाबत माहिती द्या. कशृफंड नसेल ठेकेदार काम करत नाही.

**श्री.अनिल लोंढे :** 2021-2022 या आर्थीक वर्षात माननीय नगरसेवक स्वेच्छा निधी रोख स्वरुपात देण्यात येईल. असा निर्णय घेण्यात आला होता  परंतु प्रशासनाकडून याबाबत आर्थिक परिस्थिती पाहून निर्णय घेण्यांत येईल.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** नगरसेवक स्वेच्छा निधीतील ठेकेदाराचे पैसे द्या.बाकी सगळे स्टॉप करा.

**अकौंटट श्री.तडवी :** हो.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** यावर्षी नगरसेवक स्वेच्छा निधी रोख वाटणार का.

**मा.महापौर साहेब :** नगरसेवक स्वेच्छा निधीतील देयके देण्याबाबत कार्यवाही करु.

**मा.श्री.अनिल शिंदे :** स्वेच्छा निधी अंतर्गत बारस्कर ताईंनी प्रश्न उपस्थित केला मागील सभेत ठराव केलेला आहे. एक कोटी 85 लाख मुद्रांक शुल्काचे पैसे आले ते काय केले. तुम्ही म्हणता पैसे नाही. मग आम्हाला पैसे द्या. आपल्यावर काय कोणाचे कर्ज  आहे का. 55 कोटी ठेवी आहेत. मुद्रांक शुल्कातुन द्यायला सांगा.

**उपायुक्त श्री.डांगे साहेब :** 6 कोटी लाईट बील द्यायचे बाकी आहे.

**मा.आयुक्त साहेब :** 2 कोटी पाणी बील द्यायचे.

मालमत्ता कर  45 कोटी वसुल केले.

**मा.श्री.अनिल शिंदे :** नगरसेवक स्वेच्छा निधी रोख़ होण्याबाबत  ठराव करा. लाईट बील वगैरे देवू नका.

**मा.श्री.सचिन शिंदे :** दोन तीन उपायुक्त आहेत. त्यांच्याकडे वसुलीची जबाबदारी द्या.

**उपायुक्त श्री.डांगे साहेब :** 13 कोटी रुपये स्थायी खर्च आहे. तो द्यावाच लागणार आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** उत्पन्नाकडे लक्ष देणार नाही का. तुमची जबाबदारी नाही का घरपट्टी व पाणीपट्टी वसूल करण्याची.

**उपायुक्त श्री.डांगे साहेब :** दरवर्षी घरपट्टी व पाणीपट्टी मिळून 50 कोटी वसूल होतात. यावर्षी मार्च 2022 पर्यंत 70 कोटी वसूल करणार आहोत.

**मा.श्री.अनिल शिंदे :** सौ.स्मिता झगडे मॅडम उपायुक्त होत्या त्यांनी एका वर्षात 85 कोटी वसूल केले.

**मा.आयुक्त साहेब :**आता पर्यंत  हायस्ट 59 कोटी आहे. कारवाई सुरु केली तर आम्हाला फोन यायला लागले आम्हीच दिसतो का.

**मा.श्री.अनिल शिंदे :** सरकारी कामात अडथळा आणला तर कारवाई करा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** कालपरवा पेपरला आले भाउगर्दीच्या भांडणामध्ये कोटी अडकले तीन भाउ  असतील तर त्यांचे नावे समान घरपट्टी  टाका. जो त्याचे

हिश्शाची घरपट्टी भरायला तयार असेल त्याचे भरुन घ्या समान हिस्से करुन भरुन घ्या. भावांच्या भांडणात महानगरपालिकेसे पैसे अडकले आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे** :आयुक्त साहेबांनी अमृतचे चांगले काम केले त्याबद्दल आपले अभिनंदन. मी सन 2003 पासून नगरसेवक आहे. तुम्ही जसा पाणी प्रश्न सोडवला तसे डांगे साहेब राउत साहेब यांना कामाला लावा. आला दिवस असा चालला कामावर यायचे टायमिंग ठेवा. 12 ला यायचे 6 वाजता घरी जायचे.

**मा.महापौर साहेब** : विषय क्रमांक 27 ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. सावेडी स.नं.१०४ अ पैकी, या जागेच्या मंजुर रेखांकनातील मधिल खुली जागा क्षेत्र ११७४.८७ चौ.मी. या जागेवर सांस्कृतीक भवन विकसित करणेसाठी सिंध हिंद सेवा मंडल चॅरीटेबल ट्रस्ट यांना सांस्कृतिक भवन विकसीत करणेसाठी जागा देणेस ही सभा मान्यता देत आहे. नगररचना विभागाने जागा देणेबाबतच्या कार्यालयीन सोपस्कार पार पाडणेबाबतची योग्य ती कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**सुचक -** मा.श्री.अविनाश हरीभाउ घुले

**अनुमोदक -** मा.श्री.गणेश खंडेराव कवडे

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : २८** **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती ब्रांज पुतळा प्रोफेसर कॉलनी चौक येथील न. र. यो. क. अंतिम भुखंड क्र.129 महानगरपालिकेच्या जागेत बसविणे बाबत...

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : 1] मा.महासाभा प्रस्ताव क्रमांक 2 दिनांक 21/07/2007

2] मा.स्थायी समीती सभा क्र. 16 ठराव क्रमांक 03 दिनांक16/08/2008

3] स्टोअर विभाग जा.क्र.4284 दि.17/03/2008 अन्वये क्ले.मॉडेल तयार करणे बाबत.

4] अप्पर जिल्हाधिकारी यांचे पत्र जा क्र 73 दिनांक 13/4/2018 चे पत्र.

5] कला संचलनालय, महाराष्ट्र राज्य , कला शाळा आवार, मुंबई यांचे पत्र.

6] मा. स्थायी समिती सभा क्रमांक-9 विषय क्र.-2 दि. 11/08/2008

7] सामान्य प्रशासन विभाग , महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पुतळा 3116/प्र.क्र. 308/ 29 दि. 2 मे 2017

8] मा. पोलिस अधिकक्षक अहमदनगर यांना नाहरकत मिळणेबाबत पत्र दि.19/06/2020

9] मा. पोलिस अधिरक्षक अहमदनगर यांचे दि. 03/07/2020 चे पत्र.

10] मा. जिल्हाधिकारी यांना जा क्र 531 दि. 28/08/2020 पत्र.

11] मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचे दि. 04/09/2020अन्वये पत्र.

12] आस्थापना विभाग जा क्र 2705 दि. 13/08/2021 चा आदेश

13] आस्थापना विभाग जा क्र 2724 दि. 17/08/2021 चा आदेश

उपरोक्त सर्व संदर्भिय शासन निर्णय, पत्र, ठराव, यांचे वाचन करुन रिपोर्ट देण्यात येतो की स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती ब्रांज पुतळा या साठी मा.महासाभा प्रस्ताव क्रमांक 2 दिनांक 21/07/2007 व मा.स्थायी समीती ठराव क्रमांक .

16 ठराव क्रमांक 03 दिनांक 16/08/2008 अंवये संभाजी महाराज यंच्या अश्वरुड पुतळ्याएवजी उभा पुर्ण पुतळा बसविणे असा बद्दल करण्यात यावा व प्रोफेसर कॉलनी चॉकात पुतळा उभारणेबाबत तसेच मा. शासनाचे परवानगीसाठी नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास परवानगी देण्यात येत आहे असा ठराव संमत झालेला आहे.

संदर्भिय पत्र, ठराव, शासन निर्णय त्यांचा वाचन करुन प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

**1]** पुतळे उभारणॆबाबत परवानगी मागतील त्या संस्था नोदणीकृत असणे आवश्यक आहे.

**2]** पुतळा समिती

1. जिल्हाधिकारी - अध्यक्ष

2.आयुक्त, महानगरपालिका - सदस्य

3. पोलिस आधिक्षक - सदस्य

4. आधिक्षक आभियंता ,सार्वजनिक बांधकाम विभाग - सदस्य

5. निवासी उपजिल्हाधिकारी - सदस्य सचिव

**3]** पुतळे उभारणे संबंधी मार्गदर्शक तत्वे

1.कोणतीही व्यक्ती/ संघटना / संस्था, शासकीय / निम शासकीय संस्थेच्या तसेच खाजगी मालकीच्या जागेवर जिल्हाधिकारी यांच्या परवानगी शिवाय पुतळा उभा करू शकणार नाही.

2.पुतळा उभारणा-या जागेच्या मालकी हक्काबाबत संबंधीत वाद नसावा ती जागा अनधिकृत किवा आधिक्रमित केलेली नसावी.जागेच्या मालकी हक्काबाबत संबंधीत पुतळा बसविणा-या व्यक्ती / संस्था / कार्यालयाने कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. पुतळा उभारलेल्या जागेचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यास पुतळा उभारणा-या व्यक्ती संस्था/ कार्यालयास हक्क राहणार नाही .

3. पुतळा बसविणा-या समितीने व्यक्ती /संस्था /कार्यालय /समीतीने पुतळ्याच्या चबुत-याचे मोजमापे , आराखडा, पुतळ्याच्या साईट प्लॅन ,पुतळा ज्या धातु /साहित्यापासुन तयार करण्यात येणार आहे त्या धातु /साहित्याचे प्रमाण ,पुतळयचे वजन, उची व रंग याचा तपशिल पुतळ्याच्या रेखाचित्रासोबत मुख्य वास्तुशास्त्र , महाराष्ट्र राज्य यांना किवा त्यांनी आधिकार प्रदान केलेल्या विभागीय कार्यालयास सादर करुन मान्यता घेतेलेले पत्र प्रस्तावासोबत सादर करावे.

4. पुतळा उभारणा-या संस्थेने पुतळ्याच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेवुन ब्रांझ वा अन्य धातु, फायबर वा इतर साहित्यापासुन पुतळा तयार करावा आणी मान्यता घेतेलेले मॉडेल प्रमाणेच पुतळा उभारण्यची दक्षता घ्यावी.

5.पुतळा उभारल्यामुळे गांव / शहर सौदर्यात बाधा येणार नसल्याबाबत संबंधीत संस्था /कार्यालय तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांनी दक्षता घ्यावी.

6.पुतळा उभारल्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, स्थानिक वाद किवा जातीय तणाव वाढणार नाही या बाबत सविस्तर चौकशी करुन संबंधीत पोलीस कार्यालय प्रमुखाने ना- हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच पुतळा उभारण्यासाठे अल्पसंख्यांक व स्थानिक लोकांचा विरोध नसल्या बाबत स्पष्टपणे उल्लेख असलेले ना- हरकत प्रणापत्र घेण्यात यावे.

7.शासकीय निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालय परीसरात पुतळा उभारण्यासाठी संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे ना- हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत आसावे .

8.स्थानिक स्वराज्य संस्था यांनी पुतळा उभारण्याबाबत आवश्यक तो ठराव करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्य्क आहे.पुतळा उभारण्याची जागा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची नाही आशा प्रकरणी संबंधीत व्यक्ती / सस्था / कार्यालय यांनी पारीत केलेला ठराव तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना- हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

9.पुतळा उभारल्यामुळे वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होणार नसल्या बाबत स्थानिक पोलीस विभागाचे व संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना- हरकत प्रमाणपत्र घेवुन प्रस्तावासोबत जोडावे.

10. भविष्यात रस्ते रुंदीकरण वा अन्य विकास कामामुळे पुतळा हलविण्याचा प्रसंग उध्दभवल्यास त्यास विरोध न करता आवश्यक ती कार्यवाही स्वखर्चाने करण्याबाबत पुतळा उभारण्यास संस्थेचे शपथपत्र घेण्यात यावे .

11. पुतळ्याची देखभाल, मांगल्य ,पावित्र्य राखण्यची जबाबदारी स्विकारत असल्याचे करारपत्र पुतळा उभारणा-या संस्थेकडुन घेण्यात यावे.

12.पुतळ्या खर्च पुतळा उभाणारी संस्था करील व शासनाकडे निधीची मागणी करणार नाही असे संस्थेची वचनपत्र प्रस्तावासोबत घ्यावे .

13.पुतळा उभारण्यास मान्यता घ्यावयाच्या आदेशामध्ये पुतळ्याचे निश्चीत ठिकाण , जागेची मालकी, सर्व्हे नं. नियोजीत ठिकाण सर्व बाजुच्या रस्त्याच्या मध्यापासुन अंतर, पुतळ्याची देखभाल व दुरुस्ती , मांगल्य व पावित्र्य राखण्याची जबाबदारी कोणाकडे सोपविली आहे याचा संपुर्ण तपशिल समाविष्ट करण्यात यावा,

14.पुतळा उभारण्यासाठी पारीत केलेले ठराव ,ना- हरकत प्रमाणपत्रे 1 वर्षापेक्षा आधिक जुनी असु नयेत अशी तरतुद समाविष्ट करण्यात यावी.ना-हरकत प्रमाणपत्र देणा-या प्रधिका-याने त्यांच्याकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आवश्यक त्रुटीची पुर्तता करुन 6 महिन्याच्या आत ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे किवा नाकारावे.

15.राष्ट्रपुरुष/ थोर व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यास मान्यता देतांना त्याच राष्ट्रपुरुष/ थोर व्यक्तीचा पुतळा त्या गावात किवा शहरामध्ये 2 कि.मी. त्रिज्येच्या परीसरात तत्पुर्वी उभारलेला नाही याची दक्षता घेण्यात यावी.

यापुर्वी स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती ब्रांज पुतळा प्रोफेसर कॉलनी चोक उभारणेसाठी मे. एस बी परदेशी , आर्टस पुणे यांचेकडुन तयार करण्यात आलेला आहे व त्यांना त्यापोटी रु. 8.00 लक्ष देण्यात आलेले आहेत.

तसेच म. न. पा. पॅनल वरील वास्तु विशारद् अविष्कार ग्रुप, यांना पुतळ्याचे स्थापत्तीक काम व नकाशा बाबत पत्र दिलेले आहे.

त्याचबरोबर म न पा चे वास्तुविशारद यांचे कडुन पुतळा, चबुतरा , सुशोभिकरण ,इत्यादीचा नकाशा प्राप्त झालेनंतर व त्यास सहाय्यक संचालक नगररचना, विभागाची मंजुरीनंतर अंदाजपत्रक तयार करुन प्रोफेसर कॉलनी चोक येथील न. र. यो. क. अंतिम भुखंड क्र.129 मनपाच्या जागेत बसविणे तसेच ई निविदा मागवुन ठेकेदार नेमणुक करणे योग्य वाटते व प्रत्यक्ष कार्यादेश, चबुत-यास अंतीम परवानगी मिळाले नंतर देणे योग्य .

संदर्भिय पत्र क्र 12 व 13 अंवये स्थापन झालेल्या समिती नुसार दिनांक 18/8/2021 रोजी झालेल्या पुतळा समितीच्या शासन निर्णय मार्गदर्शक तत्वातील मुदा क्र 20 नुसार ठराव व ना हरकत 1 वर्षा पेक्षा आधिक जुनी असल्याने उपरोक्त विषयी तातडीने सभा बोलविणे बाबत कळिवले नुसार रिपोर्ट मा. महासभेकडे पाठविणेस मा. आयुक्त यांनी दि. 26/08/2021 रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी सदर विषय मा. महासभेपुढे रिपोर्ट आवलोकनार्थ तथा आदेशार्थ सादर.

यावर शहर आभियंता यांचा अभिप्राय की, विषयांकित जागेमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत शासनाचे दिनांक 02 मे 2017 रोजीचे शासन निर्णयातील निर्देशांचे पालन करुन प्रमाणपत्र, दाखले, ना-हरकत प्रमाणपत्र इत्यादींची पूर्तता करुन मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीसमोर परीपूर्ण प्रस्ताव देणे आवश्यक आहे. याकरीता मा.महासभेची मान्यता आवश्यक आहे. आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ नुसार कार्यवाही होणेस मा.महासभेचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करणेस मान्यतेस्तव.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :**

**मा.श्री.कुमार वाकळे :** विषय क्रमांक 28,29,30,31 विषयांचे वाचन केले हा विषय या संदर्भातील अधिकारी असतील तर संबंधित अधिकारी यांना व्यासपीठावर माहिती देण्यासाठी बोलवा. स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांचा विषय 2007 चा, हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणेचा विषय 2016-2017, माळीवाडा वेस येथील महात्मा ज्योतीबा फुले यांचा अर्धाकृती पुतळ्याच्या जागी पुर्णाकृती पुतळा बसविणेचा विषय जूना आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकती पुतळा बसविणेचा विषय जुना आहे. महानगरपालिका आयुक्त व प्रशासनाला विनंती कशामुळे प्रशासनाला वेळ लागला.

**शहर अभियंता श्री.इथापे :** कुमार भाऊंनी जे 28, 29, 30, हे विषय उपस्थित केले त्याबाबत खुलासा करतो. स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती ब्रॉंझ पुतळा प्रोफेसर कॉलनी चौक येथील न र यो क अंतिम भुखंड क्र . 129 मनपाच्या जागेत बसविणे कामी स्थापन झालेल्या समितीनुसार दिनांक 18/08/2021 रोजी झालेल्या पुतळा समितीच्या समितीच्या बैठकीत 2 मे 2017 मधील शासन निर्णय मार्गदर्शक तत्वातील मुद्दा क्र. 20 नुसार ठराव व नाहरकत 1 वर्षापेक्षा अधिक असल्याने उपरोक्त विषयी नव्याने ठराव करणे आवश्यक असल्याने आजच्या विषय पत्रिकेवरील 4 विषय घेण्यात आले आहे. यापूर्वी छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती ब्रांझ पुतळा प्रोफेसर कॉलनी चौक येथे उभारणीसाठी मे.एस.बी.परदेशी आर्टस पुणे यांचेकडून तयार करण्यात आलेला आहे. व त्यांना त्यापोटी रू.8 लक्ष देण्यात आलेले आहेत.

हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारती समोरील जागेत बसविणेस मा.महासभा ठराव क्र. 10 दि. 25/6/2019 अन्वये मंजूरी दिलेली आहे. तदनंतर नगररचना विभागाची नाहरकत घेवून आर्किटेक्ट मनोज जाधव यांना अदांजपत्रक, संकल्पचित्र , चबुत-याचे आराखडे, पुतळयाचे प्लग्ग इ. तयार करून सादर करणेस पत्र दिलेले आहे. तसेच मुख्य वास्तुशास्त्रज्ञ मुंबई यांना दि. 11/7/2019 रोजी पुतळा उभारण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याचे विंनती पत्र दिले आहे. अदयाप त्यांचीही परवानगी मिळालेली नाही. त्याचप्रमाणे मा.पोलिस अधिक्षक अहमदनगर यांना स्मरणपत्र देवून पुतळा बसविणेस नाहकरत प्रमाणपत्र दिले असता त्यांनी दिनांक 3/7/2020 रोजी पुतळा उभारण्या संदर्भात मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करावा त्याबाबत मा.जिल्हा अधिकारी यांनी पोलिस अधिक्षक अहमदनगर यांना अहवाल

मागितले तर चौकशी अंती नाहरकत देणे बाबत कार्यवाही करणेत येईल. असे कळविले असता त्यानुसार दि. 28/6/2020 रोजी मा.जिल्हाधिकारी यांना परवानगी दिले असता. मा.जिल्हाधिकारी यांनी दि. 4/9/2020 रोजी कागदपत्रांची पुर्तता करून परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेस कळविले असता त्यांचेकडे 5 प्रमाणपत्रासोबत जोडून पत्र दिले असता मा.जिल्हाधिकारी यांनी दि. 3/6/2021 रोजी परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेस कळविले आहे. मा.जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविलेल्या पुर्ततेंबाबत कार्यवाही सुरू आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** महानगरपालिकेला दर सभेमध्ये तेच बोलता मागच्या सभेत व या सभेत काय वेगळे उत्तर दिले. इतर शहरात रस्त्यावर पुतळे बसविले आपली मानसिकता असेल तर ते निश्चीत बसवू शकतो. सर्व पुतळया बाबत नगरवासियांची भावना लक्षात घेता 4-4 वर्ष झाले आम्ही बोलतो एक एक वर्ष मंजूरीला लागले या शहरामध्ये इमारतीचे वैभव वाढणार आहे. शहराचे वैभव वाढणार आहे. अधिका-यांची मानसिकता अशी का नाही. जी कारवाई झाली याला जबाबदार कोण का कोणी सांगीतले हे पुतळे बसवायचे नाहीत. महिना भरात जर पुतळयांच्या बाबतीत अक्शन घेतली नाही तर महानगरपालिकेच्या इमारतीत पुतळा बसवू. राउत साहेबांनी एक वर्षाच्या आत पुतळा बसविला नाही तर तो ठराव रद्द ठरतो असा शोध लागला. राउत साहेबांना‍ा माहिती आहे ती इतर अधिका-यांना माहिती नाही का. प्रशासन यापुर्वी खोटी माहिती देत होते का.

**शहर अभियंता श्री.इथापे :** लगतच्या एक वर्षातील ठराव पाहीजे जुना ठराव बाद झालेला नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :** छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती संभाजी महाराज या पुतळयांना एवढा विरोध का. पुतळे बसवू शकत नाही त्याबाबतीत एवढी नालस्ती होते. शिवप्रेमी, भिमप्रेमी चळवळीतील लोक बोलतात प्रत्येक नगरसेवक मानधन द्यायला तयार होते. पुण्यात रस्त्यावर पुतळे बसविले. आपल्या शहरात सगळे दंगलीचे लोक आहेत का. रस्ता, पाणी, लाईट या गोष्टी चालू राहणार महान पुरुषांचे पुतळे आपण बसवू शकत नाहीत. तर यापेक्षा वाईट गोष्ट नाही. कुठेतरी याबाबतीत विचार व्हायला पाहिजे. सर्वांना महापुरुषांचा गर्व आहे. सर्व नगरसेवक खर्च करतील. मला ठराव द्या 1 रुपया खर्च करु नका. तुम्ही जर हा पुतळा बसवला नाही तर एक महिन्यात नियोजीत जागेवर जावून आम्ही पुतळे बसवू. आपण दोन नंबरचे धंदे करतो का.? छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा मुख्य प्रशासकीय इमारतीतील कंम्पौडमध्ये असणार आहे. या ठिकाणी सुरक्षितता आहे. सिक्युरिटी गार्ड आहे. मग अडचण काय आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयासाठी आमदार साहेबांनी स्टॅण्ड समोर जागा मागीतली आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** विरोध कोणी केला नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :** आज जर ठराव केला तर पुन्हा एक वर्षाने बाद होणार आहे. एक वर्षात जर पुतळे बसविले नाही तर संबंधित अधिका-यांची जबाबदारी निश्चीत करुन कारवाई करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :** सभागृहात जबाबदारी निश्चीत करुन एक वर्षात पुतळे बसविले गेले पाहीजे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** लवकरात लवकर बसवू.

**मा.आयुक्त साहेब :** क्ले मॉडेल अंतिम करण्यासाठी एसपी ऑफिसची ची एनओसी लागते एसपी ऑफिसचे म्हणणे जिल्हाधिकारी यांनी कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याशिवाय शिवाय बसवू शकत नाही मा.आमदार साहेबांना मी ही बोललो आहे. महिना दोन महिन्यात पुतळा बसविणेकामी आवश्यक ती पुर्तता केली जाईल.

**मा.महापौर साहेब :** विषय मंजूर पुढील विषय घ्या.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती ब्रॉंझ धातुचा पुतळा प्रोफेसर कॉलनी चौक येथील न. र. यो. क्रमांक अंतिम भुखंड क्र.129 या महानगरपालिकेच्या जागेत बसविणेस ही सभा मान्यता देत आहे. पुतळा बसविणेबाबतची कार्यवाही प्रशासनाने लवकरात लवकर करणेबाबत कार्यवाही करावी. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

सुचक - मा.श्री.कुमार बबनराव वाकळे

अनुमोदक - मा.श्री.गणेश खंडेराव कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : २९** **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारती समोरील जागेत बसविणेबाबत...

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : 1) मा.शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.पुतळा 3116/प्र.क्र.308/29 दिनांक 02 मे 2017.

2) मा.महासभा ठराव क्र.1 दिनांक 25/06/2019 रोजीची मान्यता.

3) इकडील सार्व.बांध.वि◌ी◌ाग जा.क्र.532 दिनांक 28/08/2020रोजीचे पत्र.

4) मा.अपर जिल्हादंडाधिकारी,अहमदनगर यांचेकडील क्र. डी.सी. /कार्या/9ड1/954/2020 दिनांक 04/09/2020 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारती समोरील उद्यानामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणेबाबत मा.महासभा ठराव क्रमांक 1 दि.25/06/2019 अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारती समोरील उद्यानामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणेस परवानगी दिलेली आहे. तद्नंतर नगररचना विभागाची ना-हरकत घेवून आर्किटेक्ट श्री.मनोज जाधव, अविष्कार ग्रुप यांना दि.11/06/2018, दि.15/12/2018, दि.11/02/2019 व दि.26/07/2021 यांना अंदाजपत्रक संकल्प चित्र, चबुत-याचे आराखडे,पुतळयाचे साईट प्लान इ. तयार करुन सादर करणेस पत्र दिलेले आहेत. परंतु त्यांनी अद्याप इकडेस प्रतिसाद दिलेला नाही.

तसेच मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना दि.11/07/2019 रोजी पुतळा उभारण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यांस विनंतीचे पत्र दिलेले आहे. अद्याप त्यांचीही परवानगी मिळालेली नाही.

त्याचप्रमाणे मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना दि.11/07/2019,स्मरणपत्र दि.29/11/2019 व दि.01/07/2020 अन्वये पुतळा बसविणेस ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंतीचे पत्र दिले असता त्यांनी दि.03/07/2020 रोजी पुतळा उभारण्या संदर्भात मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करावा. त्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी

पोलीस अधिक्षक,अहमदनगर यांचा अहवाल मागितलेवर चौकशी अंती ना-हरकत देणे बाबत कार्यवाही करण्यांत येईल असे इकडेस पत्र दिले आहे.

त्यानुसार मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडे दि.28/08/2020 रोजी पुतळा उभारणेस परवानगी मिळणेबाबत पत्र दिले असता मा.जिल्हाधिकारी यांनी दि.04/09/2020 रोजी इकडेस पत्र पाठवुन कागदपत्रांची पुर्तता करून परिपुर्ण प्रस्ताव सादर करणेस इकडेस कळविले असता मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस 5 प्रमाणपत्र सोबत जोडून दि.18/02/2021 रोजी पुतळा उभारणेस मान्यता मिळणेबाबत पत्र दिलेले असता मा.जिल्हाधिकारी यांनी दि.03/06/2021 रोजी परिपुर्ण प्रस्ताव सादर करणेस कळविलेले आहे.

त्यानुसार मा.जिल्हादंडाधिकारी यांना दि.11062021 रोजी पुन: पत्र देवुन पुतळा उभारणेस परवानगीची मागणी केलेली आहे व आर्किटेक्ट श्री.मनोज जाधव,अविष्कार ग्रुप यांना दि.26/07/2021 यांना संकल्प चित्र, चबुत-याचे आराखडे, पुतळयाचे साईट प्लल इ. तयार करुन सादरकरणेस पत्र दिलेले आहे. तथापि मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाने कळविलेल्या पुर्तते बाबत कार्यवाही सुरु आहे.

शासन निर्णय क्रमांक पुतळा 3116/प्र.क्र. /308/29, दि.02 मे 2017 मधील पुतळा उभारण्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे मधील क्र.20 नुसार पुतळे उभारण्यासाठी पारीत केलेले ठराव वर्षापेक्षा अधिक जूना असू नयेत असा उल्लेख असलेने अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारती समोरील उद्यानामध्ये हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणे कामी पुन:श्च मा.महासभेच्या ठरावाची आवश्यकता असलेने सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविणेकामी रिपोर्ट मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, उपरोक्त विषयान्वये छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा मनपाचे मुख्य प्रशासकीय इमारतीचे आवारामध्ये बसविणेबाबत शासनाचे दि.02 मे 2017 चे परिपत्रकानुसार मार्गदर्शक तत्वे निश्चीत केलेली आहेत. त्यानुसार आवश्यक ती प्रमाणपत्रे हमीपत्रे व पूर्तता करणे आवश्यक आहे. तसेच आवश्यक त्या परवानग्या संबंधीत विभागाकडून घेणे आवश्यक आहे.

याकरीता पुतळा उभारणेकामी आवश्यक त्या सर्व पूर्तता करणेस मनपाचे वतीने हमीपत्र, प्रमाणपत्र देणे,तसेच क्ले मॉडेल तयार करून पुढील कार्यवाही करणेस मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक आयुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ मधील नमुद शासन निर्णयानुसार मा.महासभेच्या ठरावाची आवश्यकता असल्याने प्रस्तावितनुसार सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ व ब मधील अभिप्रायानुसार गठीत प्रशासकीय समितीमार्फत कार्यवाही होणेसाठी मा.महासभेसमोर प्रस्ताव पाठविणेस

मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*----

**चर्चा :**

**मा.श्री.कुमार वाकळे :** विषय मंजूर करा.

**मा.सौ.सुरेखा कदम :** विषय मंजूर करा.

**मा.महापौर साहेब :** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**---*---**

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिहांसनावर बसलेला ब्रॉझ धातुचा पुतळा महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारती समोरील जागेत बसविणेस ही सभा मान्यता देत आहे. पुतळा बसविणे बाबतची प्रशासकीय कार्यवाही प्रशासनाने लवकरात लवकर करुन सदर ठिकाणी पुतळा लवकरात लवकर बसविणेत यावा यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

सुचक – मा.सौ.सुरेखा संभाजी कदम

अनुमोदक - मा.श्री.कुमार बबनराव वाकळे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : ३०** **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** माळीवाडा वेस येथील महात्मा ज्योतीबा फुले यांचा अर्धाकृती पुतळ्याच्या जागी पुर्णाकृती पुतळा बसविणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- 1] मा.स्थायी समीती ठराव क्रमांक 95 दिनांक 18/03/2021

2] मा.महासभा ठराव क्र 42 दिनांक 28/3/2018

3] सामान्य प्रशासन विभाग शा.नि.2/5/2017 , 2/2/2005

4] अप्पर जिल्हाधिकारी यांचे पत्र जा क्र 73 दिनांक 13/4/2018 चे पत्र.

5] सहाय्यक संचालक नगररचना यांकेकडील पत्र ज क्र 421 दि. 8/6/2018.

6] आविष्कार ग्रुप, म न पा पॅनल यांना पत्र क्र. 57 दिनांक 11/6/2018

7] सहाय्यक संचालक नगररचना, यांचे पत्र जा क्र 3969 दि. 11/7/2018

8] मा.सर्वेच्य न्यायालय 314 दि. 2010 दिनांक 18/01/2013 चा अदेश

9] आस्थापना विभाग जा क्र 2705 दि. 13/08/2021 चा आदेश

10] आस्थापना विभाग जा क्र 2724 दि. 17/08/2021 चा

उपरोक्त सर्व संदर्भिय शासन निर्णय, पत्र, ठराव, यांचे वाचन करुन रिपोर्ट देण्यात येतो की महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा या साठी मा. महासभा ठराव क्र 42 दिनांक 28/3/2018 व मा.स्थायी समीती ठराव क्रमांक 95 दिनांक 18/03/2021 अंवये ठराव संमत झालेला आहे. कि माळीवाडा वेस येथे आर्धाकृती पुतळा ऐवजी पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत ठराव झालेला आहे. त्यामध्ये संदर्भिय पत्र , ठराव, शासन निर्णय त्यांचा वाचन करुन प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

1] पुतळे उभारणॆसाठी व परवानगी असणारी संस्था नोदणीकृत असणे आवश्यक आहे.

2] पुतळा समिती

1. जिल्हाधिकारी - अध्यक्ष

2.आयुक्त - सदस्य

3. पोलिस आधिक्षक - सदस्य

4. आधिक्षक आभियंता ,सार्वजनिक बांधकाम विभाग - सदस्य

5. निवासी उपजिल्हाधिकारी - सदस्य सचिव

3] पुतळे उभारणे संबंधी मार्गदर्शक तत्वे

1.कोणतीही व्यक्ती/ संघटना / संस्था, शासकीय / निम शासकीय संस्थेच्या तसेच खाजगी मालकीच्या जागेवर जिल्हाधिकारी यांच्या परवानगी शिवाय पुतळा उभा करू शकणार नाही.

2.पुतळा उभारणा-या जागेच्या मालकी हक्काबाबत संबंधीत वाद नसावा ती जागा अनधिकृत किवा आधिक्रमित केलेली नसावी.जागेच्या मालकी हक्काबाबत संबंधीत पुतळा बसविणा-या व्यक्ती / संस्था / कार्यालयाने कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. पुतळा उभारलेल्या जागेचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यास पुतळा उभारणा-या व्यक्ती संस्था/ कार्यालयास हक्क राहणार नाही .

3. पुतळा बसविणा-या समितीने व्यक्ती /संस्था /कार्यालय /समीतीने पुतळ्याच्या चबुत-याचे मोजमापे , आराखडा, पुतळ्याच्या साईट प्लॅन ,पुतळा ज्या धातु /साहित्यापासुन तयार करण्यात येणार आहे त्या धातु /साहित्याचे प्रमाण ,पुतळ्यचे वजन, उची व रंग याचा तपशिल पुतळ्याच्या रेखाचित्रासोबत मुख्य वास्तुशास्त्र , महाराष्ट्र राज्य यांना किवा त्यांनी आधिकार प्रदान केलेल्या विभागीय कार्यालयास सादर करुन मान्यता घेतेलेले पत्र प्रस्तावासोबत सादर करावे.

4. पुतळा उभारणा-या संस्थेने पुतळ्याच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेवुन ब्रांझ वा अन्य धातु, फायबर वा इतर साहित्यापासुन पुतळा तयार करावा आणी मान्यता घेतेलेले मॉडेल प्रमाणेच पुतळा उभारण्यची दक्षता घ्यावी.

5.पुतळा उभारल्यामुळे गांव / शहर सौदर्यात बाधा येणार नसल्याबाबत संबंधीत संस्था /कार्यालय तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांनी दक्षता घ्यावी.

6.पुतळा उभारल्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, स्थानिक वाद किवा जातीय तणाव वाढणार नाही या बाबत सविस्तर चौकशी करुन संबंधीत पोलीस कार्यालय प्रमुखाने ना- हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच पुतळा उभारण्यासाठे अल्पसंख्यांक व स्थानिक लोकांचा विरोध नसल्या बाबत स्पष्टपणे उल्लेख असलेले ना- हरकत प्रणापत्र घेण्यात यावे.

7.शासकीय निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालय परीसरात पुतळा उभारण्यासाठी संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे ना- हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत आसावे.

8.स्थानिक स्वराज्य संस्था यांनी पुतळा उभारण्याबाबत आवश्यक तो ठराव करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्य्क आहे.पुतळा उभारण्याची जागा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची नाही आशा प्रकरणी संबंधीत व्यक्ती / सस्था / कार्यालय यांनी पारीत केलेला ठराव तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना- हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

9.पुतळा उभारल्यामुळे वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होणार नसल्या बाबत स्थानिक पोलीस विभागाचे व संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना- हरकत प्रमाणपत्र घेवुन प्रस्तावासोबत जोडावे.

10. भविष्यात रस्ते रुंदीकरण वा अन्य विकास कामामुळे पुतळा हलविण्याचा प्रसंग उध्दभवल्यास त्यास विरोध न करता आवश्यक ती कार्यवाही स्वखर्चाने करण्याबाबत पुतळा उभारण्यास संस्थेचे शपथपत्र घेण्यात यावे .

11. पुतळ्याची देखभाल, मांगल्य ,पावित्र्य राखण्यची जबाबदारी स्विकारत असल्याचे करारपत्र पुतळा उभारणा-या संस्थेकडुन घेण्यात यावे.

12.पुतळ्या खर्च पुतळा उभाणारी संस्था करील व शासनाकडे निधीची मागणी करणार नाही असे संस्थेची वचनपत्र प्रस्तावासोबत घ्यावे .

13.पुतळा उभारण्यास मान्यता घ्यावयाच्या आदेशामध्ये पुतळ्याचे निश्चीत ठिकाण ,जागेची मालकी, सर्व्हे नं. नियोजीत ठिकाण सर्व बाजुच्या रस्त्याच्या मध्यापासुन अंतर, पुतळ्याची देखभाल व दुरुस्ती , मांगल्य व पावित्र्य राखण्याची जबाबदारी कोणाकडे सोपविली आहे याचा संपुर्ण तपशिल समाविष्ट करण्यात यावा,

14.पुतळा उभारण्यासाठी पारीत केलेले ठराव ,ना- हरकत प्रमाणपत्रे 1 वर्षापेक्षा आधिक जुनी असु नयेत अशी तरतुद समाविष्ट करण्यात यावी.ना- हरकत प्रमाणपत्र देणा-या प्रधिका-याने त्यांच्याकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आवश्यक त्रुटीची पुर्तता करुन 6 महिन्याच्या आत ना- हरकत प्रमाणपत्र द्यावे किवा नाकारावे.

15.राष्ट्रपुरुष/ थोर व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यास मान्यता देतांना त्याच राष्ट्रपुरुष/ थोर व्यक्तीचा पुतळा त्या गावात किवा शहरामध्ये 2 कि.मी. त्रिज्येच्या परीसरात तत्पुर्वी उभारलेला नाही याची दक्षता घेण्यात यावी.

त्याचबरोबर शासन निर्णयामध्ये संदर्भिय 8 नुसार मा.सर्वेच्य न्यायालयाचे आदेशाचे पालन करावे असे नमुद आहे.तथापी सदर आदेशाची संगणकामध्ये इंटरनेट द्वारे तपासणी केली असता आदेश मिळालेला नाही त्यामुळे त्या बाबत महानगरपालिका कोर्ट विभागास आदेश प्राप्त करुअन घेणे बाबत आदेश होणेस .

पुतळा उभारणॆ बाबत कोणता नागरीक, धार्मिक, संघटना इत्यादी चा विरोध नाही

खात्री करणॆसाठी वर्तमान पत्रामध्ये तसे प्रसिध्दी करणे योग्य वाटते त्या बाबत आदेशार्थ सादर.

तसेच तोच पुतळा प्रस्तावित जागेपासुन 2 कि.मी. त्रिज्येमध्ये नसावा याची दक्षता घेणेबाबत आदेश केले आहे त्यानुसार माळीवाडा वेस पासुन 2 कि.मी.त्रिज्येमध्ये महात्मा फुले यांचा पुतळा सार्वजनिक ठिकाणी कोठेही आढळुन आलेला नाही.त्याचबरोबर सदर ठिकाणी पुतळा बसविणेसाठी संदर्भ क्र 5 व 7 नुसार सहाय्यक संचालय, नगरररचना यांनी ना हरकत नोंदविलेला आहे.

यापुर्वी संदर्भिय पत्र देवुन म. न. पा. पॅनल वरील वास्तु विशारद् अविष्कार ग्रुप, यांना पुतळ्याचे स्थापत्तीक काम व नकशा बाबत आदेश दिलेले आहेत परंतु जागा निश्चीत बाबत महात्मा ज्योतीबा फुले पुतळा त्याच जागी बसविण्यचे प्रयोजन आलेने पुनश्च युध्द पातळीवर नकाशा देणे बाबत कळविणेस सादर

पुतळा समीतीकडे पाठविण्यापुर्वी मार्गदर्शक तत्वातील परवानग्या प्राप्त झालेनंतर पाठवावा लागणारे आहे तो पर्यंतचा कालावधी मोठा लागणार आहे तो पर्यंत पुतळा निर्मिती साठी शिल्पकार नेमणुक करणे योग्य त्यानुसारपुतळ्यास अंतीम परवानगी प्राप्त झलेनंतरच पुतळा बनविणेस व त्यानंतर देयक देणेचे अटीवर निविदा मागविणेस रिपोर्ट आदेशार्थ सादर .

त्याचबरोबर म न पा चे वास्तुविशारद यांचे कडुन पुतळा, चबुतरा , सुशोभिकरण ,इत्यादीचा नकाशा प्राप्त झालेनंतर व त्यास सहाय्यक संचालक नगररचना, विभागाची मंजुरीनंतर अंदाजपत्रक तयार करुन ई निविदा मागवुन ठेकेदार नेमणुक करणे योग्य वाटते व प्रत्यक्ष कार्यादेश पुतळ्यास अंतीम परवानगी मिळाले नंतर देणे योग्य .

संदर्भिय पत्र क्र 9 नुसार स्थापन झालेल्या समिती नुसार दिनांक 18/8/2021 रोजी झालेल्या पुतळा समितीच्या शासन निर्णय मार्ग्दर्शक तत्वातील मुदा क्र 20 नुसार ठराव व ना हरकत 1 वर्षा पेक्षा आधिक जुना असल्याने उपरोक्त विषयी तातडीने सभा बोलविणॆ बाबत कळ्विले नुसार रिपोर्ट मा. महासभेकडे पाठविणेस बाबत रिपोर्ट आवलोकनार्थ तथा आदेशार्थ सादर.

यावर शहरअभियंता यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवालानुसार माळीवाडा वेस येथे महात्मा ज्योतीराव फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत शासनाचे दिनांक 02 मे 2017 रोजीचे शासन निर्णयानुसार एकुण 21 मुद्यांची पुर्तता करणे आवश्यक आहे. करीता संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र, दाखले इ. बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

पुतळा उभारणेसाठी सर्व संबंधीत शासकीय विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे. त्याकरीता आवश्यक कायदेशीर बाबींची पूर्तता करणेस, खर्चास मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचे अभिप्रायासह सादर करा.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ नुसार मा. महासभा मान्यतेसाठी कार्यवाहीस्तव.

यावर उपायुक्त कर यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*----

**चर्चा :**

**मा.श्री.कुमार वाकळे :** विषय मंजूर करा.

मा.श्री.गणेश कवडे : विषय मंजूर करा.

मा.महापौर साहेब : ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**---*---**

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. माळीवाडा वेस येथील महात्मा ज्योतीबा फुले यांचा अर्धाकृती पुतळ्याच्या जागी पुर्णाकृती पुतळा बसविणेस ही सभा मान्यता देत आहे. पुतळा बसविणेबाबतची कार्यालयीन सोपस्कार लवकरात लवकर पार पाडुन सदर ठिकाणी पुतळा लवकरात लवकर बसविणेत यावा यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

**सुचक -** मा.श्रीमती.सुरेखा संभाजी कदम

**अनुमोदक -** मा.श्री.दत्तात्रय हरिभाउ कावरे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : ३१** **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- 1]मा.स्थायी समीती ठराव क्रमांक 95 दिनांक 18/03/2021

2]मा.महासभा ठराव क्र 42 दिनांक 28/3/2018

3] सामान्य प्रशासन विभाग शा.नि.2/5/2017 , 2/2/2005

4] अप्पर जिल्हाधिकारी यांचे पत्र जा क्र 73 दिनांक 13/4/2018 चे पत्र.

5] सहाय्यक संचालक नगररचना यांकेकडील पत्र ज क्र 421 दि. 8/6/2018.

6] आविष्कार ग्रुप, म न पा पॅनल यांना पत्र क्र. 57 दिनांक 11/6/2018

7] सहाय्यक संचालक नगररचना, यांचे पत्र जा क्र 3969 दि. 11/7/2018

8] मा.सर्वेच्य न्यायालय 314 दि. 2010 दिनांक 18/01/2013 चा अदेश

9] आस्थापना विभाग जा क्र 2705 दि. 13/08/2021 चा आदेश

10] आस्थापना विभाग जा क्र 2724 दि. 17/08/2021 चा

उपरोक्त सर्व संदर्भिय शासन निर्णय, पत्र, ठराव, यांचे वाचन करुन रिपोर्ट देण्यात येतो की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे या साठी मा. महासभा ठराव क्र 42 दिनांक 28/3/2018 व मा.स्थायी समीती ठराव क्रमांक 95 दिनांक 18/03/2021 अंवये ठराव संमत झालेला आहे. त्यामध्ये संदर्भिय पत्र , ठराव, शासन निर्णय त्यांचा वाचन करुन प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

1] पुतळे उभारणेसाठी व परवानगी असणारी संस्था नोदणीकृत असणे आवश्यक आहे.

2] पुतळा समिती

1. जिल्हाधिकारी - अध्यक्ष
2. आयुक्त - सदस्य
3. पोलिस आधिक्षक - सदस्य
4. आधिक्षक आभियंता ,सार्वजनिक बांधकाम विभाग - सदस्य
5. निवासी उपजिल्हाधिकारी - सदस्य सचिव

3] पुतळे उभारणे संबंधी मार्गदर्शक तत्वे

1.कोणतीही व्यक्ती/ संघटना / संस्था, शासकीय / निम शासकीय संस्थेच्या तसेच खाजगी मालकीच्या जागेवर जिल्हाधिकारी यांच्या परवानगी शिवाय पुतळा उभा करू शकणार नाही.

2.पुतळा उभारणा-या जागेच्या मालकी हक्काबाबत संबंधीत वाद नसावा ती जागा अनधिकृत किवा आधिक्रमित केलेली नसावी.जागेच्या मालकी हक्काबाबत संबंधीत पुतळा बसविणा-या व्यक्ती / संस्था / कार्यालयाने कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. पुतळा उभारलेल्या जागेचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यास पुतळा उभारणा-या व्यक्ती संस्था/ कार्यालयास हक्क राहणार नाही .

3. पुतळा बसविणा-या समितीने व्यक्ती /संस्था /कार्यालय /समीतीने पुतळ्याच्या चबुत-याचे मोजमापे , आराखडा, पुतळ्याच्या साईट प्लँन ,पुतळा ज्या धातु /साहित्यापासुन तयार करण्यात येणार आहे त्या धातु /साहित्याचे प्रमाण ,पुतळ्यचे वजन, उची व रंग याचा तपशिल पुतळ्याच्या रेखाचित्रासोबत मुख्य वास्तुशास्त्र , महाराष्ट्र राज्य यांना किवा त्यांनी आधिकार प्रदान केलेल्या विभागीय कार्यालयास सादर करुन मान्यता घेतेलेले पत्र प्रस्तावासोबत सादर करावे.

4. पुतळा उभारणा-या संस्थेने पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेवुन ब्रांझ वा अन्य धातु, फायबर वा इतर साहित्यापासुन पुतळा तयार करावा आणी मान्यता घेतेलेले मॉडेल प्रमाणेच पुतळा उभारण्यची दक्षता घ्यावी.

5.पुतळा उभारल्यामुळे गांव / शहर सौदर्यात बाधा येणार नसल्याबाबत संबंधीत संस्था /कार्यालय तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांनी दक्षता घ्यावी.

6.पुतळा उभारल्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, स्थानिक वाद किवा जातीय तणाव वाढणार नाही या बाबत सविस्तर चौकशी करुन संबंधीत पोलीस कार्यालय प्रमुखाने ना- हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच पुतळा उभारण्यासाठे अल्पसंख्यांक व स्थानिक लोकांचा विरोध नसल्या बाबत स्पष्टपणे उल्लेख असलेले ना- हरकत प्रणापत्र घेण्यात यावे.

7.शासकीय निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालय परीसरात पुतळा उभारण्यासाठी संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे ना- हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत आसावे .

8.स्थानिक स्वराज्य संस्था यांनी पुतळा उभारण्याबाबत आवश्यक तो ठराव करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्य्क आहे.पुतळा उभारण्याची जागा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची नाही आशा प्रकरणी संबंधीत व्यक्ती / सस्था / कार्यालय यांनी पारीत केलेला ठराव तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना- हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

9.पुतळा उभारल्यामुळे वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होणार नसल्या बाबत स्थानिक पोलीस विभागाचे व संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना- हरकत प्रमाणपत्र घेवुन प्रस्तावासोबत जोडावे.

10. भविष्यात रस्ते रुंदीकरण वा अन्य विकास कामामुळे पुतळा हलविण्याचा प्रसंग उध्दभवल्यास त्यास विरोध न करता आवश्यक ती कार्यवाही स्वखर्चाने करण्याबाबत पुतळा उभारण्यास संस्थेचे शपथपत्र घेण्यात यावे.

11. पुतळ्याची देखभाल, मांगल्य ,पावित्र्य राखण्यची जबाबदारी स्विकारत असल्याचे करारपत्र पुतळा उभारणा-या संस्थेकडुन घेण्यात यावे.

12.पुतळ्या खर्च पुतळा उभाणारी संस्था करील व शासनाकडे निधीची मागणी करणार नाही असे संस्थेची वचनपत्र प्रस्तावासोबत घ्यावे .

13.पुतळा उभारण्यास मान्यता घ्यावयाच्या आदेशामध्ये पुतळ्याचे निश्चीत ठिकाण ,जागेची मालकी, सर्व्हे नं. नियोजीत ठिकाण सर्व बाजुच्या रस्त्याच्या मध्यापासुन अंतर, पुतळ्याची देखभाल व दुरुस्ती , मांगल्य व पावित्र्य राखण्याची जबाबदारी कोणाकडे सोपविली आहे याचा संपुर्ण तपशिल समाविष्ट करण्यात यावा,

14. पुतळा उभारण्यासाठी पारीत केलेले ठराव ,ना- हरकत प्रमाणपत्रे 1 वर्षापेक्षा आधिक जुनी असु नयेत अशी तरतुद समाविष्ट करण्यात यावी.ना- हरकत प्रमाणपत्र देणा-या प्रधिका-याने त्यांच्याकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आवश्यक त्रुटीची पुर्तता करुन 6 महिन्याच्या आत ना- हरकत प्रमाणपत्र द्यावे किवा नाकारावे.

15.राष्ट्रपुरुष/ थोर व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यास मान्यता देतांना त्याच राष्ट्रपुरुष/ थोर व्यक्तीचा पुतळा त्या गावात किवा शहरामध्ये 2 कि.मी. त्रिज्येच्या परीसरात तत्पुर्वी उभारलेला नाही याची दक्षता घेण्यात यावी.

त्याचबरोबर शासन निर्णयामध्ये संदर्भिय ८ नुसार मा.सर्वेच्य न्यायालयाचे आदेशाचे पालन करावे असे नमुद आहे.तथापी सदर आदेशाची संगणकामध्ये इंटरनेट द्वारे तपासणी केली असता आदेश मिळालेला नाही त्यामुळे त्या बाबत महानगरपालिका कोर्ट विभागास आदेश प्राप्त करुन घेणे बाबत आदेश होणेस सादर ..

यापुर्वी संदर्भिय पत्र देवुन म. न. पा. पॅनल वरील वास्तु विशारद् अविष्कार ग्रुप, यांना पुतळ्याचे स्थापत्तीक काम व नकशा बाबत आदेश दिलेले आहेत परंतु जागा निश्चीत नसल्याने नकाशा तयार केलेला नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेची जागा निश्चीत नसुन त्यासाठी मा. आमदार संग्राम भैय्या जगताप यांनी सुचविले नुसार न.र.यो.क्र. 3 अंतिम भुखंड क्र 3 मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे मागणी केलेली आहे परंतु आद्याप जागा उपलब्ध

झालेली नाही .त्या बाबतची कार्यवाही नगररचना विभागा मार्फत चालु आहे. जागा प्राप्त झालेनंतर पुषील कार्यवाही करणेत येईल.

प्रस्ताव पुतळा समीतीकडे पाठविण्यापुर्वी मार्गदर्शक तत्वातील परवानग्या प्राप्त झालेनंतर पाठवावा लागणारे आहे तो पर्यंतचा कालावधी मोठा लागणारआहे तो पर्यंत पुतळा निर्मिती साठी शिल्पकार नेमणुक करणे योग्य तथापी पुतळ्यास अंतीम परवानगी प्राप्त झालेनंतरच पुतळा बनविणेस व त्यानंतर देयक देणेचे अटीवर निविदा मागवुन कार्यादेश देणेस रिपोर्ट आदेशार्थ सादर .

पुतळा बसविणेची जागा सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका अ. नगर यांची युध्द पातळीवर कार्यवाही होणे बाबत रिपोर्ट सविनय सादर .

त्याचबरोबर म न पा चे वास्तुविशारद यांचे कडुन पुतळा, चबुतरा , सुशोभिकरण ,इत्यादीचा नकाशा प्राप्त झालेनंतर व त्यास सहाय्यक संचालक नगररचना, विभागाची मंजुरीनंतर अंदाजपत्रक तयार करुन ई निविदा मागवुन ठेकेदार नेमणुक करणे योग्य वाटते व प्रत्यक्ष कार्यादेश पुतळ्यास अंतीम परवानगी मिळाले नंतर देणे योग्य .

संदर्भिय पत्र क्र 9 नुसार स्थापन झालेल्या समिती नुसार दिनांक 18/8/2021 रोजी झालेल्या पुतळा समितीच्या शासन निर्णय मार्ग्दर्शक तत्वातील मुदा क्र 20 नुसार ठराव व ना हरकत 1 वर्षा पेक्षा आधिक जुनी असल्याने उपरोक्त विषयी तातडीने सभा बोलविणॆ बाबत कळिवले नुसार रिपोर्ट मा. महासभेकडे पाठविणेस बाबत रिपोर्ट आवलोकनार्थ तथा आदेशार्थ सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा शहरामध्ये उभारणे बाबत सातत्याने मागणी होत आहे राज्यामध्ये पुतळे उभारण्यासाठी शासनाने दिनांक 02 मे 2017 चे शासन निर्णयानुसार एकूण 21 मुद्यांची पुर्तता करणे आवश्यक आहे( तसेच सदर पुतळा बसविणेची जागा अद्याप निश्चीत झालेली नाही त्यामुळे जागा निश्चीत करणे आवश्यक आहे.

तरी सदर पुतळयासाठी जागा निश्चीत करणे, आवश्यक प्रमाणपत्रे, दाखले इ पूर्तता करणे व इतर आवश्यक बाबींची पुर्तता करणेस येणारे खर्चास मा महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ नुसार मा महासभा मान्यतेसाठी कार्यवाहीस्तव.

यावर उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, मा महासभेच्या मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :**

**मा.श्री.कुमार वाकळे :** विषय मंजूर करा.

मा.श्री.गणेश कवडे : विषय मंजूर करा.

मा.महापौर साहेब : ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेस ही सभा मान्यता देत आहे. पुतळा बसविणेबाबतची प्रशासकीय कार्यवाही प्रशासनाने लवकरात लवकर करावी सद्यस्थितीत असलेल्या अर्धाकृती डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाच्या ठिकाणी पुर्णाकृती पुतळा बसविणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

सुचक - मा.श्री.गणेश खंडेराव कवडे

अनुमोदक - मा.श्री.कुमार बबनराव वाकळे

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : ३२ दिनांक :- १२/०१/२०२२**

---

प्रस्तावाचा विषय : 14 व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधी वरील व्याजातुन प्रस्तावित केलेले खर्च कामी मा.महासभेची कार्योत्तर मंजूरी घेणेकामी व पुढील कामे करणेकामी मा.महासभेकडे मंजूरी मिळणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

**संदर्भ :** मा.महाराष्ट्र शासन नगरविकास शासन निर्णय क्रमांक टिएफसी/8015/ प्र;क्र.106/नवि-4 मंत्रालय,मुंबई दिनांक 03 ऑगष्ट 2015 रोजीचे शासन निर्णय.

उपरोक्त विषयांकित संदर्भीय प्रस्तावना सादर करण्यांत येते की, मा.शासनाकडून 14 व्या वित्त आयोगातुन वेळोवेळी निधी प्राप्त झालेले आहे. सदर प्राप्त निधीवर महानगरपालिकेस रक्कम रु.6,50,00,000/- व्याज प्राप्त आहे. त्यानुसार सदरील खालील प्रमाणे कामे प्रस्तावित करण्यांत येवुन कामे चालू आहे.

| अ.क्र. | तपीशल | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका हद्दीतील कोव्हीड -१९ च्या प्रादुर्भाव रोख ण्यासाठी कोव्हीड सेंटर येथे साफ सफाई करणेकामी बाह्ययंत्रणे मार्फत मजुर / कामगार उपलब्ध करुन घेणे बाबत. | रक्कम रु.१९,५०,०००/- |
| २ | कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव झालेल्या रुग्णाकरीता जेवन व चहा पाण्याची व्यवस्था करणे बाबत. | रक्कम रु.२२,५०,०००/- |
| ३ | मनपा करीता शव वाहिका (Hearse Van) खरेदी एक नग करणे कामी ई-निविदा प्रति महा राबविणे बाबत. | रक्कम रु.१९,००,०००/- |
| ४ | कोव्हीड- १९ करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाय योजना अंतर्गत शहरातील नागरीकांना (RTPCR) व (RAT Antigen ) चाचणी सुविधा केंद्र कोव्हीड सेंटरची माहिती देणेकामी बॅनर पुरवडा करुन घेणे बाबत. | रक्कम रु.५८,८००/- |
| ५ | कोव्हीड केअर सेंटर येथे पोर्टेबल शौचालय (टॉयलेट व पोर्टेबल बाथरुम भाडेत्तवावर उपलब्ध करुन घेणे बाबत). | रक्कम रु.३,४४,७००/- |
| ६ | सफाई अभियान अंतर्गत भिंतीवर सुविचार व बोधवाक्य लिहिणे तसेच बॅनर छपाई करुन घेणे व कोव्हीड केअर सेंटर कामी बॅनर छ्पाई करुन घेणे बाबत. (पोलीस परेड ग्रांऊड) | रक्कम रु.५,०७,१२०/- |
| ७ | प्र.स.कार्या-३, मधील इक्रा शाळा येथील कोव्हीड केअर सेंटर मधील साफ सफाई कामी मंजुर ई-निविदा दराने दैनंदिन ३० बाह्ययंत्रणे मार्फत कामगार उपलब्ध करुन घेणे बाबत प्रस्ताव. | रक्कम रु.३,९०,०००/- |
| ८ | पोलीस परेड ग्राऊड येथील कोव्हीड केअर सेंटर करीता पोर्टेबल टॉयलेट व बाथरुमची ड्रेनेज लाईन जोडणी व दैनंदिन साफ सफाई कामी येणारे खर्च. | रक्कम रु.१,३०,०००/- |
| ९ | घ.क.व्या विभागा करीता बाह्ययंत्रणे मार्फत स्वच्छता निरिक्षक उपलब्ध करुन घेणे कामी ई-निविदा प्रक्रिया राबाविणे बाबत. | ५,०६,४४८/- |

| | | |
|---|---|---|
| १० | घ.क.व्या विभागा करीता शहरातील मैला उपसा करणेकामी नविन दोन नग मैला उपसा वाहन खरेदी करणे बाबत. | रक्कम रु.५४,००,०००/- |
| ११ | कोव्हीड-१९ अमरधाम देयक दि.३१/०५/२०२१ अखेर | रक्कम रु.४७,७३,०००/- |
| १२ | अ.नगर मनपाच्या प्रोफेसर कॉलनी चौक सावेडी येथील सावित्रिबाई फुले भाजी मार्केट येथे MRI Machine कार्यान्वित करणे करीता स्थापत्य कामे करणे बाबत. | रक्कम रु.५१,२५,५२८/- |
| १३ | Social Media मनपा उपक्रमांची प्रत्येक पोस्ट शाब्दिक स्वरुपात चित्र, चलचित्र, आणि ध्वनिमुद्रित करुन ती Social Media वर व्हायरल करण्याचे काम करण्यासाठी एजन्सी. | रक्कम रु.९,५०,०००/- |
| १४ | करोना विषाणू प्रार्दुभाव रोखण्यासाठी चे देयक अदा करणे बाबत.<br>(ऑरनेट टेक्नोलोजी प्रणाली) | रक्कम रु.१८,९५,८३५/- |
| १५ | करोना विषाणू प्रार्दुभाव रोखण्यासाठी चे देयक अदा करणे बाबत.<br>(ऑरनेट टेक्नोलोजी प्रणाली) | रक्कम रु.७,३८,२४०/- |
| | एकुण:- | रक्कम रु.२,६९,१९,६७१/- |

वरील प्रमाणे १ ते १५ मुद्देची अत्यावश्यक सेवेतील व कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भामुळे प्रतिबंधत्मक उपाययोजना अंतर्गत कामे मा.आयुक्त यांच्या मान्यतेने करण्यात येत आहे.त्यानुसार वरील कामांकरीता प्रस्तावित खर्च रक्कम रु. २,६९,१९,६७१/- मा.महासभेची कार्यात्तर मंजुरी आवश्यक आहे.

तसेच वरील तक्त्यातील नमुद कामानुसार एकुण रक्कम रु.६,५०,००,०००/- मधुन शिल्लक रक्कम रु.३,८०,८०,३२९/-निधीतुन खालील प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील डेपो वरील अत्यावश्यक सेवेतील कामे करणे आवश्यक असल्या मुळे पुढील कामाचे नियोजना करीता निधी वापरणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | तपीशल | प्रस्तावित केलेली निधी | आवश्यक निधी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | बुरुडगांव सर्व्हे नं.३४ या ठिकाणावरील Bio-Methanation plant देखभाल व दुरुस्ती खर्च. | रु.३१,२१,०५६/- | रु.७,८०,२६४/- | पुढील कामा करीता १५ व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधीतुन प्रस्तावित करण्यात आले आहे. |
| २ | animal incinerator देखभाल व दुरुस्तीसह चालविणे. | रु.३६,००,०००/- | रु.१०,८०,०००/- | पुढील कामा करीता १५ व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधीतुन प्रस्तावित करण्यात आले आहे. |
| ३ | कोव्हीड-१९ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मृत्यु व्यक्तीचे अत्यंविधी कामी येणारे खर्चाकरीता. | अंदाजे खर्च रक्कम रु. ५४,००,०००/- | रु.१०,००,०००/- | --- |
| ४ | मनपास प्रभाग समिती कार्या.क्र.१ ते ४ मधील सेप्टीक टॅक व चेंबर कामाकरीता दोन जेटींग मशीन वाहने खरेदी करणेबाबत. | अंदाजे खर्च रक्कम रु.५०,००,०००/- | अंदाजे खर्च रक्कम रु.५०,००,०००/- | --- |
| ५ | सावेडी डेपो वर LMO Tank साठी. | अंदाजे खर्च रक्कम रु.१,०८,००,०००/- | रु.१,०८,००,०००/- | --- |
| ६ | कोव्हीड-१९ प्रादुर्भव रोखण्यासाठी,स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत नागरीकांमध्ये जनजागृती करणेकामी | अंदाजे खर्च रक्कम रु.३४,५०,०००/- | रक्कम रु.३५,२०,०००/- | -- |
| ७ | बुरुडगांव कचरा डेपो येथील डिपीआर मंजुरी नुसार रस्ता तयार करणेकामी अतिरीक्त लागणारी रक्कम | अंदाजे खर्च रक्कम रु.१,२८,००,०००/- | अंदाजे खर्च रक्कम रु.७५,००,०००/- | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | STP प्लैट पर्यंत जाणे कामी कॉकीट रस्ता विकसित करणे. | अंदाजे खर्च रक्कम रु.८४,००,०००/- | अंदाजे खर्च रक्कम रु.८४,००,०००/- | --- |
| एकुण:- | | | रु.३,८०,८०,२६४/- | |

वरील प्रमाणे १ ते ८ मुद्दे कामांकरीता निधी लागणार आहे.त्याकरीता येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ३,८०,८०,२६४/-खर्च करणेकामी १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त व्याजेतुन शिल्लक रक्कम रु. ३,८०,८०,३२९/- निधीतुन खर्च करणेकामी मा.महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार सदरील १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त व्याजेतुन एकुण रक्कम रु.६,५०,००,००/- मधुन प्राप्त निधीतुन प्रस्तावित केलेले खर्च कामी मा.महासभेची कार्योत्तर मंजुरी कामी व पुढील कामाकरीता येणाऱ्या खर्चास मा.महासभेची मंजुरी घेणेकामी मा.आयुक्त यांनी दिनांक ०३/०८/२०२१ रोजी मान्यता दिलेली आहे.
सबब वरील प्रमाणे मा.महासभेची मान्यता घेणेकामी सविनय सादर.

---*---

चर्चा :

**उपायुक्त श्री.डांगे** : 14 व्या वित्त आयोगातून 7.5 कोटी व्याज जमा झाले. कोव्हीडच्या दुस-या लाटेसाठी 2 कोटी 69 लाख खर्च प्रस्तावित, अंत्यविधी 47.73 लाख खर्च, एमआरआय सेंटर बसविणेसाठी 50 लक्ष तरतुद केली खर्च, बाधीत रूग्णांचे फोन मटींगसाठी 25 लाख खर्च केले. कोव्हीड डेटासाठी फेब्रुवारी पासून मे पर्यत 41 लाख खर्च केला.

**मा.श्री.शाम नळकांडे** : स्वच्छता निरीक्षक किती आहेत.

**उपायुक्त श्री.डांगे** : आठ स्वच्छता निरीक्षक आहेत.

**मा.श्री.शाम नळकांडे** : आठ ने काय होते. बाह्य यंत्रणेमार्फत उपलब्ध करुन घेतले. वाहन खरेदी केले. शासनाचा डीपीआर मंजूरी नंतर आपण वाहने खरेदी केली.

**उपायुक्त श्री.डांगे** : 7 कॉम्पक्टर होते. कचरा संकलन वाहतुकीसाठी आऊट सोरसिंगद्वारे टेंडर दिल्याने कम्पक्टर घेतले नाहीत.

**मा.श्री.शाम नळकांडे** : ठेकेदाराने ठेका बंद केला मग आपण ठेंकेदाराला कॉम्पक्टर मागायचे का. एकच कॉम्पक्टर घेतला. गाड्या का घेतल्या. कचरा गाड्या जर कचरा गाड्या प्रत्येक प्रभाग समितीला एक कॉम्पक्टर गेला असता डीपीआर मध्ये बदल करु नका. तुम्ही वजनकाटा कधी बसविला .

**उपायुक्त श्री.डांगे** : डिसेंबर मध्ये बसविला आहे. .

मा.श्री.शाम नळकांडे : लवकर जर बसविला असता तर दररोज जो 135 टन कचरा जमा होतो त्यावेळी कोव्हीडमुळे शहर बंद होते. काटा वेळेवर बदलला असता तर चुकीचे बील त्याला गेले नसते. संबंधित अधिका-यावर दप्तर दिरंगाई कायदयाखालील कारवाई करण्यात यावी. जानेवारी 2020, फेब्रुवारी 2020 83 लाखाची जी बीले काढली अशी ठेकेदाराची यादी देण्यांत यावी.

**मा.श्री.मदन आढाव** : दिनांक 20 मे 2019 ला मनपा बंद होती त्या चार दिवसांचे

बील काढले.

**उपायुक्त श्री.डांगे :** 19 नोव्हेंबर 2019 ला ठेका दिला.

**मा.श्री.शाम नळकांडे :** उद्या जर ठेकेदाराने ठेका सोडून दिला तर. वजनकाटा लवकर बसवला असता तर 120 टन कचरा जमा होतो 4.5 लाख रुपये रोज आपण ठेकेदाराला देतो. तो जर सोडून गेला आपले वाहने असतील तर तो आपण स्वतः उचलू शकतो. आपले ते वाहने डीपीआर मध्ये मंजूर आहेत. ती लवकरात लवकर खरेदी करण्यांत यावी. बिगारी नाही एक जेसीबी महानगरपालिकेकडे नाही. उद्या जर काही झाले तर कोणाला जबाबदार धरणार

**मा.आयुक्त साहेब :** कोरोना मुळे बंद असतांना कच-याचे बील काढले याबद्दल माहिती देतो. नोव्हेंबरला तो ठेका दिला. त्यांचे अगोदरचा कचरा मोठया प्रमाणात निघाला असे सांगीतले. त्याचे कारण असे की कोरोनामुळे बाजारपेठ बंद असली तरी घरोघरचा कचरा नागरिकांनी वाहनात जमा केला. कचरा निर्माण होण्याचे प्रमाण कमी होत नाही. कचरा दुकानात नियमीत तयार होतो. डीपीआर मध्ये वाहने घ्यावीत या मताशी मी सहमत आहे. आपण सांगीतलेल्या सूचनांचा विचार करु.

**मा.श्री.शाम नळकांडे :** आपण जर वजनकाटा वेळेत घेतला असता तर कच-याचे वजन चोरीचे प्रमाण झाले नसते. या बाबत जबाबदारी निश्चीत करा.

**मा.आयुक्त साहेब :** वेळोवेळी कच-याचे वजन केले जाते.

**मा.श्री.शाम नळकांडे :** येणा-या प्रत्येक बीलातुन भाडे वसूल करण्यांत यावे. एक ते 1.25 कोटी वसूल होणे अपेक्षित होते. 51 ते 75 लाख वसूल झाले आहेत. निविदेमध्ये ठरल्याप्रमाणे येणा-या बिलातुन पैसे वसूल करावेत. वजनकाट्याला उशीर का झाला याबाबत महापौर यांनी माहिती द्यावी. यास जबाबदार असणा-यांवर दप्तर दिरंगाई ची कारवाई करा.

**मा.आयुक्त साहेब :** खुलासा मागवतो.

**मा.श्री.गणेश कवडे :** 13 तारखेला कोंडवाडयातील जनावरांचा लिलाव ठेवला आहे.

**उपायुक्त श्री.डांगे :** पारंजरापोळला द्यायला कॉटॅक्ट केला ते घेवू शकत नाही. शेतकरी जर आले तर आपण देवू.

**मा.श्री.गणेश कवडे :** महाराष्ट्र प्रिझरव्हेशन अक्ट साठी आपण देवू शकत नाही. सध्या महाराष्ट्रात गोहत्या बंदी चालू आहे. यातुन काही घटना घडू शकते. संबंधित जे काही जनावरे असतील संबंधित गोशाळांना द्या. फौंडेशन घ्यायला तयार असतील तर त्यांना द्या. 13 तारखेचा लिलाव रद्द करा.

**उपायुक्त श्री.डांगे :** ठिक आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** ढवणवस्ती लेखानगर, पाण्याचा प्रचंड विस्कळीतपणा झाला आहे त्या लोकांना पाणी येत नाही. विस्कळीतपणा जादा झालेला आहे. लोकांचे पाण्याचे प्रश्न आहेत. पाणी नेमके जाते कुठे. हा विस्कळीतपणा थांबणार आहे कि नाही.

**इंजिनियर श्री सातपुते :** ढवणवस्ती पाणी प्रश्न संदर्भात आयुक्त साहेब यांचे दालनात चर्चेनुसार 36 लाखाचे एस्टीमेट तयार केले.आहे नविन बजेटमध्ये निधी मंजूर झाल्यानंतर निविदा मंजूर केली जाईल

**मा.श्री.संपत बारस्कर :** पाणीच नाही मग लाईन टाकून काय उपयोग. नागरिकांना अर्धा तास फोनवर उत्तर द्यावे लागतात. ठेकेदारांचे बिल निघत नाही.

**इंजिनियर श्री सातपुते :** अमृतचे जेंव्हा पाणी वाढेल तेंव्हा मार्ग निघेल. एरिया वाढत चालला त्यामुळे पाणी कमी पडते. लोकसंख्या वाढत आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** महिन्या भरापुर्वी पाणी चांगले येत होते. आता का येत नाही. मग बंद कसे झाले.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** ढवणवस्ती निर्मलनगर वसंतटेकडी या परिसरासाठी जुन्या टाकीतुन तेथील उंच टाकीत पंपाचे पाणी घ्यायचो आता नविन टाकी चालू केली. पीएमसीने सांगीतलेल्या नुसार पंप बसविले पण डिस्चार्ज मिळत नाही. उंच टाकीत पाणी घेवून ढवणवस्तीला पाणी मिळू शकते.

**मा.आयुक्त साहेब :** जुन्या ईएसआर मधुन पाणी जाणे बंद आहे. नविन ईएसआर केला. पुर्वीच्या ईएसआर मध्ये पाईपलाईन खाली होती. त्यामुळे प्रेशर मिळत नाही. असे मला सांगीतले. पंपाचा प्रयोग करु. इतर ठिकाणी पाणी जास्त मिळते त्याबाबत पाहणी करु.

**मा.श्री.संपत बारस्कर :** पाईपलाईन रोडला रिटनचे पाणी येते. त्याला 24-25 आटे दिले तर प्रोफेसर कॉलनी पर्यतच्या भागास व्यवस्थीत पाणी पुरवठा होवू शकतो.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :** रिटनचे पाणी सोडतो. त्याचवेळी नागापूरचा पंप ओव्हर फ्लो होतो. फक्त ढवणवस्ती साठी टाकीतुन पाणी वितरीत करतो. पंप डिस्चार्ज होतो त्यामुळे प्रत्यक्षात पाहिजे तेव्हढे पाणी उपलब्ध होत नाही. त्यासंदर्भात एमजीपीच्या अधिका-यांशी चर्चा केली. 50 एचपीचा आणखी नविन पंप बसविणार आहोत. दोन तीन दिवस लागतील.

**मा.श्री.संपत बारस्कर :** वॉर्डात काही ठिकाणी वॉल लागतात ते वॉल आले का. वॉल आपल्या कोणी देत नाही. ठेकेदार रडतात.

**मा.आयुक्त साहेब :** गेल्या सात आठ वर्षात त्यांचे पैसेच दिले नाही. मी आल्यानंतर थोडे थोडे द्यायला सांगीतले 40 कोटी मी एकदम देवू शकत नाही. कॉन्ट्रक्टरला विश्वासात

घ्यावे लागते. तेंव्हा ते कामे करतात.

**मा.श्री.संपत बारस्कर :** लोकांनी सांगीतलेल्या समस्या सोडविल्या पाहीजेत.

**मा.महापौर साहेब :** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट 14 व्या वित्त आयोगातून प्राप्त निधीतील व्याजातुन प्रस्तावित केलेले अनुक्रमांक 1 ते 15 मुद्यांतील खर्चाच्या कार्योत्तर मंजूरीस ही सभा मान्यता देत आहे. मुद्दा क्रमांक 2 कोव्हीड - 19 चा प्रादुर्भाव झालेल्या रुग्णांकरीता जेवण व चहापाण्याची व्यवस्था करणे रक्कम रु.22 लाख 50 हजार या रक्कमेतुन अहमदनगर महानगरपालिकेमार्फत कोव्हीड -19 प्रतिबंधात्मक उपक्रम, उपाययोजना तसेच सुचना समाज माध्यम व प्रचलित माध्यमांव्दारे प्रसिध्दी करणेकामी मे.डिझाईन बाईट मेडिया एजन्सी, अहमदनगर यांनी कोव्हीड काळात केलेल्या कामाचे देयक रक्कम रु.5,16,132/- अदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे. याबाबत संबंधित विभागाने पुढील कार्यवाही करावी. 14 व्या वित्तीय आयोगाच्या व्याजातुन अनुक्रमांक 1 ते 8 मुद्दे प्रस्तावित केले असुन 1 ते 7 मुद्यांस मंजूरी देण्यांत येत आहे व मुद्दा क्रमांक 8 एस.टी.पी.प्लँन्ट पर्यत जाणेकामी कॉक्रींट रस्ता विकसीत करणे रक्कम रु.84 लक्ष या कामाऐवजी कोव्हीड - 19 करीता रोजंदारी वरील कर्मचारी यांचे मानधन देणेकामी सदरची रक्कम वापरणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच बुरुडगांव ग्रामपंचायत हद्दीतील कचरा संकलन व वाहतुक करणेकामी एक घंटागाडी महानगरपालिके मार्फत निशुल्क उपलब्ध करुन देणेस ही सभा मान्यता देत आहे.

. नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

सुचक - मा.श्री.अनिल माधवराव शिंदे

अनुमोदक - मा.श्री.गणेश खंडेराव कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७        प्रस्ताव क्रमांक : ३३        दिनांक :- १२/०१/२०२२**

---

प्रस्तावाचा विषय : 14 व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधी वरील व्याजेतुन घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील पुढील कामे करुन घेणेकामी मा.महासभेकडे सादर करीता मंजूरी मिळणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे डीपीआर मंजूरीनुसार बुरुडगांव कचरा डेपोवर स्थापत्य कामे चालू आहे. त्या नुसार सदरील कामे पुर्ण करणेकामी मंजूर डीपीआर तरतुदची रक्कम प्रत्यक्षात काम करतांना कमी पडत आहे. त्यानुसार १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त रक्कमे वरील व्याज रक्कम रु.६,५०,००,०००/- रुपयाचे नियोजन करुन मा.आयुक्त यांच्या दिनांक ०९/०८/२०२१ रोजीच्या मंजुरीने घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र.४४३ दिनांक १६/०९/२०२१ रोजी मा.महासभेच्या मंजुरी करीता प्रस्तावना सादर करण्यांत आलेली आहे. त्यानुसार १४ व्या वितत आयोगातुन प्राप्त निधी वरील व्याजे बाबत माहे सप्टेंबर अखेर अर्थ विभागामार्फत माहिती घेतली असता व्याज एकुण रक्कम रु.७,३६,०९,५७३/- उपलब्ध आहे. त्यानुसार रक्कम रु.६,५०,००,०००/- चे नियोजन करण्यांत आलेले असल्याने उर्वरीत शिल्लक रक्कम रु.८६,०९,५७३/- व्याजेचे खालील प्रमाणे नियोजन करणे उचित वाटते.

| अ.क्र. | तपशिल | अंदाजपत्रकीय रक्कम | आवश्यक निधी |
|---|---|---|---|
| १ | मान्सुन शेड बांधणे व कंम्पोस्टींग प्लॅन्टसाठी शेड उभारणे कामी | रु.१,३०,३९,८६२/- | रु.६३,३०,६०३/- |
| २ | वजन काटा उभारण्यासाठी स्थापत्तीक कामे | रु.७,९५,८८९/- | रु.७,९५,८८९/- |
| ३ | १४ व्या वित्त आयोग सन २०१६-२०१७ या लेखाशिर्षका मधील मा.हरीत लवाद यांचेकडे झालेल्या सुनावणीनुसार सावेडी कचरा डेपो भोवती हरीत पट्टे विकसीत केलेबाबत | रु.१४,८३,०८१/- | रु.१४,८३,०८१/- |
| | | | **रु.८६,०९,५७३/-** |

वरील प्रमाणे १ ते ३ मुद्दे कामांकरीता निधी लागणार आहे. त्याकरीता येणा-या अंदाजे रक्कम रु.८६,०९,५७३/- खर्च करणेकामी १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त व्याजेतुन शिल्लक रक्कम रु.८६,०९,५७३/- निधीतुन खर्च करणेकामी मा.महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कामे अत्यावश्यक सेवेतील असल्याने त्याकरीता एकुण १४ व्या वितत आयोगातुन

प्राप्त निधी वरील व्याज रककम रु.८६,०९,५७३/- रक्कमेतुन वरील प्रमाणे प्रस्तावित रककम रु.८६,०९,५७३/- रुपयास मा.महासभेकडे मंजूरीकामी पाठविणे उचित वाटते.

सबब वरील प्रमाणे १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त व्याजेतुन खर्च करण्यास मा.महासभेची मंजुरीकामी मंजूरीस्तव सविनय सादर.

यावर घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांची स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचे प्रस्तावानुसार अ प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, महासभेच्या मान्यतेसाठी.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :**

**मा.श्री.संपत बारस्कर :** विषय मंजूर करा.

**मा.श्री.गणेश कवडे** : विषय मंजूर करा.

**मा.महापौर साहेब :** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. 14 व्या वित्त आयोगातून प्राप्त निधीवरील व्याजेतुन घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील प्रस्तावीत केलेले 1 ते 3 कामे करुन घेणेकामी ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

सुचक - मा.श्री.शिंदे अनिल माधवराव

अनुमोदक - मा.श्री.गणेश खंडेराव कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : ३४ दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय** : नागापुर बोल्हेगांव प्रभाग क्रमांक 07 या भागातील जिल्हापरीषद शाळा ते केशव कॉर्नर ते सोनवणे वस्ती ते शंभुराजे चौक ते गणेश चौक ते बोल्हेगांव फाटा या मुख्य रस्त्याला "**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग**" असे नामकरण करणे बाबत

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

**संदर्भ :** 1) मा.श्री.कुमार बबनराव वाकळे, नगरसेवक तथा माजी सभागृह नेता, अहमदनगर महानगरपालिका यांची दि.30 ऑगष्ट 2021 चे पत्र.

2) मा.श्री.कुमार बबनराव वाकळे, नगरसेवक तथा माजी सभागृह नेता, अहमदनगर महानगरपालिका यांनी दि.30 ऑगष्ट 2021 रोजी मा.महापौर,मा.आयुक्त व मा.उपमहापौर यांना दिलेले पत्र.

3) मा.नगरसेवक श्री.अशोक किसन बडे यांचे दि.31 ऑगष्ट 2021 रोजी मा.महापौर यांना दिलेले पत्र.

4) मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर, अहमदनगर महानगरपालिका यांचे दि.06 सप्टेंबर 2021 रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार रिपोर्ट की, नागापुर बोल्हेगांव प्रभाग क्र.07 या भागातील जिल्हा परीषद शाळा ते केशव कॉर्नर ते सोनवणे वस्ती ते शंभुराजे चौक ते गणेश चौक ते बोल्हेगांव फाटा या मुख्य रस्त्याला "**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग**" असे नामकरण करण्यांत यावे असे निवेदन इकडेस प्राप्त झालेले आहे.

सदर पत्रामध्ये नमुद करण्यात आलेले आहे की, जिल्हा परीषद शाळा ते केशव कॉर्नर ते सोनवणे वस्ती ते शंभुराजे चौक ते गणेश चौक ते बोल्हेगांव फाटा असा अत्यंत महत्वाचा व मुख्य रस्ता आहे. हा रस्ता अनेक उपनगराला जोडला गेलेला आहे. (मनोलीला नगर,राघवेंद्र नगर,संस्कृती नगर,साईनगर,नवनाथनगर,राजेसंभाजी नगर इ.) या रोडने येणा-या जाणा-याला कुठलेही ठिकाण उपजत नाही. या रोडला नामकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच या रोडला अद्याप कोणतेही नाव दिलेले नाही.

**छत्रपती शिवाजी राजे भोसले** 19 फेब्रुवारी 1630 ते 3 एप्रिल 1680 हे मराठा समाजाचे संस्थापक होते. भोसले कुळातील या राजाने विजापुरच्या आदीलशाही विरुध्द आणि मोगल

सम्राज्या विरुध्द संघर्ष करुन मोठया शिताफीने मराठा स्वराज्य स्थापन केले. शिस्तबध्द लष्कर व सुसंघटीत प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रातिक राज्य उभे केले. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल पंडीत नेहरुंनी आपल्या डिस्कवरी ऑफ इंडिया या ग्रंथात म्हणतात,छत्रपती शिवाजी महाराज प्रतिहल्ला करणा-या राष्ट्रवादाचे प्रतिक होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी जुन्या इतिहासातून प्रेरणा मिळविली. महाराज अत्यंत धैर्यशिल आणि उत्कृष्ठ नेतृत्वगुण असणारे नेते होते. त्यांनी स्वराज्यासाठी चिवटपणे लढणारा गट म्हणुन मराठी जनांना एकत्र केले. त्यांच्या मागे राष्ट्रीयत्वाची पार्श्वभुमी उभी केली आहे. आणि गटस अशी चेतना दिली की, या गटाशी धडका घेत मुगल साम्राज्य अखेर मोडकळीस आणले. त्यानंतर संपुर्ण भारतावर प्रभुत्व प्रस्थापीत होईपर्यत मराठयांचा राज्यविस्तार होतच राहीलजा शेतक-यांना मोफत कर्ज वाटप तसेच शेतक-यांना बि-बियाने मोफत देणे यांची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांनी केली. सर्व समाज घटकातील महिलांचे रक्षण केले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी समाजाला प्रेरणा देणारे असे उल्लेखणीय कार्य केलेले आहे. यामुळे सदर रस्त्याचे नामकरण करणेबाबत संदर्भीय पत्रानुसार मा.श्री.कुमार बबनराव वाकळे, नगरसेवक तथा माजी सभागृह नेता, मा.नगरसेवक श्री.अशोक किसन बडे व मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर, अहमदनगर महानगरपालिका यांनी पत्र देवून सुचविले आहे.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परीषद शाळा ते केशव कॉर्नर ते सोनवणे वस्ती ते शंभुराजे चौक ते गणेश चौक ते बोल्हेगांव फाटा या रस्त्यास महानगरपालिकेमार्फत अद्यापपर्यंत कोणतेही नाव दिलेले नाही. त्यामुळे कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस, भुखंडास अथवा मा.महासभेस असल्याने अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परीषद शाळा ते केशव कॉर्नर ते सोनवणे वस्ती ते शंभुराजे चौक ते गणेश चौक ते बोल्हेगांव फाटा या मुख्य रस्त्याला "**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग**" असे नामकरण करणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट स.सादर.

यावर शहरअभियंता यांचा अभिप्राय की, वरील अ प्रमाणे कार्यवाहीस हरकत नाही. आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ व ब प्रमाणे अभिप्रायानुसार मा.महासभेसमोर निर्णयास्तव पाठविण्यास मंजूरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :**

**मा.महापौर साहेब :** विषय मंजूर पुढील विषय घ्या. विषय क्रमांक 34 ; 35

**मा.श्री.कुमार वाकळे :** अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाचे घाट उत्तरप्रदेशमध्ये बांधले. जेजूरी असेल विकासासाठी पैसे त्यांनी दिले. जंगलतोडी, रस्ता बंदीचा कायदा आणला. पतीच्या निधनानंतर मोलाचा वाटा त्यांचा आहे. त्यांचा जन्म चौंडी या गावी झालेला आहे. हे आपणांस भुषणावह आहे. पत्ता सांगण्यास अडचण येत होती. त्यामुळे आरोग्य केंद्रास अहिल्यादेवी होळकर यांचे नांवे द्यावे. त्यांच्या कार्यास फुल ना फुलाची पाकळी म्हणून आपलेही योगदान राहील. नागापूर बोल्हेगांव प्रभाग क्र. 7 या भागातील आंबेडकर चौक येथील आरोग्य केंद्रास **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आरोग्य केंद्र** असे नांव द्यावे अशी मी बोल्हेगांव नागापूरकरांच्या वतीने विनंती करतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांचे कार्यकिर्दीत सुशासन राबविले. मोठी धरणे बांधली. स्वराज्याच्या रक्षणासाठी किल्ले बांधले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात शेतक-यांना बिन व्याजी कर्ज मिळत होते. धान्य वाटप होत होते. धान्य पिकवून त्यातुन कर्ज फेड होत होती. सामाजिक सलोखा ठेवला जातो. जाती व्यवस्था रद्द केली. कसेल त्याची जमिन हा कायदा इ शिवाजी महाराजांनी काढला. त्यांचे या कार्यातून आपण उतराई होवू शकत नाही. येणा-या नविन पिढीला आदर्श मिळाला पाहीजे. यासाठी नागापूर बोल्हेगांव प्र.क्र. 7 या भागातील जिल्हापरिषद शाळा केशव कॉर्नर ते सोनवणे वस्ती ते शंभूराजे चौक ते गणेश चौक ते बोल्हेगांव फाटा या मुख्य रस्त्याला '**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग** असे नांव देण्याबाबत ठराव मंजूर करावा ही विनंती

**मा.श्री.मदन आढाव :** छत्रपती शिवाजी महाराजांचे नांव द्यावे आम्ही पत्र दिले होते.

**मा.श्री.अशोक बडे :** हा जो विषय आहे त्यात आपल्या सर्वांचे पत्र आहे एक जागा फिक्स करुन मार्बल वगैरे लावावे. 2017 साली आरोग्य केंद्र मी मंजूर केले.

**मा.महापौर साहेब :** पुढचा विषय घ्या.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. नागापुर बोल्हेगांव प्रभाग क्रमांक 07 या भागातील जिल्हापरीषद शाळा ते केशव कॉर्नर ते सोनवणे वस्ती ते शंभुराजे चौक ते गणेश चौक ते बोल्हेगांव फाटा या मुख्य रस्त्याला "**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग**" असे नामकरण, नांव देणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच सदर निश्चित केलेल्या जागा नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.कुमार बबनराव वाकळे

अनुमोदक - मा.श्री.अशोक किसन बडे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : ३५ दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** नागापुर बोल्हेगांव प्रभाग क्रमांक 07 या भागातील आंबेडकर चौक येथील आरोग्य केंद्राला "**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आरोग्य केंद्र**" असे नामकरण करणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

**संदर्भ :** 1) मा.श्री.कुमार बबनराव वाकळे, नगरसेवक तथा माजी सभागृह नेता, अहमदनगर यांचे दिनांक 30 ऑगष्ट 2021 चे पत्र

2. मा.श्री.कुमार बबनराव वाकळे, नगरसेवक तथा माजी सभागृह नेता, अहमदनगर यांनी दिनांक 30 ऑगष्ट 2021 रोजी मा.महापौर, मा.आयुक्त व मा.उपमहापौर यांना दिलेले पत्र.
3. मा.नगरसेवक श्री.अशोक किसन बडे यांचे दि.31 ऑगष्ट,2021 रोजी मा.महापौर यांना दिलेले पत्र.
4. मा.नगरसेवक श्री.मदन संपत आढाव यांचे दिनांक 31 ऑगष्ट,2021 चे पत्र.
5. मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर, अहमदनगर महानगरपालिका यांचे दिनांक 06 सप्टेंबर, 2021 रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार रिपोर्ट की, नागापुर बोल्हेगांव प्रभाग क्र.07 या भागातील आंबेडकर चौक येथील आरोग्य केंद्राला "**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आरोग्य केंद्र**" असे नामकरण करण्यांत यावे असे निवेदन इकडेस प्राप्त झालेले आहे. सदर पत्रामध्ये नमुद करण्यांत आलेले आहे की, नागापुर बोल्हेगांव प्रभाग क्र.07 या भागातील आंबेडकर चौक येथील आरोग्य केंद्राला अद्याप कोणतेही नाव दिलेले नसुन महानगरपालिकेचे प्रशस्त आरोग्य केंद्र आहे. सद्यस्थितीत या आरोग्य केंद्रात कोविड-19 लसीकरण चालू आहे. तसेच या आरोग्य केंद्रामुळे नागापुर बोल्हेगांव या भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या सेवेसाठी अत्यंत जवळचे आरोग्य केंद्र आहे. या आरोग्य केंद्राला अद्यापपर्यंत कोणतेही नाव दिलेले नाही. त्यामुळे येथे येणा-या नागरिकांना येण्याचे अचुक ठिकाण उमजत नाही.

तसेच "**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर** यांचा जन्म मे 31 इ.स.1725 रोजी महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला अहिल्यादेवी होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिध्द होत्या. राणी अहिल्यादेवी यांनी भारत भरात अनेक हिंदु मंदिरे व

नदीघाट बांधले किंवा तयाचा जिर्णोध्दार केला. महेश्वर व इंदुर या गांवांना सुंदर बनविले. त्या अनेक देवळयांच्या आश्रयदात्या होत्या. तयांनी अनेक तिर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यात व्दारका,काशी,उज्जैन,नाशिक,परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वैरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देउळ बघुन अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देउळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवहालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेस कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती. लोकमाता, राजमाता, विरांगणा, पुण्यश्लोक, देवी अगाजल, निर्मळ मातोश्री या सगळया पदव्या अहिल्यादेवी होळकरांना लोकांनी अर्पण केलेल्या होत्या. एक राज्यशासक म्हणुन त्यांचे कर्तृत्व फार महत्वाचे आहे. अपार शहाणपण आणि तडफ असणारी ती अलौकीक स्त्री होती. तसेच तयांनी जंगलातील झाडे तोडण्यावर बंदी केली होती. तसेच तयांच्यावर नियंत्रण पण आणले होते. ठिकठिकाणी नदी, घाट, देवळे, दर्गा, धर्मशाळा, विहीरी, रस्ते, असे त्यांचे कार्य आहे. सर्व धर्मियांसाठी त्यांनी मदत केली म्हणुनच केवळ धार्मिक इतकीच त्यांची ओळख नाही. त्यांच्या दुरदृष्टीमुळे त्यांनी केलेले कार्य आजही जिवंत आहे. त्यांच्यात अनेक सदगुण बहरास आलेले होते. अठरा सतींच्या किंकाळया आणि सर्व जिवलगांचे मृत्यू तयांना बघावे लागले. शेवटी त्या एकटया राहिल्या. संसाराचा हा उन्हाळा सोसून ही बाणेदार स्त्री कुणालाही शरण न जाता कर्तव्यकठोर असा कर्मयोग आचरत राहिली. प्रजेचे सुख बघत राहिली दुखाःला खंबीरपणे सामोरे जातांनाही आपले कर्तव्य ठामपणे तयांनी केले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी समाजाला प्रेरणा देणारे अशी उल्लेखणीय कार्य केलेले आहे.

यामुळे सदर रस्त्याचे नामकरण करणेबाबत संदर्भिय पत्रानुसार मा.श्री.कुमार बबनराव वाकळे, नगरसेवक तथा माजी सभागृह नेता, मा.नगरसेवक श्री.अशोक किसन बडे, श्री,मदन संपत आढाव,व मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर, अहमदनगर महानगरपालिका यांनी पत्र देवून सुचविले आहे.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बोल्हेगाव प्रभाग क्र.07 या भागातील आंबेडकर चौक येथील आरोग्य केंद्राला महानगरपालिका मार्फत अद्यापपर्यंत कोणतेही नांव दिलेले नाही. त्यामुळे कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास,चौकास,इमारतीस, भुखंडास अथवा सीागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 63(9) अन्वये मा.महासभेस असल्याने अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळा ते केशव कॉर्नर ते सोनवणे वस्ती ते शंभुराजे चौक ते गणेश चौक ते बोल्हेगांव फाटा या रस्त्यास "**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आरोग्य केंद्र**" असे नामकरण करणे बातचा प्रस्ता मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट स.सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, वरील अहवालानुसार मनपाचे मालकीचे आरोग्य केंद्राचे अ प्रमाणे मा.नगरसेवक यांचे मागणी नुसार नामकरण करणेस प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणे योग्य. आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ व ब मधील अहवालानुसार मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविण्यांस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :**

**मा.महापौर साहेब :** विषय मंजूर पुढील विषय घ्या. विषय क्रमांक 34 ; 35

**मा.श्री.कुमार वाकळे :** अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाचे घाट उत्तरप्रदेशमध्ये बांधले. जेजूरी असेल विकासासाठी पैसे त्यांनी दिले. जंगलतोडी, रस्ता बंदीचा कायदा आणला. पतीच्या निधनानंतर मोलाचा वाटा त्यांचा आहे. त्यांचा जन्म चौंडी या गावी झालेला आहे. हे आपणांस भुषणावह आहे. पत्ता सांगण्यास अडचण येत होती. त्यामुळे आरोग्य केंद्रास अहिल्यादेवी होळकर यांचे नांवे द्यावे. त्यांच्या कार्यास फुल ना फुलाची पाकळी म्हणून आपलेही योगदान राहील. नागापूर बोल्हेगांव प्रभाग क्र. 7 या भागातील आंबेडकर चौक येथील आरोग्य केंद्रास **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आरोग्य केंद्र** असे नांव द्यावे अशी मी बोल्हेगांव नागापूरकरांच्या वतीने विनंती करतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांचे कार्यकिर्दीत सुशासन राबविले. मोठी धरणे बांधली. स्वराज्याच्या रक्षणासाठी किल्ले बांधले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात शेतक-यांना बिन व्याजी कर्ज मिळत होते. धान्य वाटप होत होते. धान्य पिकवून त्यातुन कर्ज फेड होत होती. सामाजिक सलोखा ठेवला जातो. जाती व्यवस्था रद्द केली. कसेल त्याची जमिन हा कायदा इ शिवाजी महाराजांनी काढला. त्यांचे या कार्यातून आपण उतराई होवू शकत नाही. येणा-या नविन पिढीला आदर्श मिळाला पाहीजे. यासाठी नागापूर बोल्हेगांव प्र.क्र. 7 या भागातील जिल्हापरिषद शाळा केशव कॉर्नर ते सोनवणे वस्ती ते शंभूराजे चौक ते गणेश चौक ते बोल्हेगांव फाटा या मुख्य रस्त्याला **'छत्रपती शिवाजी महाराज मार्ग** असे नांव देण्याबाबत ठराव मंजूर करावा ही विनंती

**मा.श्री.मदन आढाव :** छत्रपती शिवाजी महाराजांचे नांव द्यावे आम्ही पत्र दिले होते.

**मा.श्री.अशोक बडे :** हा जो विषय आहे त्यात आपल्या सर्वांचे पत्र आहे एक जागा फिक्स करुन मार्बल वगैरे लावावे. 2017 साली आरोग्य केंद्र मी मंजूर केले.

**मा.महापौर साहेब :** पुढचा विषय घ्या.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. नागापुर बोल्हेगांव प्रभाग क्रमांक 07 या भागातील आंबेडकर चौक येथील आरोग्य केंद्राला "**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आरोग्य केंद्र**" असे नामकरण, नांव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागा नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.मदन संपत आढाव

अनुमोदक - मा.श्री.कुमार बबनराव वाकळे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : ३६ दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिकेमधील कायम पात्र कर्मचारी / अधिकारीयांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह देणेकामी मा. पदाधिकारी, प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये करारपत्र करुन सदर विषयी मा. महासभेची पुर्व मंजुरी करीता सदरचा प्रस्ताव मा. महासभेकडे पाठविणे बाबत.**

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : १) अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचेकडील जा. क्र. १९ / श्रमिक / २०२१ दिनांक ०२/०९/२०२१ रोजीची संप नोटीस.

२) जा.क्र.आस्था. २९९७ दिनांक १४/०९/२०२१ अन्वयेचे पत्र.

३) मा. सहा. कामगार आयुक्त, अहमदनगर यांचेकडील जा.क्र. / सकाआ / अ.नगर / औविअ/ १८९३/ २०२१ दि.०३/०९/२०२१ चे पत्र.

४) दिनांक १७/०९/२०२१ रोजी मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमधील संयुक्त बैठक.

५) जा.क्र.आस्था. ३०८० दिनांक २३/०९/२०२१ अन्वयेचे पत्र.

६) मा. महापौर यांचेकडील जा.क्र.२३४ दिनांक २३/०९/२०२१ रोजीचे संयुक्त बैठकी बाबतचे पत्र.

७) दिनांक २८/०९/२०२१ रोजी मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमधील संयुक्त बैठक.

८) मा. महापौर यांचे दालनामध्ये दिनांक २८/०९/२०२१ रोजी मा. महापौर, व इतर मा. पदाधिकारी तसेच मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमधील जा.क्र.महापौर कार्यालय २६७ दिनांक ०४/१०/२०२१ अन्वये संयुक्त बैठकीमधील निर्णयाबाबतचे इतिवृत्त.

९) मा. पदाधिकारी, प्रशासन व कामगार युनियन यांचेमधील झालेला करारनामा.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, मा. कॉ. आनंदराव वायकर, सरचिटणीस अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी त्यांचेकडील जा. क्र. १९ / श्रमिक / २०२१ दिनांक ०२ / ०९ / २०२१ अन्वये औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम २२ (१) नुसार संप नोटीस देऊन परिशिष्टातील मागण्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेतील सर्व कामगार दिनांक १९/०९/२०२१ पासुन किंवा त्यानंतर संपावर जातील असे नमुद करुन संप नोटीसमध्ये सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये खालील प्रमाणे मागण्या केलेल्या होत्या.

१) दि. ०४/११/२०२१ रोजी दिवाळी सण असल्याने महानगरपालिकेतील सर्व कामगारांना सन २०२० - २१ या सालासाठी त्यांच्या सर्व भत्यासह होणा-या वार्षिक मिळकतीच्या २०% बोनस म्हणुन दिवाळी सणापुर्वी अदा करण्यात यावा.

२) महानगरपालिकेतील सर्व कायम, रोजंदारी व मानधनावरील कामगारांना दिवाळी सणासाठी सानुग्रह अनुदानापोटी रक्कम रु. २०,०००/- (अक्षरी रु.वीस हजार मात्र) दिवाळीपुर्वी विनाअट देण्यात यावी.

अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचेकडील जा. क्र. १९ / श्रमिक / २०२१ दिनांक ०२ / ०९ / २०२१ अन्वयेच्या संप नोटीस पत्राच्या अनुषंगाने दिनांक १७/०९/२०२१ रोजी मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये संयुक्त बैठक आयोजित करण्यात आलेली होती, सदर संयुक्त बैठकीमध्ये निर्णय न झाल्याने दिनांक २८/०९/२०२१ रोजी पुनश्चः संयुक्त बैठक आयोजित करण्यात येत असलेबाबत निर्णय घेण्यात आलेला होता, त्यानुषंगाने जा.क्र.आस्था. ३०८० दिनांक २३/०९/२०२१ अन्वयेच्या पत्रानुसार दिनांक २८/०९/२०२१ रोजी सकाळी ११: वाजता मनपा प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये पुनश्चः संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली असता त्या बैठकीमध्ये निर्णय होवू शकला नाही, दरम्यानच्या काळात मा. महापौर साहेब यांनी त्यांचेकडील जा.क्र.२३४ दिनांक २३/०९/२०२१ रोजी पत्र देवून मनपा कामगार युनियन यांचे सानुग्रह अनुदान मागणी संप नोटीसाच्या अनुषंगाने मा. महापौर व इतर मा. पदाधिकारी यांचे समवेत मनपा प्रशासन, व कामगार युनियन यांचे पदाधिकारी यांचेमध्ये दिनांक २८/०९/२०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता संयुक्त बैठक आयोजित करण्यात येत असलेबाबत सुचित केलेले होते. त्यानुसार त्याच दिवशी दिनांक २८/०९/२०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता सदर संयुक्त बैठक मा. महापौर यांचे दालनात आयोजित करण्यात आली असता त्या बैठकीस मा. महापौर, व मा. सभापती, स्थायी समिती व इतर मा. पदाधिकारी यांचे समवेत मनपा प्रशासन व कामगार युनियन पदाधिकारी यांची संयुक्त बैठक झाली, महापौर कार्यालय यांचेकडील जा.क्र. २६७ दि. ०४/१०/२०२१ नुसार बैठकीच्या इतिवृतानुसार त्यामध्ये " बैठकीत चर्चा झाली असून कामगार युनियनची मागणी व पदाधिकारी, अधिकारी यांनी घेतलेला निर्णय कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान ८ हजार ५०० रुपये व सहाव्या वेतन आयोगाचा फरकाचा १ हप्ता देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. कामगार युनियचे पदाधिकारी यांनी सदरचा निर्णय मान्य केला. सदरची रक्कम कर्मचा-यांना दिवाळी सणाच्या १५ दिवस आधी देण्याबाबत संबंधीत विभागाने योग्य ती कार्यवाही करावी." असे नमूद करुन सुचित केलेले होते.

त्यानुषंगाने मा. पदाधिकारी, प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये सन २०२० - २०२१ दिवाळी सणानिमित्त करारानामानुसार पात्र कायम कर्मचा-यांना प्रत्येकी रु. ८,५००/- इतका सानुग्रह अनुदान देणेकामी करारनामा करण्यात आलेला आहे. (**सोबत :** करारनामा मुळ प्रत.)

जा.क्र. महापौर कार्यालय यांचेकडील बैठकीच्या इतिवृतामधील निर्णयानुसार की, अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांच्या सहावा वेतन आयोगाचा फरकाबाबत ११ वा हप्ता अदाईसाठी लेखा विभागाकडे यापुर्वी देयक पाठविण्यात आलेले आहे.

दरम्यानच्या काळात अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी दिनांक ३०/०९/२०२१ रोजी पत्र देवून त्यामध्ये " दिवाळी सणाकरिता कर्मचा-यांना प्रत्येकी रु.८५००/- इतकी सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत निर्णय झालेला आहे, कामगारांना मिळावयाच्या सदरच्या रकमेतून प्रत्येकी रु. २००/- युनियन निधी पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टच्या कलम ७(२) (केकेके) अन्वये कपात करुन युनियन चेकद्वारे अदा करण्यात यावी." असे नमूद करुन सुचित केलेले आहे.

त्यानुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील कायम कर्मचा-यांना प्रत्येकी रु. ८५००/- सानुग्रह अनुदान मिळावयाच्या रक्कमेमधून प्रत्येकी रु. २००/- इतकी युनियन निधी म्हणून कपात करणे संयुक्तीक होईल.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०२१ - २०२२ या अंदाजपत्रकामध्ये सानुग्रह अनुदानाकरिता रक्कम १.५० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेमध्ये अंदाजे १८०० कायम कर्मचारी असून त्यानुषंगाने प्रत्येकी कायम कर्मचारी यांना रु. ८,५००/- याप्रमाणे दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान म्हणून देणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,५३,००,०००/- (अक्षरी रु. एक कोटी त्रेपन्न लाख ) इतका खर्च अपेक्षित होईल.

तरी जा.क्र. महापौर कार्यालय, २६७ दिनांक ०४/१०/२०२१ नुसार मा. पदाधिकारी, प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये झालेल्या करारानामाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील कायम कर्मचा-यांना प्रत्येकी रु. ८,५००/- सानुग्रह अनुदान देणेबाबतच्या निर्णयानुसार सदरचा विषय आर्थिक व धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने मा. आयुक्त यांचे मान्यता प्रस्तावानुसार सदरचा प्रस्तावास पुर्व मान्यतेकरिता मा. महासभकडे सदरचा प्रस्ताव पाठविणे संयुक्तिक होईल.

अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचेकडील जा.क्र.१९/श्रमिक/२०२१ दिनांक ०२/०९/२०२१ अन्वयेची संप नोटीसाच्या अनुषंगाने दिनांक २८/०९/२०२१ रोजी मा.महापौर यांचे दालनामधील झालेल्या बैठकीनुसार जा.क्र.महापौर कार्यालय २६७ दिनांक ०४/१०/२०२१ चे इतिवृत्तामधील निर्णयाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील पात्र कायम कर्मचा-यांना प्रत्येकी रु.८,५००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान देणे बाबत मा.पदाधिकारी, प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये तत्पुर्वी करारपत्र करुन घेणे आवश्यक आहे.

तरी उक्त प्रकरणी मा.मुलेप / मुलेअ यांचा अभिप्राय घेवून सदरची बाब आर्थिक व धोरणात्मक स्वरुपाची असल्याने मा.महासभेची पुर्व मंजुरी मिळणे करिता मा.महासभेकडे सदरचा प्रस्ताव सादर करणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, १) लेखा शिर्ष नमूद केले नाही. २) अ प्रमाणे मा.आयुक्त साहेब यांची मंजूरी घेवून व ब बाबत मा.आस्थापना प्रमुख यांनी दिलेल्या अभिप्रायाप्रमाणे प्रस्तावीत सानुग्रह अनुदान देणे बाबतची बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्याने क प्रमाणे मा.महासभेकडे सादर करणे उचित राहील.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ ब व क मधील अभिप्राय व मुलेप यांचे अभिप्रायानुसार कार्यवाही कोणेस मान्यतेस्तव सादर.

यावर अतिरिक्त आयुक्त साहेब, यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्यानुसार व मुलेप यांच्या अभिप्रायानुसार सदरचा विषय निर्णयास्तव मा.महासभेकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

चर्चा :

मा.श्री.

मा.महापौर साहेब : विषय क्रमांक ३६ मंजूर. पुढील विषय घेण्यांत यावा.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर अहमदनगर महानगरपालिका मधील कायम पात्र कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान प्रत्येकी रक्कम रु.८,५००/- इतका देण्यांस व सानुग्रह अनुदान बाबतच्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच दिपावली सणाच्या दृष्टीने महानगरपालिकेत मानधनावर काम करीत असलेले कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी. सानुग्रह अनुदान बीले तयार करणे व अदा करणेचे काम संबंधीत विभागाच्या वेतन अदाकर्ता विभागाने करावे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.विजय मोहनराव पठारे

अनुमोदक :- मा.श्री.शाम किसन नळकांडे

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : ३७ दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय** : गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठाण चारीटेबल ट्रस्ट-धर्माचे विश्वास्त संस्था यास घर घर लंगर सेवा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल करीता नाममात्र दरावर नागापूर येथील अॅमिनीटी जागा मिळणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

**संदर्भ :** 1) श्री.हरजितसिंग वधवा, अध्यक्ष गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान यांचा दिनांक 19 जुलै, 2021 रोजीचा अर्ज.

2. श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर यांचे दिनांक 11 ऑक्टोंबर 2021 रोजीचे पत्र.
3. श्री.अविनाश हरीभाउ घुले,सभापती,स्थायी समिती यांचे दिनांक 12 ऑक्टोबर 2021 रोजीचे पत्र.
4. श्री.संपत विजय बारस्कर, विरोधी पक्ष नेता यांचे दिनांक 11 ऑक्टोबर 2021 रोजीचे पत्र.
5. सौ.चोपडा मिना संजय, उपसभापती,महिला व बालकल्याण समिती यांचे दिनांक 12 ऑक्टोबर 2021 रोजीचे पत्र.

विषयांकित प्रकरणी संदर्भिय अर्जान्वये श्री हरजितसिंग वधवा, अध्यक्ष गुरुअर्जुन सामाजिक प्रतिष्ठान, अ.नगर यांनी नागापुर स.नं.24/2/1 (जुना स.नं.133/2/1) हिस्सा नं.57 (अॅमिनिटी) या जमिनीच्या मंजुर रेखांकनातील जागा घर घर लंगर सेवा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल या वापरासाठी विकसित करणेस विषयांकित जागा नाममात्र दरावर मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

तसेच महानगरपालिका सदस्य श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर, श्री,अविनाश हरीभाउ घुंले, सभापती,स्थायी समिती, श्री.संपत विजय बारस्कर, विरोधी पक्ष नेता, सौ.चोपडा मिना संजय उपसभापती, महिला व बालकल्याण समिती यांनी वरील संदर्भिय पत्रानुसार सदरचा विषय मा.सर्वसाधारण सभेत घेणेसाठी पत्र दिलेले आहे.

अहमदनगर शहराची वाढीव हद्दीची विकास योजना दिनांक एप्रिल 2012 मध्ये मंजूर असुन सदर जमिन या मंजुर विकास योजनेमध्ये येते. सदर जमिनीस इकडील जा.क्र.टीपी/रेखांकन 3419 दिनांक 23 एप्रिल 2015 अन्वये रेखांकनास अंतिम स्वरुपाची मंजुरी देण्यांत

आलेली आहे.

तदनंतर जमिन मालक श्री.जिवन तुकाराम शिंदे व इतर तीन यांनी टीडीआर च्या माध्यमातुन नागापुर स.नं.24/2/1 (जुना स.नं.133/2/1) हिस्सा नं 57 अ◌ॅमिनीटी प्लाट महानगरपालिकेकडे दस्त क्र.2616 दिनांक 05/05/2018 अन्वये मनपाकडे खरेदीखताव्दारे हस्तांतरीत केलेनंतर इकडील पत्र क्र.2145 दिनांक 09/05/2019 अन्वये नागापुर स.नं.24/2/1 (जुना स.नं.133/2/1) हिस्सा नं 57 मधील जमिन मालक श्री.जिवन तुकाराम शिंदे व इतर तीन यांना विकास हक्क हस्तांतरण प्रमाणपत्र 52 देण्यांत आलेले आहे.

विषयांकित नागापुर स.नं.24/2/1 (जुना स.नं.133/2/1) हिस्सा नं 57 या मंजूर रेखांकनातील अ◌ॅमिनीटी क्षेत्र 1359.37 चौ.मी. या जागेवर ◌ुेर◌ुार क्र.15597 अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे नावाची नोंद झालेली आहे. (सोबत 7/12 उतारा व अंतिम रेखांकन नकाशा जोडलेला आहे.)

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक 02/12/2020 रोजीच्या अधिसुचनेव्दारे लागु केलेल्या एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नियम क्र.3.5 मधील तरतुदी स्पष्ट आहेत. उक्त नियमावलीतील तरतुदीनुसार रेखांकनातील अ◌ॅमिनीटीच्या जागेत अनुज्ञेय असलेले वापरच अनुज्ञेय आहे.

विषयांकित जागा भाडेकराराने द्यावयाची झाल्यास सदर जागेचे मूल्य व भाडे निश्चिती करणेसाठी शासनाच्या नगरविकास विभागाकडील दिनांक 13 सप्टेंबर, 2019 रोजीच्या अधिसूचने नुसार मालमत्तांचे मूल्यांकन करणेसाठी मा.जिल्हाधिकारी, मा.आयुक्त आणि जिल्हा महानिबंधक यांची समिती गठीत करण्यांत आलेली आहे. तरी सदर सामिती मार्फत भाडे निश्चित करावे लागेल किंवा महानगरपालिका अधिनियम 1949 मधील तरतुदीनुसार मालमत्ता हस्तांतरण करणेचे अनुषंगाने विधीग्राह्य कार्यवाही करावी लागेल.

सबब अर्जदार संस्थेस मंजुर रेखांकनातील नागापुर स.नं.24/2/1 (जुना स.नं.133/2/1) हिस्सा नं 57 अ◌ॅमिनीटी महानगरपालिकेच्या मालकीची जागा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल साठी देणे बाबतचा प्रस्ताव मा.सव्रसाधारण सभेपुढे निर्णयास्तव ठेवणेसाठी रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर.

---*---

**चर्चा :**

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** महानगरपालिकेच्या कर्मचा;यांना त्या दवाखान्यात उपचारासाठी फायदा घ्यावा अशी अट टाका.कर्मचार्यांना मोफत उपचार करणे अशी अट टाका.

**मा.महापौर साहेब :** विषय क्रमांक 37 ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठाण चारीटेबल ट्रस्ट-धर्माचे विश्वास्त संस्था यास घर घर लंगर सेवा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल करीता नाममात्र दरावर नागापूर येथील अॅमिनीटी जागा विकसीत करणेस ही सभा मान्यता देत आहे. नगररचना विभागाने भाडे निश्चित करणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी तसेच याबाबत कार्यालयीन सोपस्कार पार पाडणेबाबत कार्यवाही करावी. अहमदनगर महानगरपालिकेची जागा हॉस्पीटल साठी देणार असल्याने महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना हॉस्पीटलमध्ये मोफत उपचार मिळावेत यादृष्टीने अटी-शर्ती मध्ये नमूद करणेंत यावे. व सदर हॉस्पीटलच्या विश्वस्त पदी मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका यांना घेणेबाबत अटी शर्तीत नमुद करावे. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**सुचक** - मा.श्री.बडे अशोक किसन

**अनुमोदक** - मा.श्री.अविनाश हरीभाउ घुले

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : ३८ दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** सावेडी स.नं.232/1 /1 ते 6, 242/1 पेकी या जागेमधिलमहानगरपालिकेच्या मालकीची जागा क्षेत्र 4411.50 चौ.मी.ही जागा सार्वजनिक कामासाठी मिळणे बाबत.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

**संदर्भ :** 1.श्री.किरण कालरा, अध्यक्ष,रोटरी क्लब,अहमदनगर यांचा दि.08 सप्टेंबर 2021 रोजीचा अर्ज.

2.श्री.गणेश पुंडलिक भोसले,उपमहापोर,अहमदनगर महानगरपालिका यांची दिनांक 18 ऑक्टोबर 2021 रोजी प्राप्त झालेली यादी.

3.श्री.अविनाश हरीभाउ घुले,सभापती स्थायी समिती, अहमदनगर महानगरपालिका यांची दिनांक 08 ऑक्टोबर 2021 रोजी प्राप्त झालेली यादी.

4. सौ.चोपडा मिना संजय,नगरसेविका,मनपा यांची दि.18 ऑक्टोबर, 2021 रोजी प्राप्त झालेली यादी.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी या कार्यालयाचा अहवाल खालील प्रमाणे सादर करीत आहे.

1. रोटरी क्लब,अहमदनगर यांनी संदर्भिय क्र.1 च्या अर्जान्वये सदर जागा सार्वजनिक वापरासाठी मिळणे बाबत मागणी केलेली आहे. तसेच मा.उपमहापौर,मनपा, मा.सभापती स्थायी समिती मनपा व मा.नगरसेविका, सौ.चोपडा यांनी संदर्भिय पत्र क्र.2 ते 4 अन्वये विषयांकित प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणे बाबत उचित कार्यवाही करणेसाठी कळविलेले आहे.

2. विषयांकित :सावेडी स.नं.232/1/1 ते 6, 242/1 पेकी या जागेचे रेखांकन मंजुर करताना शासन निर्णय क्र.टिपीएस-1615/24 प्र.क्र./16/2015 नवि-9 दिनांक 16 मे 2015 मधील अटीनुसार सदर जागेच्या 15 टक्के इतके क्षेत्र 4411.50 चौ.मी.हे सार्वजनिक सुविधा या वापरासाठी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यांत आलेले आहे. व सदर जागेस 7/12 उता-यावर मनपाच्या नावाची नोंद देखील झालेली आहे. (प्रत सोबत सादर)

3. अहमदनगर शहराच्या मंजुर विकास योजनेत (दुसरी सुधारीत) सदर जागा वाणिज्य विभागात दर्शविलेली आहे.

4. उपरोक्त जागा अहमदनगर महानगरपालिकेस शासन निर्णय क्र.टिपीएस-1615/24 प्र.क्र./16/2015 नवि-9 दिनांक 16 मे 2015 अन्वये सार्वजनिक सुविधा या वापरासाठी हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर क्षेत्रामध्ये महानगरपालिकेस अपेक्षित असल्यास एकत्रीकृत बांधकाम विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील सार्वजनिक सुविधा अंतर्गत अनुज्ञेय असणा-या बाबी अनुज्ञेय करता येतील.

5.तद्वतच सदर जागा भाडे कराराने द्यावयाची झाल्यास सदर जागेचे मूल्य व भाडे निश्चित करणेसाठी शासनाच्या नगरविकास विभागाकडील दि.13 सप्टेंबर 2019 रोजीच्या अधिसूचने नुसार मालमत्तांचे मुल्यांकन करणेसाठी मा.जिल्हाधिकारी, मा.आयुक्त आणि जिल्हा सह निबंधक यांची समिती गठीत करण्यांत आलेली आहे. तरी सदर समिती मार्फत भाडे निश्चित करावे लागेल किंवा मनपा अधिनियम 1949 मधिल तरतुदी नुसार मालमत्ता हस्तांतरण करणेच्या अनुषंगाने विधीग्राह्य कार्यवाही करावी लागेल. उपरोक्त प्रस्ताव पुढील निर्णयासाठी मा.महासभेपुढे सादर करणे योग्य होईल.

मा.सहाय्यक संचालक, नगररचना यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :**

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल याबाबत देखील प्रयत्न करण्यांत यावा.

**मा.महापौर साहेब :** विषय क्रमांक ३८ ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. सावेडी स.नं.232/1 /1 ते 6, 242/1 पैकी या जागेमधिल महानगरपालिकेच्या मालकीची जागा क्षेत्र 4411.50 चौ.मी.ही जागा रोटरी क्लब, अहमदनगर यांना सार्वजनिक कामासाठी देणेस ही सभा मान्यता देत आहे. नगररचना विभागाने भाडे

निश्चित करणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी. तसेच कार्यालयीन सोपस्कार पार पाडणेबाबत कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**सुचक -** मा.श्री.भोसले गणेश पुंडलिक

**अनुमोदक -** मा.श्री.गणेश खंडेराव कवडे

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : ३९ दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** माझी वसुंधरा अभियान 2.0 ची कार्यवाही करणेकामी मा.महासभेची मंजूरी घेणेकामी प्रस्तावास मंजूरी मिळणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग यांचे कडील पत्र क्र.नपप्र/2021/ कार्या/2/कावि/01-2021-22 दिनांक 01-09-2021 रोजीचे पत्रान्वये.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आपले अहमदनगर शहर स्वच्छ व सुंदर व्हावे यासाठी स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत दर वर्षी स्वच्छ सर्वेक्षणची कार्यवाही करण्यात येते त्याच प्रमाणे चालू वर्षा पासुन स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत कामे, सफाई मित्र अभियान व माझी वसुंधरा अभियान आपल्या महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहे.

त्यानुसार संदर्भीय पत्रानुसार माझी वसुंधरा अभियान 2.0 साठी प्राप्त टुलकीट नुसार फाटाके विक्री व वापर यावर बंधी करणेकरीता ठराव घेणे व अधिसुचना प्रसिध्द करणे आणि हवा गुणवत्ता निरीक्षण अहवाल तयार करणेबाबत मा.शासनाचे आदेश आहे.

सबब माझी वसुंधरा अभियान 2.0 साठी प्राप्त टुलकीट नुसार फटाके विक्री व वापर यावर बंदी करणेकरीता इराव घेणेकामी मा.महासभेकडे सादर करणे व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत नमुद कामामधील वृक्ष लागवड करणे, शहरासाठी वृक्षांचा डिपीआर बनविणे,वारसा वृक्ष, वृक्ष गणना करुन त्यांची जिओ टॅगिंग करणे,नर्सरीची निर्मिती करणे,शहरात नव्याने किमान 02 हरीत उद्यान करणे, फटाक्यांवर बंदी घालण्याच्या दिशेने पुढाकार घेणे, हवेच्या गुणवत्तेचा अहवाल किमान 9 वर आणणे, सायकलींग ट्रॅकची निर्मिती करणे, महानगरपालिकेस एक इलेक्ट्रीक वाहन खरेदी करणे, इलेक्ट्रीक वाहनास वापरा मध्ये आणणे कामी प्रोत्साहीत करणे, शहरात इलेक्ट्रीक वाहना करीता चार दिशेला चार चार्जिंग स्टेशनची निर्मिती करणे, शासकीय कार्यालयांचे वॉटर ऑडीट करणे, शासकीय कार्यालय येथे रेन वॉटर हार्वेस्टींग करणे, नदीचे सौदर्यीकरण करणे, विहीर पुर्नोज्जीवन करणे व सुशोभीकरण करणे, शासकीय कार्यालयांचे उर्जा लेखा परिक्षण करणे व कार्यालयांचे हरीत इमारतीत बदल करणे व शहरातील किमान 10 चौकांची सुशोभिकरणे करणे इत्यादी कामे अभियान अंतर्गत करणेबाबत सुचना आहे.

त्यानुसार वरील प्रमाणे सर्व कामांकरीता मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे. त्याकरीता सदरील प्रस्ताव मा.महासभेकडे मान्यतेकामी सादर करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :** नाही.

**मा.महापौर मह्रम :** ऑफिस रिपोर्ट मंजूर

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. माझी वसुंधरा अभियान 2.0 ची कार्यवाही करणेच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे. मा.सौ.पुष्पाताई बोरुडे, सभापती, महिला व बालकल्याण समिती यांनी मा.महासभेत दिलेले पत्र दिनांक 08 मार्च 2022 रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन महानगरपालिकेच्या वतीने महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम घ्यावयाचा आहे. महिलांसाठी असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर. संबंधित विभागाने या बाबत योग्य ती कार्यवाही करावी.

मा. महासभा स.का. ०७ प्रस्ताव क्र.३२ दि.१२/०१/२२ अन्वये १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधीवरील व्याजेतुन कोव्हीड-१९ कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव झालेल्या रुग्णाकरीता जेवण व चहा पाण्याची व्यवस्था करणेकरिता केलेल्या तरतुदीमधील शिल्लक रकमेतुन बुरुडगाव मनपा डेपो येथे पाण्याची व्यवस्था करणे व डीपीआर मधील खरेदी करण्यात येणा-या मशिनरी करीता लागणारे अतिरिक्त निधी खर्च करणे कामी ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**सुचक -** मा.सौ.पुष्पाताई अनिल बोरुडे

**अनुमोदक -** मा.सौ.सुरेखा संभाजी कदम

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : ४०** **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं.2 मधील सुर्यानगर येथील श्री संत सेना महाराज मंदिरासमोरील सुर्यानगर ते तपोवन रोड पर्यंतच्या रस्त्यास "**श्री संत सेना महाराज मार्ग**" नांव देणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ :1) मा.उपमहापौर श्री.गणेश पुंडलिक भोसले यांची दि 07/10/2021 रोजीची यादी.
2) मा.नगरसेविका सौ.रुपालीताई निखील वारे यांची दि07/10/2021 रोजीची यादी

उपरोक्त व्शयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, अहमदनगर जिल्हा नाभिक समाज ट्रस्टच्या माध्यमातून तपोवन मंदिरा समोरील सुर्यानगर येथे अहमदनगर शहराच्या वैभवात भर घालणारे भव्य असे श्री संत सेना महाराज सांस्कृतिक भवन आहे. सदरील सांस्कृतिक भवनामध्ये श्री.विठ्ठल रुख्मिनी मंदिर व नाभिक समाजाचे आराध्य दैवत श्री संत सेना महाराज यांचे मंदिर उभारण्यात आलेले आहे. याठिकाणी नाभिक समाज व शहरातील भाविक भक्तीभावाने दर्शनासाठी येत असतात. अहमदनगर जिल्हा नाभिक समाज ट्रस्ट यांनी दि. 07/10/2021 रोजी माझेकडे अर्ज देवुन सुर्यानगर येथील श्री संत सेना महाराज मंदिरासमोरील रस्त्यास "श्री संत सेना महाराज मार्ग" नांव देणे बाबतची मागणी अहमदनगर जिल्हा नाभिक समाज ट्रस्ट यांनी मा.उपमहापौर श्री.गणेश पुंडलिक भोसले व मा.नगरसेविका सौ.रुपालीताई निखील वारे यांचेकडे केलेली आहे.

तरी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.2 मधील सुर्यानगर येथील श्री संत सेना महाराज मंदिरासमोरील सुर्यानगर ते तपोवन रोड पर्यंतच्या रस्त्यास "**श्री संत सेना महाराज मार्ग**" नांव देणे बाबतचा विषय मा.सर्व साधारण सभेकडे पाठविणे बाबत उचित कार्यवाही करावी. याबाबत मा.उपमहापौर श्री.गणेश पुंडलिक भोसले व मा.नगरसेविका सौ.रुपालीताई निखील वारे संदर्भीय पत्र क्र.1 व 2 अन्वये यादी दिलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास अथवा इमारतीस नांव देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 6 कलम 63 (9) अन्वये मा.महासभेस आहे.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास,चौकास अथवा इमारतीस नांव देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये मा.महासभेस असल्याने अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.2 मधील सुर्यानगर येथील श्री संत सेना महाराज मंदिरासमोरील सुर्यानगर ते तपोवन रोड पर्यंतच्या रस्त्यास " **श्री संत सेना महाराज मार्ग**" नांव देणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविणे करीता रिपोर्ट मंजूरीस सादर.

यावर उपायुक्त सा यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्यानुसार मान्यतेस्तव.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :**

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** विषय मंजूर करा.

**मा.महापौर साहेब :** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 2 सुर्यानगर येथील श्री संत सेना महाराज मंदिरासमोरील सुर्यानगर ते तपोवन रोड पर्यंतच्या रस्त्यास "**श्री संत सेना महाराज मार्ग**" असे नामकरण, नांव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले

अनुमोदक - मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : ४१ दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय** : अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी असलेल्या ओपन स्पेसमध्ये ओपन जीम साहित्य बसविणे बाबतच्या विषयास मा.महासभेची मंजूरी मिळणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 8 व 15 तसेच सावेडी उपनगरातील विविध ठिकाणी मा.जिल्हा क्रीडा अधिकारी अहमदनगर यांचेमार्फत ओपन जीम बसविणेबाबत मा.स्थायी समिती सभा क्रमांक 06, विषय क्रमांक 78, मंगळवार दिनांक 09 फेब्रुवारी 2021, मा.स्थायी समिती सभा क्रमांक 01, विषय क्रमांक 19 दिनांक 08 एप्रिल 2021, मा.स्थायी समिती सभा क्रमांक 02, विषय क्रमांक 32, दिनांक 03 जुन 2021 अन्वये ओपन जिम बसविणेबाबतच्या विषयास मा.स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. तसेच मा.नगररचनाकार व मा.शहर अभियंता यांनी ओपन जिम बसविणेबाबत मंजुरी दिलेली आहे. सदरील कामांचे प्रस्ताव आपल्या क्रीडा विभागामार्फत जिल्हा क्रीडा कार्यालयात दाखल केलेले आहेत तथापि मा.जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी तोंडी सुचना देवुन कळविले आहे की, मा.महासभेची मंजुरी घेवुन ठराव घेणे आवश्यक आहे.

1 मनपा सर्व्हे नंबर 21 रियापार्क, स्वामीसमर्थ केंद्राजवळ, कल्याण रोड, अहमदनगर

2 मनपा सर्व्हे नंबर 14/1, आनंदपार्क,महालक्ष्मी मंदिराजवळ,कल्याण रोड, अहमदनगर

3 मनपा सर्व्हे नंबर 230 गणेशनगर, म्हसोबा मंदिराजवळ, कल्याण रोड, अहमदनगर

4 मनपा सर्व्हे नंबर 235 वंदेमातरम पार्क, कल्याण रोड, अहमदनगर

5 मनपा सर्व्हे नंबर33/1, 34 + 35 विद्या कॉलनी, कल्याण रोड, अहमदनगर

6 मनपा सर्व्हे नंबर 30/2/2 + 31/3 पावन म्हसोबानगर जवळ, कल्याण रोड, अहमदनगर

7 मनपा सर्व्हे नंबर 60/123 साईदीप कॉलनी, स्टेशन रोड, अहमदनगर

8 मनपा सर्व्हे नंबर 73/2, संभाजी कॉलनी जवळ, स्टेशन रोड, अहमदनगर

9 मनपा सर्व्हे नंबर 36/1, सुयोग पार्क, कल्याण रोड, अहमदनगर

10 मनपा सर्व्हे नंबर 239, साईराम सोसायटी जवळ, कल्याण रोड अहमदनगर

11 मनपा सर्व्हे नंबर230, गणेशनगर जवळ, कल्याण रोड, अहमदनगर
12 मनपा सर्व्हे नंबर 243, जिजाऊनगर जवळ, कल्याण रोड, अहमदनगर
13 मनपा सर्व्हे नंबर 11/1/2, जाधवनगर जवळ, कल्याण रोड, अहमदनगर
14 मनपा सर्व्हे नंबर 4/1, अमितनगर जवळ, कल्याण रोड, अहमदनगर
15 वैदुवाडी बंदिस्त व्यायामशाळा, सावेडी, सर्व्हे क्रमांक 7, अहमदनगर
16 प्रभाग क्रमांक 6 बंदिस्त व्यायामशाळा सावेडी गावठाण
17 सिंधी सहाणी बंदिस्त व्यायामशाळा, तारकपुर
18 जॉगिंग पार्क फायनल प्लॉट नंबर 268 ओपन जिम
19 लॉईड कॉलनी मकासरे हेल्थ क्लब मागे ओपन जिम
20 सावेडी सोनापार्क कुष्ठधाम रोड, सावेडी
21 सहकार नगर सावेडी सर्व्हे नंबर 34 पैकी
22 आदर्श कॉलनी फायनल प्लॉट नंबर 125 व 126
23 टि.पी. स्कीम नंबर 4 फायनल प्लॉट नंबर 273 सावेडी
24 भाग्योदय कॉलनी कुष्ठधाम रोड, रावसाहेब पटवर्धन स्मारक मागे
25 नविन प्रेमदान हडको, फायनल प्लॉट नंबर 109 व 110
26 भारत कॉलनी, भुतकर वाडी टिपी स्कीम नंबर 4, फायनल प्लॉट नंबर 23, मौजे सावेडी
27 प्रेमदान हडको, फायनल प्लॉट नंबर 1098 व 110, सावेडी
28 सिंधी सहाणी सोसायटी, तारकपुर

तरी वरील ठिकाणी ओपन जिम साहित्य बसविण्याच्या प्रस्तावास मा.महासभेमध्ये मंजुरी मिळावी.

यावर उपायुक्त सा यांचा अभिप्राय की अ प्रमाणे मान्यतेस

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :**

---*---

चर्चा :

**मा.श्री.गणेश कवडे :** हिंदू ह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंती निमित्त सायकलिंग स्पर्धेचे आयोजन केले आहे. सदर संस्था सोशल डिस्टसिंगचे पालन करणार आहे. महापौर चषक असल्याने महासभेने सायकलिंगची स्पर्धा घेण्यासाठी मान्यता द्यावी.

**मा.महापौर साहेब :** सायकलिंगची स्पर्धा घेण्यांत मान्यता देण्यांत येत आहे.

**उपायुक्त श्री.डांगे :** माझी वसुंधरा मध्ये सायकल चालवण्यासाठी प्रोत्साहन द्यायचे आहे

तसेच स्वच्छ सर्व्हेक्षण मध्ये हा घटक घेता येईल भुईकोट किल्ल्यावर स्पर्धेचा समारोप करु. टीशर्ट वगैरे देवू.

**मा.श्री.सचिन शिंदे :** महापौर चषक असल्याने कल्याण रोडला स्पर्धा घ्यायची.

**उपमहापौर श्री.गणेश भोसले :** क्रीडा अधिकारी यांचेशी आपली चर्चा झाली आहे. त्याप्रमाणे घ्या.

**मा.श्री.सचिन शिंदे :** विषय मंजूर करा.

**मा.श्री.गणेश कवडे :** विषय मंजूर करा.

**मा.महापौर साहेब :** विषय मंजूर. महापौर चषक सायकलिंगची स्पर्धा घेण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी असलेल्या ओपन स्पेसमध्ये ओपन जीम साहित्य बसविणेस ही सभा मान्यता देत आहे. प्रस्तावित ठिकाणा व्यतिरिक्त प्रभाग क्रमांक 12 मधील स्वाती कॉलनी, नंदनवन कॉलनी, आनंदधाम समोरील मार्ग, मेहेर कॉलनी, उज्वल नगर, व प्रभाग क्रमांक 3 मधील सर्व्हे क्रमांक 325, 338, 339 मधील खुल्या जागेत ओपन जीम साहित्य बसविणेस ही सभा मान्यता देत आहे.

हिंदू ह्दय सम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे जयंतीचे औचित्य साधुन सायकलपटुंना प्रोत्साहीत करण्यासाठी अहमदनगर महानगरपालिका व सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांचे संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय महापौर चषक स्पर्धा घेण्यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर. याकामी रक्कम रु.5,47,550/- चा धनादेश सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांचे नांवे काढण्यांस संबंधित विभागाने कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

सुचक - मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे

अनुमोदक - मा.श्रीमती. सुरेखा संभाजी कदम

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७**　　**प्रस्ताव क्रमांक : ४२**　　**दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** सन 2021-2022 या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

**संदर्भ :** 1) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 117 दिनांक 25 ऑक्टोबर, 2021.

उपरोक्त विषयाचे संदर्भांकित ठरावानुसार सादर करणेत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या सन 2021-2022 चे मंजूर अंदाजपत्रकातील खर्चाचे अनुदानात वाढ/ घट करणेबाबत विविध विभागांकडून प्रस्ताव प्राप्त होते. अर्थ विभागाकडे विविध विभागांकडुन प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करुन संबंधित विभाग प्रमुखांची बैठक घेवुन पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मा.स्थायी समितीस सादर करण्यात आला होता.

सदर सन 2021-2022 मधील पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 117 दिनांक 25 ऑक्टोबर 2021 रोजी मंजुरी देण्यांत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 100 प्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाजाची अंतीम स्वीकृती मा. महासभेने दिलेली आहे. त्यामुळे मा.स्थायी समितीने मंजुर केलेले सन 2021-2022 चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मा.महासभेपुढे ठेवणेबाबत मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, 12 व्या, 13 व्या व 14 व्या या लेखाशिर्षकाची तरतुद वाढवण्याबाबत मुलेप यांचा अभिप्राय घेणे उचित होईल तथापि प्रस्तावित केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :**

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** विषय मंजूर करा.

**मा.महापौर साहेब :** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. सन 2021-2022 या वित्तीय वर्षाचे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे. नविन रस्ते विकसीत करण्यासाठी प्रभाग क्रमांक 16 मधील भैरवनाथ पथसंस्था ते पाचगोडावून ते शाहूनगर बसस्टॉप पर्यंत रस्ता करणे रक्कम रु.3 कोटी 24 लाख व प्रभाग क्रमांक 7 मधील बोल्हेगांव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदिर ते केशव कॉर्नर पर्यंत रस्ता करणे रक्कम रु 4 कोटी 45 लाख या दोन कामांसाठी बांधकाम विभागाने इतर लेखाशिर्षामधुन निधी कमी करुन नविन रस्ते विकसीत करणे या लेखाशिर्षकाचे पुर्नविलोकन करणेचा सविस्तर प्रस्ताव तयार करून प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे या अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार अर्थ विभागाने पुढील कार्यवाही करावी.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.बडे अशोक किसन

अनुमोदक - मा.सौ.बोरुडे पुष्पा अनिल

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : ४३** **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे प्राप्त 15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधी करीता सन 2021 2022 या आर्थिक वर्षाचे बजेटमध्ये जमा व खर्च लेखाशिर्षक तयार करणेकामी मंजूरी मिळणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ:-१)मा.शासना कडील शान निर्णय क्र.एफएफसी २०२०/प्र.क्र.५६/नवि-४,मंत्रालय,मुंबई दिनांक २८ ऑक्टोबंर २०२० रोजी स्वराज्य संस्था करीता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगा बाबतची कार्यपध्दती.

२) मा.आयुक्त यांच्या दिनांक ०९/०९/२०२१ रोजीच्या मान्यतेनुसार.

उपरोक्त विषयानुसार प्रस्तावना सादर करण्यात येते की,अहमदनगर महानगरपालिकेस मा.शासनामार्फत १५ व्या वित्त आयोग अंतर्गत खालील तपशीलानुसार निधी प्राप्त झालेले आहे..

| अ.क्र. | शासन निर्णय | प्राप्त निधी | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शासन निर्णय क्रमांक:एफएफसी-२०२१/ प्र.क्र.२५/ नवि-४,मंत्रालय,मुंबई दिनांक ०९ मार्च २०२१ रोजीचे शासन निर्णय. | ५,२१,४१,५६६/- | दि.१२/०६/२०२० |
| २ | शासन निर्णय क्रमांक:एफएफसी-२०२१/प्र.क्र.२५/ नवि-४,मंत्रालय,मुंबई दिनांक ०९ मार्च २०२१ रोजीचे शासन निर्णय. | ४,९४,६१,३१२/- | दि.२६/०३/२०२१ |
| ३ | शासन निर्णय क्रमांक:एफएफसी-२०२१/ प्र.क्र.२७/ नवि-४,मंत्रालय,मुंबई दिनांक ०७ मार्च २०२१ रोजीचे शासन निर्णय. | ५,११,१७,५९७/- | दि.२४/०३/२०२१ |
| ४ | अर्थ विभाग जा.क्र.५८१ दिनांक ०४/०८/२०२१ अन्वये. | ५,२७,६६,३८९/- | दि.२९/०४/२०२१ |
| | एकुण:- | २०,५४,८६,८६४/- | -- |

वरील प्रमाणे सदरील निधी माहे ऑगस्ट २०२१ अखेर पर्यंत प्राप्त झालेले आहे.त्यानुसार सदरील प्राप्त निधीचा वापर करणेकामी संदर्भीत शासन निर्णयानुसार कार्यपध्दतीनुसार प्राप्त एकुण रक्कम रु. २०,५४,८६,८६४/-पैकी खालील प्रमाने घनकचरा व्यवस्थापन विभागास प्राप्त रक्कम रु. ५,१३,७१,७१६/- निधीचे नियोजन करण्यात आलेले आहे.त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक ०९/०९/२०२१ रोजी मंजुरी दिली आहे.

| अ.क्र. | तपीशल | अंदाजित खर्च | आवश्यक निधी |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या Bio-Methanation plant (१० TPD = ५ TPD X २ no) देखभाल व दुरुस्ती करणे तीन वर्षा करीता. | रक्कम रु.१,००,००,०००/- | रक्कम रु.१,००,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | बुरुडगांव सं.नं.३४ या ठिकाणी दैनंदीन १०० मे.ट्न क्षमतेचा कचरा कचरा खत प्रकल्प Processing plant देखभाल व दुरुस्ती | प्रति महिना रक्कम रु.२५,००,०००/- | ६ महिना करीता रक्कम रु.१,५०,००,०००/- |
| ३ | सन २०२१-२२ व २०२२-२३ मधील एक वर्षा करीता animal incinerator देखभाल व दुरुस्तीसह चालविणे. | प्रति महिना रक्कम रु.३,२०,००/- प्रमाणे | १२ महिना करीता रक्कम रु.३८,४०,०००/- |
| ४ | मौजे बुरुडगांव स.नं.३४(पै) कचरा डेपो येथील लिचेड जमा करणे कामी दोन आर.सी.सी.लिचेड कनेक्शन टॅक,कॉक्रीट व Paving Block बसविणेकामी. | अंदाजे खर्च रक्कम रु.२५,००,०००/- | रक्कम रु. २५,००,०००/- |
| ५ | मौजे बुरुडगांव स.नं.३४(पै) कचरा डेपो येथे २० KLD लिचेड ट्रिटमेंट प्रकल्प विकसित करणे. | अंदाजे खर्च रक्कम रु.१,२०,००,०००/- | रक्कम रु. १,२०,००,०००/- |
| ६ | शहरातील मुख्य बाजारपेढ व गर्द्दीच्या ठिकाणी लोखंडी GI Perforated Sheet चे लिटरबिन्स बसविणेकामी. | अंदाजे खर्च रक्कम रु.३०,००,०००/- | अंदाजे खर्च रक्कम रु.३०,००,०००/- |
| ७ | स्वच्छ सर्वेक्षण, सफाई मित्र अभियान, सफाई मित्र सुरक्षा चॅलेज व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांकरीता. | अंदाजे खर्च रक्कम रु.५०,३१,७१६/- | रक्कम रु.५०,३१,७१६/- |
| एकुण:- | | | रक्कम रु.५,१३,७१,७१६/- |

वरील प्रमाणे १ ते ७ मुद्दे घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कामांचे नियोजन असुन मा.आयुक्त यांच्या दिनांक ०३/९/२०२१ रोजीच्या आदेशान्वये पाणी पुरवठा विभाग यांनी प्राप्त निधी वापर बाबत प्रस्तावित केलेले आहे.त्यानुसार मा.उपायुक्त यांनी दिनांक ०९/०९/२०२१ रोजी सदरील घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कामा करीता लागणारे निधी व पाणी पुरवठा विभागाकडील कामा करीता लागणारे निधी बाबत खालील प्रमाणे मुद्दे निहाय तपशीलवार शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे तपशील | आवश्यक निधी |
|---|---|---|
| **Tied Grants** | | |
| १ | वरील प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कामांकरीता आवश्यक निधी. | रक्कम रु.५,१३,७१,७१६/- |
| २ | **एकुण प्राप्त अनुदान रक्कम रु. २०,५४,८६,८६४/-पैकी रक्कम रु. १०,२७,४३,४३२/- बंधनकारक अनुदान असुन त्यामधुन पाणी पुरवठा विभागाकडील प्रस्तावित कामांमधील A) Fora Tied Grants मधुन:-**<br>१)शिवाजी नगर व समर्थनगर येथे विद्युत पुरवठा उपलब्ध करुन घेणेकामी आवश्यक निधी रक्कम रक्कम रु.०.१३ कोटी<br>२)शहर पाणी पुरवठा योजनेसाठी अकुशल कामगार कंत्राटी स्वरुपात उपलब्ध करणेकामी (७ महिन्याकरीताचा खर्च) आवश्यक निधी रक्कम रु.२.०० कोटी<br>३)UIDSSMT अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ कामी रक्कम रु.२.०० कोटी<br>४)शहरातील विविध ठिकाणी असलेल्या उंच टाक्यांचे मजबुतीकरण,सुरक्षा विषयक | रक्कम रु.५,१३,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | कामे व रंग काम करणेकामी आवश्यक निधी रक्कम रु.०.४० कोटी<br>५)पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावशयक दुरुस्ती कामी आवश्यक निधी रक्कम रु.०.६० कोटी | |
| **Non Tied Grants** | | |
| १ | १५ व्या वित्त आयोगातुन प्राप्त एकुण अनुदान रक्कम रु.२०,५४,८६,८६४/- असुन रक्कम रु.१०,२७,४३,४३२/-अबंधनकारक Non Tied Grants मधुन रक्कम रु.२,५०,००,०००/-इतकी रक्कम अमृत पाणी पुरवठा योजनासाठी दिनांक १०/०८/२०२१ रोजी वर्ग करणेत आलेली आहे. | रक्कम रु.२,५०,००,०००/- |
| २ | रु.१०,२७,४३,४३२/-अबंधनकारक Non Tied Grants मधुन अबंधनकारक अनुदान मधील रक्कम रु.२,७७,४३,४३२/-पैकी रक्कम रु.२,५०,००,०००/-इतकी रक्कम चालु विज बिल भरणेकामी मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे. | रक्कम रु.२,५०,००,०००/- |
| ३ | रक्कम रु.७,७७,४३,४५२/-इतकी रक्कम शिल्लक आहे.त्यानुसार पाणी पुरवठा विभागाने दिनांक ०८/०९/२०२१ रोजी केलेल्या प्रस्तावित मधील "x" मधील अनुक्रमे २ नुसार अमृत अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी मनपा हिस्सा करीता आवश्यक रु.१२.७२ कोटी पैकी प्राप्त सुचनेनुसार रक्कम रु.५,००,००,०००/-इतकी रक्कम वर्ग करणेकामी मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे | रक्कम रु.५,००,००,०००/- |

सबब वरील प्रमाणे सदरील १५ व्या वित्त आयोगातुन प्राप्त एकुण रक्कम रु.२०,५४,८६,८६४/- मधुन खर्च कामी मा.महासभेची मंजुरी घेणेकामी मा.आयुक्त यांनी दिनांक ०९/०९/२०२१ रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब वरील प्रमाणे मा.महासभेची मान्यता घेणेकामी सविनय सादर.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, 1. Basic Grants 50% रु.102743432/- पैकी पाणीपुरवठा उच्चदाब वीजबिल व पाणीपुरवठ्ा वितरण व्यवस्था पाण्याच्या टाक्यावरील वीजबिल असे एकुण अंदाजे र.रु.45797434/- देणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी मनपास वारंवार उच्चदाब वीजबिले कनेक्शन खंडीत करण्याबाबत नोअीसा देत असते.

उर्वरीत रक्कम रु.56945998 बाबत 28 ऑक्टो 2020 च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही बाबत योग्य तो निर्णय घेण्यांत यावा.

2. पाणीपुरवठा विभाग 25% र.रु.13,71,716 बाबत प्रस्ताव मागवण्यांत यावा.

3. घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख ह्यांनी सादर केलेल्या रु.51371716 मधील मुद्दा क्रमांक 7 निकषाबाबत खात्री करण्यांत यावी. आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मुद्दा क्रमांक 3 मान्यतेसाठी सादर मुद्दा क्रमांक 2 पाणी पुरवठा विभाग यांना प्रस्ताव सादर करणेसाठी आदेश व्हावेत.

मुद्दा क्रमांक 1 नुसार मा.आयुक्त साहेब यांचे स्तराव निर्णयासाठी सादर.

यावर शहर अभियंता व पाणी पुरवठा यांचा अभिप्राय की, महानगरपालिकेची राज्य व केंद्र शासन योजनेमध्ये लोकवर्गणी (मनपा हिस्सा) किती आवश्यक आहे.

एकत्रित निधी आवश्यक ते बाबत अहवाल सादर करणे.

पा.पु. मुद्दा क्रमांक 2 बाबत आवश्यक कामे निधी बाबत स्पष्टता देणे.

पाणीपुरवठा विभागाकडून मा.सादर रिपोर्ट की, महानगरपालिकेची राज्य व केंद्र शासन योजने मध्ये लोकवर्गणी (मनपा हिस्सा) किती आवश्यक आहे याबाबत एकत्रीत अहवाल सादर करणे व पाणी पुरवठा विभागासाठी आवश्यक कामांच्या निधी बाबत स्पष्टता देणेसाठी सुचीत केलेनुसार खालील प्रमाणे सादर करण्यांत येत आहे.

पाणी पुरवठा विभागामार्फत राबविण्यांत येत असलेलया योजने बाबतचा तपशिल सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये नमूद केलेला असून सदरच्या योजनांसाठी मनपा हिश्यापोटी खालील प्रमाणे निधीची आवश्यकता लागणार आहे.

**A) For Tied Grants**

| | | |
|---|---|---|
| 1 | शिवाजीनगर व समर्थ नगर येथे विद्युत पुरवठा उपलब्ध करुन घेणे कामी आवश्यक रक्कम | रु.0.13 कोटी |
| 2 | शहर पाणी पुरवठा योजनेसाठी अकुशल कामगार कंत्राटी स्वरुपात उपलब्ध करणे (7 महिन्यांकरीताचा खर्च ) | रु.2.00 कोटी |
| 3 | UIDSSMT अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-2 | रु.2.00 कोटी |
| 4 | शहरातील विविध ठिकाणी असलेल्या उंच टाक्यांचे मजबूतीकरण, सुरक्षा विषयक कामे, रंग काम | रु.0.40 कोटी |
| 5 | पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावश्यक दुरुस्ती | रु.0.60 कोटी |
| | | रु.5.13 कोटी |

**B) For Non - Tied Grants**

| | | |
|---|---|---|
| 1 | UIDSSMT शहर पाणी पुरवठा योजना फेज-2 | रु.12.72 कोटी |
| 2 | अमृत अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजना | रु.14.95 कोटी |
| 3 | अमृत अभियान अंतर्गत भुयारी गटार योजना | रु.17.45 कोटी |

करिता,

1. अ.क्र. A मध्ये नमुद केलेनुसार रु.5.13 कोटीची रक्कम त्यानुसार वापरणे करीता मंजूरीस
2. अ.क्र. B मध्ये नमूद केलेनुसार अमृत अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी मनपा हिस्सा करिता आवश्यक रु.12.72 कोटी पैकी प्राप्त सुचनेनुसार 5.00 कोटी वर्ग करणेस तथापी आदेशार्थ सादर.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, सद्यस्थितीत मध्ये दि.08/09/2021 चे बैठकीमधील चर्चानुसार मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, 15 वा वित्त आयोग प्राप्त एकुण अनुदान 20,54,86,864/- असुन 10,27,43,432/- अबंधनकारक **Non - Tied Grants** मधुन 2,50,00,000/- इ. रक्कम अमृत पाणी पुरवइ‍ा योजनेसाठी दिनांक 10/09/2021 रोजी वर्ग करणेत आलेली असुन 7,77,45,462/- इतकी रक्कम शिल्लक आहे. X (2) मध्ये नमुद केलेनुसार अमृत अभियान अंतर्गत पा.पु.योजना मनपा हिस्सा म्हणुन 7,77,43,432/- मधुन 5,00,00,000/- इतकी रक्कम वर्ग करणेस मान्यता मिळणेसाठी महासभेकडे पाठविण्यास शिफारस व्हावी.

अबंधनकारक अनुदानामधिल 2,77,43,432/- पैकी 2,50,00,000/- इतकी रक्कम चालू विज बील भरणेकामी मान्यता मिळणेसाठी महासभेकडे पाठविण्यास शिफारस व्हावी.

एकुण प्राप्त अनुदान पैकी 20,54,86,864/- पैकी 10,27,43,432/- रु बंधनकार अनुदान असुन पान क्र 8 वरील X (2) प्रमाणे 5.00 कोटी रक्कम पाणीपुरवठासाठी व पान क्रमांक 5 वरील 5,13,71,726/- घ.व्यवस्थापनसाठी वापरणेस शिफारस व्हावी.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

--*--

**चर्चा :**

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** विषय मंजूर करा.

**मा.महापौर साहेब :** ऑफिस रिपोर्ट मधील तरतुदी दुरुस्तीसह मंजूर.

--*--

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे प्राप्त 15 व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधी करीता सन 2021 2022 या आर्थिक वर्षाचे बजेटमध्ये जमा व खर्च लेखाशिर्षक तयार करणेस ही सभा मान्यता देत आहे. प्रस्तावातील बंधनकारक निधीस मान्यता देण्यांत येत आहे. अबंधनकारक निधीतील मुद्दा क्रमांक 1 मान्यता देण्यांत येत आहे. मुद्दा क्रमांक 3 बाबत 15 व्या वित्त आयोगातील अबंधनकारक अनुदानातील मुद्दा क्रमांक 3 मधील रक्कम रुपये 7,77,43,452 इतक्या रक्कमेपैकी रक्कम रुपये 5 कोटी पाणी पुरवठा योजनेसाठी मनपा हिश्यासाठी वर्ग न करता रक्कम रुपये 5 कोटी इतका निधी बांधकाम विभागाकडे शहरातील विकास कामांसाठी वर्ग करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. शहरातील विकास कामांची यादी बांधकाम विभागाकडे प्रस्तावित करण्यांत

आलेली आहे. सदर कामांचे प्रस्ताव तयार करुन पुढील योग्य ती कार्यवाही करावी. व यासाठीचा खर्च सदर निधीतून करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री. कवडे गणेश खंडेराव

अनुमोदक - मा.श्री.गाडे योगीराज शशिकांत

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : ४४** **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेच्या सन 2021 2022 या वित्तीय वर्षाचे सादर करण्यांत आलेले पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

**संदर्भ :** 1) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 118 दिनांक 25 ऑक्टोबर, 2021.

उपरोक्त विषयाचे संदर्भांकित ठरावानुसार सादर करणेत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या सन 2021-2022 चे मंजूर अंदाजपत्रकातील खर्चाचे अनुदानात वाढ/ घट करणेबाबत विविध विभागांकडून प्रस्ताव प्राप्त होते. अर्थ विभागाकडे विविध विभागांकडुन प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करुन संबंधित विभाग प्रमुखांची बैठक घेवुन पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मा.स्थायी समितीस सादर करण्यात आला होता.

सदर सन 2021-2022 मधील पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 118 दिनांक 25 ऑक्टोबर, 2021 रोजी मंजुरी देण्यांत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 100 प्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाजाची अंतीम स्वीकृती मा. महासभेने दिलेली आहे. त्यामुळे मा.स्थायी समितीने मंजुर केलेले सन 2021-2022 चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मा.महासभेपुढे ठेवणेबाबत मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :**

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** विषय मंजूर करा.

**मा.महापौर साहेब :** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या सन 2021 2022 या वित्तीय वर्षाचे सादर करण्यांत आलेले पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच प्राथमिक सोयीसुविधा विकास कार्यक्रम या लेखाशिर्षात ई निविदा क्रमांक 1176 च्या कामाचे देयकासाठी व प्रभाग क्रमांक 29 भवानीनगर येथील आवारी घर ते लोखंडे घरापर्यंत आर.सी.सी.पाईप गटार व रस्ता कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे देयकासाठी रु.8,71,000/- इतकी तरतुद वाढ करण्यांत यावी. यासाठी महापौर शहर विकास निधी या लेखाशिर्षातुन रक्कम रु.8,71,000/- इतकी तरतुद वापरण्यास ही सभा मान्यता देत आहे. अर्थ विभागाने पुढील कार्यवाही करावी.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक - मा.सौ.कदम सुरेखा संभाजी

अनुमोदक - मा.डॉ.श्री.बोरुडे सागर अर्जुन

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : ४५ दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय** : घनकचरा विभाग व पाणीपुरवठा विभागाचे सन 2021 2022 या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणेबाबत (पाणीपुरवठा ) व इतर विभाग.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

**संदर्भ** : 1) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 72 दिनांक 03 सप्टेंबर 2021.

उपरोक्त विषयाचे संदर्भांकित ठरावानुसार सादर करणेत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या सन 2021-2022 चे मंजूर अंदाजपत्रकातील खर्चाचे अनुदानात वाढ/ घट करणेबाबत विविध विभागांकडून प्रस्ताव प्राप्त होते. अर्थ विभागाकडे विविध विभागांकडुन प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करुन संबंधित विभाग प्रमुखांची बैठक घेवुन पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मा.स्थायी समितीस सादर करण्यात आले होते.

सदर सन 2021-2022 मधील पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 72 दिनांक 03 सप्टेंबर 2021 रोजी मंजुरी देण्यांत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 100 प्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाजाची अंतीम स्वीकृती मा. महासभेने दिलेली आहे. त्यामुळे मा.स्थायी समितीने मंजुर केलेले सन 2021-2022 चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मा.महासभेपुढे ठेवणेबाबत मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्यानुसार मा.महासभेपुढे ठेवणेबाबत मंजूरीस्तव सादर.

यावर अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :**

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले** : विषय मंजूर करा.

**मा.महापौर साहेब** : ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. घनकचरा विभाग व पाणीपुरवठा विभागाचे सन 2021 2022 या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे.

प्रशासनाने याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी. .

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले

अनुमोदक - मा.श्री.गणेश खंडेराव कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७  प्रस्ताव क्रमांक : ४६  दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** निविदाकार यांनी भरलेली निविदा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) रक्कम परत देणेस मंजुरी मिळणे बाबत (अशिष डायकेम कार्पोरेशन मुंबई)

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

**संदर्भ :** अशिष डायकेम कॉर्पोरेशन,मुंबई यांचा दिनांक 11 ऑक्टोबर, 2021 रोजीचा विनंती अर्ज.

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की, उपरोक्त संदर्भिय पुरवठादार आशिष डायकेम कॉर्पोरेशन, मुंबई यांनी अहमदनगर महानगरपालिकेस आवश्यक असणारे जंतुनाशक द्रव्ये, किटकनाशके, पावडर इ.पूरवठा निविदा दाखल केलेल्या होत्या व त्या अनुषंगाने निविदा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) रक्कमा भरलेल्या आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाकराचे नाव | निविदा डिपॉझिट रक्कमेचा तपशिल | सा.पा.क्र. व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | आशिष डायकेम कॉर्पोरेशन, मुंबई | सन 2014;2015 या आर्थिक वर्षाकरीता आवश्यक असणारे जंतुनाशके,किटकनाशके व पावडर इ. पुरवठा वार्षिक ई-निविदा | FI04/5469 03 जुलै, 2015 | 10,000=00 |
| | | सन 2015-2016 या आर्थिक वर्षा करीता आवश्यक असणारे जंतुनाशके, किटकनाशके व पावडर इ. पुरवठा वार्षिक ई-निविदा | FI04/5469 03 जुलै, 2015 | 15,000=00 |

अर्जदार यांनी भरलेली निविदा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) रक्कम परत मिळणे बाबत संदर्भिय अर्जान्वये मागणी केलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम क्र.190 (3) अन्वये तीन वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिलकी रक्कमा प्रत्येक वर्षाअखेर महानगरपालिकेकडे व्यपगत होतात. उपरोक्त निविदा अनामत

(सिक्युरिटी डिपॉझिट) रक्कम भरुन तीन वर्षापेक्षा जादा कालावधी झालेला आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम क्र.190(4) अन्वये सदर निविदा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) रक्कमा परत देणेकरीता मा.महासी ेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी महानगरपालिकेत व्यपगत झालेल्या परोक्त निविदा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) रक्कमा निविदाकार आशिष डायकेम कॉर्पोरेशन, मुंबई यांना परत करणेस मा.महासभेची मंजुरी मिळणेस सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव सविनय सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, अ मान्यतेस्तव

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावित केलेप्रमाणे अ नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविण्यांस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :**

**मा.श्री.संपत बारस्कर :** कै.बाळासाहेब जनार्दन तोडमल हे अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाचे ठेकेदार असुन ते अत्यंत प्रामाणिक माजी सैनिक होते. त्यांनी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये कामकाज केलेले आहे. त्यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांना बिल सादर करतांना एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :** कै.बाळासाहेब जनार्दन तोडमल यांचे रक्कम रुपये 3,63,000 चे बीलास एक वर्षाचा कालावधी झाल्यामुळे मंजूरी द्यावी. पाणीपुरवठा ही अत्यावश्यक सेवा असल्यामुळे ही बिले लेखापरिक्षण करुन काढण्यांत यावीत.

**मा.महापौर साहेब :** ऑफिस रिपोर्ट मंजूर. कै.बाळासाहेब तोडमल यांनी पाणीपुरवठा ही अत्यावश्यक सेवा दिलेली असल्याने त्यांचे बील काढण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अशिष डायकेम कार्पोरेशन मुंबई यांनी भरलेली निविदा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) रक्कम अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. साईनाथ मजुर सहकारी संस्था, स्टेशन रोड, अहमदनगर, यांची फॉरफीट झालेली डिपॉझीट रक्कम, भाग्योदर मजूर सहकारी संस्था, केडगांव अहमदनगर, हनदबाबा मजुर सहकारी संस्था, अहमदनगर,

साईबाबा इलेक्ट्रीक सिव्हील मजूर सहकारी संस्था, अहमदनगर, मे.ए.सी.शेख यांच्या नावे असलेली, किर्ती इलेक्ट्रीक मजूर संस्था, अहमदनगर, माँ शेरावाली मजुर सहकारी संस्था, अहमदनगर, रक्कम रु.4050/- , रु.4563/-, 4164/-, श्री.सुनिल रामराव राउत यांचे नांवे रक्कम रु.9978/- स्वस्तीक मजुर सहकारी संस्था, अहमदनगर यांचे रक्कम रु. 15,000/- , इंजेन लाईफ सायंसेस प्रा.लि., अहमदनगर, पायोनियर एंटरप्रायजेस, अहमदनगर, कुंदन सर्जिकल्स, अहमदनगर, इन्फीनीटी एन्टरप्रायजेस, अहमदनगर, इत्यादी यांचे फॉरफीट झालेली डिपॉझिट / अनामत रक्कम अदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

कै.बाळासाहेब जनार्दन तोडमल यांनी पाणी पुरवठा विभागातील अत्यावश्यक सेवा पिण्याची पाण्याची पाईपलाईन टाकण्याच्या कामाचे देयक तयार करण्यांस 1 वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने देयक रक्कम रु 3,60,000 बाबत पुढील योग्यती कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे. अहमदनगर महानगरपालिकेचे सिस्टीम मॅनेजर यांना कार्यालयीन कामकाजाकरीता वापरलेले वाहनाचे शंभु ट्रॅव्हल्स यांचे नांवे असलेले देयकास एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने रक्कम रु.1,11,798/- बाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेसाठी दिनांक 20/09/2016 पासुन लागू असलेल्या "ड" वर्ग विकास बांधकाम नियंत्रण नियमावलीमधील नियम क्रमांक 6.2.3 (b) प्रमाणे आकारलेली सुरक्षा अनामत ही भुखंडधारकास भोगवटा प्रमाणपत्र मंजूरीनंतर परत करणे क्रमप्राप्त आहे. तसेच दिनांक 02 डिसेंबर, 2020 नंतर लागू झालेल्या नविन नियमावलीमध्ये सुरक्षा अनामत घेण्याची तरतुद नाही.

सुरक्षा अनामतीची 3 वर्षांची मुदत "महाराष्ट्र लेखा संहिता" मध्ये असली तरी बांधकाम पुर्ण होण्यास त्यापेक्षा जास्त कालावधी लागू शकतो त्यामुळे सन 2016-2020 या

दरम्यान नगररचना विभागाकडे आलेल्या अर्जानुसार सर्व सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. संबंधित विभागाने सुरक्षा अनामत रक्कम देण्याबाबत नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.अनिल माधवराव शिंदे

अनुमोदक - मा.श्री.शाम किसन नळकांडे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : ४७ दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकृत टेंडर धारक अमित फोटो ॲण्ड व्हिडीओ प्रो.प्रा. समीर मनियार यांनी महानगर पालिकेच्या विविध कार्यक्रमाचे काढलेल्या फोटोचे बील अदा करणेबाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

विनंतीरिपोर्ट सादर करण्यांत येतो की, मनपा अधिकृत टेंडरधारक अमित फोटो अॅण्ड व्हिडीओ,प्रोप्रा.समीर मन्यार यांनी अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध कार्यक्रमांचे फोटो 320/- प्रति कार्यक्रम (वर्तमान पत्रांना देणे) या दराने काढण्यांत आलेले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | बील क्रमांक | एकूण बीले | दिनांक | विषय | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१ ते ११७ व २०१ ते २१८ | १३५ | १-५-२०१७ ते १८-११-२०१९ | महानगरपालिकेच्या विविध कार्यक्रमांचे फोटो काढून वर्तमानपत्रांना प्रसिध्दीसाठी देणे. | १,४०,७६०/- |
| २ | २३९ ते ३१५ | ७६ | २९-३-२०१७ ते १३-५-२०१९ | --""-- | ५३,१८०/- |
| ३ | ३१६ ते ३८४ | ६९ | २२-५-२०१७ ते १५-९-२०१८ | --""-- | ३०,२६०/- |
| ४ | ३८५ ते ५४४ | १५३ | २२-३-२०१७ ते २३-२-२० | --""-- | ७५,३२०/- |
| ५ | ६०१ ते ६२९ | २९ | २-१-२०१९ ते ६-३-२०१९ | --""-- | १८,४२०/- |
| ६ | ६३० ते ६५५ | २६ | २७-२-२०१९ ते२९-६-२०१९ | --""-- | १२,१२०/- |
| ७ | ६५६ ते ६८४ | २९ | ३०-२-२०१९ ते२१-८-२०१९ | --""-- | १७,३२०/- |
| ८ | ६८५ ते ७११ | २७ | २८-८-२०१९ ते २४-११-२०१९ | --""-- | १३,३००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | ७१२ ते ७३५ | २४ | ३०-११-२०१९ ते २२-१२-२०१९ | --""-- | १३,३००/- |
| १० | ७३६ ते ७६२ | २७ | २८-१२-२०१९ ते १६-१-२०१९ | --""-- | १५,७४०/- |
| ११ | ७६३ ते ७८६ | २४ | १७-१-२०१९ ते ६-२-२०१९ | --""-- | १४,०००/- |
| १२ | ७८७ ते ८१२ | २६ | ७-२-२०२० ते ४-३-२०२० | --""-- | १७,८००/- |
| | | | | एकूण - | ४,२१,५२०/- |

सदर फोटोची बीले मंजूर टेंडर दराने प्राप्त झालेली आहेत. तरी सदर बीले संपर्क व प्रसिध्दी या लेखाशिर्षकातून खर्ची घालण्यास व रु.४,२१,५२०/- (अक्षरी रुपये चार लाख एकवीस हजार पाचशे वीस फक्त) चे बील अमित फोटो ॲण्ड व्हिडीओ या नांवाने अदा होण्यास रिपोर्ट सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तुत प्रस्तावातील बील क्र.239 ते 300, 401 ते 500 ही बीले सोबत सादर केली नाहीत.

प्रस्तावित बीले ही सन 2017 ते 2020 या कालावधीतील आहेत. तरी देयकास 1 वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्यास महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 168 प्रमाणे मुदतबाह्य मागण्या मा.महासभेची मंजूरी शिवाय देता येणार नाही.

पूर्ततासह फेरसादर करावे.

यावर सादर की, प्रस्तुत प्रस्तावातील पुर्तता करण्यांत आलेली आहे. आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मुलेप यांचे अभिप्रायानुसार GB कडे पाठवा

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :**

मा.श्री.संपत बारस्कर - विषय मंजूर करा.
मा.श्री.गणेश कवडे - विषय मंजूर करा.
मा.महापौर साहेब - विषय मंजूर

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकृत टेंडर धारक अमित फोटो अॅण्ड व्हिडीओ प्रो.प्रा.समीर मनीयार यांनी महानगरपालिकेच्या विविध कार्यक्रमांचे काढलेल्या फोटोचे बील रक्कम रुपये चार लाख एकवीस हजार पाचशे वीस (रु.4,21,520/-) अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

सुचक - मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे

अनुमोदक - मा.श्री.शाम किसन नळकांडे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७**  **प्रस्ताव क्रमांक : ४८**  **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** मा.केंद्रशासित अमृत अभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा-२ राबविणेकामी प्राप्त ढोबळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.राज्यशासनाकडे सादर करणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ - १) मा.शासन निर्णय क्रमांक २०१५/प्र.क्र.१९७/नवि - ३३ महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि.१३आक्टोबर २०१५

२) मा.महासभा प्रस्ताव क्रमांक २४ दि.०९/११/२०१५ अन्वये पारित ठराव

३) इकडील जा.क्र.शहर पा पु ५३० दि.०३/११/२०२० अन्वये कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा. पी.एम.सी. (अमृत अभियान), अहमदनगर यांना पत्र

` ४) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर यांचे कडील पत्र जा.क्र.तांशा - २ /२६५७ दि.१६/१२/२०२० अन्वये पत्र.

मा.सादर,

विनंती रिपोर्ट सादर की, मा.शासन निर्णय क्रमांक २०१५/प्र.क्र.१९७/नवि - ३३ महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि.१३ आक्टोबर २०१५ अन्वये " केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियांनाची राज्यात अंमलबजावणी करण्या बाबत " प्राप्त मा.शासन निर्णयची अंमलबजावणी करणे अनुषंगाने मा.महासभा प्रस्ताव क्रमांक २४ दि.०९/११/२०१५ अन्वये ठराव पारित झालेला आहे.

तसेच संदर्भ क्र ०१ मा.शासन निर्णयानुसार मा.केंद्र शासन पुस्कृत अमृत अभियांनतर्गत प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकण हे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

तद्नुसार मा.केंद्रशासनाच्या अमृत अभियांना अंतर्गत रक्कम रूपये १३१.०० कोटी चा मलनि:सारण प्रकल्प अहवाल मा.शासनाकडे सादर केला असता मा.शासन निर्णय क्रमांक अमृत-२०१७/प्र.क्र.४२९/नवि-३३,दि.२५/०९/२०१७ अन्वये रक्कम रूपये १३१.०० कोटीचे प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी दिलेली असून सदरहु योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

सदरच्या प्रगतीपथावर असलेल्या मलनि:सारण प्रकल्प /भुयारी गटार योजनेच्या कामामध्ये शहराच्या मध्यवर्ती भागासह सारसनगर, बुरूडगांव रोड, इत्यादी परिसराचा समावेश आहे.

परंतू मा.राष्ट्रीय हरीत लवादाने दिलेल्या सुचनेच्या अनुषंगाने संपुर्ण महानगरपालिका हद्दीत भुयारी गटार योजना राबविणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे. त्यासाठी शहराचा उर्वरित भाग जसे की, सावेडी, बोल्हेगांव, केडगाव, मुकूंदनगर इत्यादी उपनगर परिसराचा भुयारी गटार योजनेमध्ये समावेश करणे गरजेचे व आवश्यक असल्याने सदरहु भागाचा समावेश करणे व सर्व्हे करून नविन प्रकल्प अहवाल तयार करणे अनुषंगाने मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका यांचे दालनात दि.१०/१२/२०२० रोजी कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा. पी.एम.सी. (अमृत अभियान),

अहमदनगर यांचे समवेत झालेल्या आढावा बैठकीतील झालेल्या चर्चेनुसार कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा. पी.एम.सी. (अमृत अभियान), अहमदनगर संदर्भ क्र ०३ अन्वये कळविण्यात आले.

या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर यांचे "अहमदनगर शहर मलनि:सारण योजना टप्पा - ०२ ता, नगर, जि.अहमदनगर ढोबळ अंजादपत्रक सादर करणे बाबतचे " संदर्भ क्र ०४ अन्वये चे पत्र इकडेस प्राप्त झालेले असून त्याचा तपशिल खालिल प्रमाणे आहे.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अहमदनगर शहर मलनि:सारण योजना चे काम आपले महानगरपालिकेमार्फत सुरू असून सदर कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरवित आहे. सदर योजनेमध्ये अहमदनगर शहरामधील मध्यवर्ती भागातील मलनि:सारण कलेक्शनाचे काम, ५७ द.ल.ली. क्षमतेचे मलनि:सारण केंद्र, पंपीग मेन, २ पंपीग स्टेशन, सिना नदीच्या कडेने ट्रंकमेन, नाला इंटरसेप्टर प्रॉपर्टी कनेक्शन व utility shifting यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

अहमदनगर शहरामधील उर्वरित (मध्यवर्ती भाग वगळून) भागा करिता मलनि:सारण कलेक्शनाचे काम, पंपीग मेन, पंपीग स्टेशन,२.५द.ल.ली. क्षमतेचे मलनि:सारण केंद्र, प्रॉपर्टी कनेक्शन व utility shifting यांचा समावेश करून अहमदनगर शहर मलनि:सारण योजना टप्पा - २ चे रक्कम रू.२६५७१.९६ लक्ष निव्वळ (१२%G.S.T.सह) व रक्कम रू.२७३६९.१२ लक्ष ढोबळ (३ % PMC charges सह) किंमतीचे संभाव्य ढोबळ अंदाजपत्रक (Block Estimate) इकडेस सादर केलेले आहे.

कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा. पी.एम.सी. (अमृत अभियान), अहमदनगर यांनी तयार करून इकडेस सादर केलेले वरिल किंमतीचे संभाव्य ढोबळ अंदाजपत्रक (Block Estimate) प्रशासकीय मंजूरीसाठी मा.शासनाचे नगर विकास विभागाकडे मंजूरी सादर करणे आवश्यक आहे. सदरचे संभाव्य ढोबळ अंदाजपत्रकास मा.शासनाची प्रशासकीय मंजूरी मिळालेनंतरच अहमदनगर शहर मलनि:सारण योजना टप्पा - ०२ योजनेचा प्रस्ताव (D.P.R.) तयार करणे व तांत्रिक मान्यता घेणे बाबतची पुढील कार्यवाही करता येईल.

यास्तव विषयाकिंत कामी कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा. पी.एम.सी. (अमृत अभियान), अहमदनगर यांनी इकडेस सादर केलेले वरिल किंमतीचे संभाव्य ढोबळ अंदाजपत्रक (Block Estimate) प्रशासकीय मंजूरीसाठी मा.शासनाचे नगर विकास विभागाकडे मंजूरी सादर करणे उचित राहिल.

तथापी आदेशार्थ सविनय सादर.

यावर विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, अहमदनगर शहर मलनि:स्सारण योजना टप्पा-०१ मधील रिपोर्ट मध्ये नमूद प्रमाणे कामे प्रगती पथावर आहेत. त्या योजनेमध्ये अंतर्भुत नसलेला उर्वरीत भागासाठी टप्पा-०२ योजना करणे ढोबळ अंदाजपत्रक प्रशासकीय मंजुरीसाठी मा.शासनाचे नगरविकास विभागाकडे मंजूरीस्तव सादर करणे योग्य वाटते. तथापि आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, चर्चा करा.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, चर्चा केली ढोबळ अंदाजपत्रका ऐवजी सविस्तर अंदाजपत्रक सादर का करण्यांत आले नाही.

यावरआयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, सर्व प्रकारची कार्यवाही करुनच प्रस्ताव तांत्रिक अभिप्रायासह पाठविणे अन्यथा असे प्रस्ताव त्रूटी काढून शासन परत करेल. त्यामुळे प्रस्ताव मंजूरीस उशीर लागत असतो.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. मा.केंद्रशासीत अमृत अभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा -२ राबविणेकामी प्राप्त ढोबळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणे कामी सदरचा प्रस्ताव मा. राज्य शासनाकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे. मा.शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सविस्तर अंदाजपत्रक आराखडे सर्व्हेक्षण आदी कामे करणेत यावीत. सदर कामासाठी प्रकल्प सल्लागार संस्थेची नेमणूक करणे बाबतची योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

सुचक - मा.श्री.अशोक किसन बडे

अनुमोदक - मा.श्री.अनिल माधवराव शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : ४९** **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित अहमदनगर यांनी शहरामध्ये विद्युत पोल व ट्रान्सफार्मर (डीपी) बसविण्यापूर्वी महानगरपालिकेच्या अटी, शर्तीसह परवानगी घेणे बाबतचा विषय मा.महासभेकडे पाठविणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ:- मा.उपमहापौर अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांचे विद्युत विभाग क्र.६१४ दि.२९/११/२०२१ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, अहमदनगर शहर व उपनगरांमध्ये विविध भागांत महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित अहमदनगर हे शहरामध्ये विद्युत पोल व ट्रान्सफार्मर (डीपी) बसवित असतात. या माध्यमातून नागरीकांना विद्युत पुरवठा केला जातो. परंतु सदरील विद्युत पोल व डीपी हे रस्त्याला अडथळा येईल अशा पदधतीने बसवितात तसेच ट्रान्सफार्मरखाली सिमेंट कॉंक्रीट केले जात नाही त्यामुळे त्याठिकाणी गवत उगवते व मोठया प्रमाणात माती व कचरा टाकला जातो. त्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होवून वाहतूकीस अडथळा निर्माण होतो. याबाबत इकडेस पत्र प्राप्त झालेले आहे.

सदर बाबत माहिती घेतली असता, अहमदनगर महानगरपालिकेला रस्ता रूंदीकरण करताना विद्युत पोल व ट्रान्सफार्मरचा (डीपी) अडथळा येत असल्याने ते काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीची परवानगी घ्यावी लागते तसेच ते हलविण्याकरीता महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणात खर्च येतो. महानगरपालिकेची अर्थिक स्थिती विचारात घेता हा विनाकारण खर्च करावा लागतो. वास्तविक सदरील खर्च महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित अहमदनगर यांनी करणे गरजेचे आहे. मनपावर हा आर्थिक भार पडू नये याकरीता भविष्यात महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस महानगरपालिका कार्यक्षेत्रात पोल उभारणी करतेवेळी महानगरपालिकेची लेखी परवानगी / नाहरकत दाखला घेणे बंधनकारक करणे व महावितरण कंपनीस महानगरपालिका कार्यक्षेत्रात पोल उभारणीकरीता महानगरपालिका कार्यक्षेत्रात पोल उभारणी करणे बाबत महानगरपालिकेचे लेखी परवानगी / नाहरकत घेणे बंधनकारक करणे तसेच महावितरण कंपनीस पोल उभारणी / अनुषंघीक कामाकरीता परवानगी देण्यापूर्वी खालील नमुद कार्यपध्दतीचा अवलंब करणे योग्य वाटते.

१) महावितरण कंपनीने महानगरपालिका कार्यक्षेत्रात पोल उभारणी करणेकरीता महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून उक्त पोल उभारणीचे ठिकाण सार्वजनिक व मनपाच्या मालकीचे असलेबाबत व मंजूर विकास योजनेमधील रस्त्याच्या रूंदीकरणानूसार रस्त्याच्या एका बाजूस (Extrim end) ला असलेबाबत प्रमाणपत्र घेणे तसेच मनपाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पोल उभारणीच्या ठिकाणी कोणत्याहि सर्विसेसला बाधा होत नाही याबाबत नाहरकत दाखला घेणे त्याचप्रमाणे

पाणीपुरवठा विभागाकडून पोल उभारणीच्या ठिकाणी मनपाचे पाणीपुरविठेच्या कोणत्याही प्रकारच्या सुविधेस बाधा होत नसलेबाबत नाहरकत प्रमाणपत्र घेणे व सदर प्रमाणपत्रासह कामाचे ठिकाण दर्शविणारा नकाशासह परीपुर्ण प्रस्ताव मनपाकडे सादर केल्यास महावितरण कंपनीस पुढील नमुद अटी शर्तीच्या अधीन राहून परवाणगी देणे संयुक्तीक होईल.

**अटी / शर्ती**

अ) रस्त्याच्या कडेला विद्युत पोल व डीपी बसविण्यापूर्वी त्याखाली काँक्रीटीकरण करणे बंधनकारक करणे

ब) भविष्यात तसेच रस्ता रुंदीकरणाच्या कामाच्या ठिकाणचे तसेच त्या-त्यावेळेच्या नैसर्गिक अथवा वस्तुस्थिती व आवश्यकतेनूसार पोल व डीपी स्थलांतर करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीची राहिल याबाबत महानगरपालिका कोणताही इतर शुल्क अदा करण्यास बांधिल राहणार नाही. व सदर पोल व डीपी स्थलांतर करण्याची संपूर्णत: जबाबदारी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीची राहिल ही अट बंधनकारक असणे आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यात रस्ता रुंदीकरणाच्या कामास अडथळा निर्माण होणार नाही व काम जलदगतीने होण्यास मदत होईल.

क) सदर पोल डीपी ट्रान्सफार्मरची उभारणी करतेवेळी तसेच उभारणी झाल्यानंतरही सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान / कोणत्याही प्रकारची जिवीत-वित्त हानि / अपघात झालेस त्याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण कंपनीवर राहिल सदर अटीशर्तीसह महावितरण कंपनीस रु.एक हजार नाममात्र शुल्क आकारुन पोल, डीपी व ट्रान्सफार्मर उभारणीस परवानगी देणेबाबत प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविणेबाबत मंजूरीस्तव सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :**

मा.श्री.गणेश कवडे : विषय मंजूर करण्यांत यावा.

मा.श्री.संपत बारस्कर : विषय मंजूर करण्यांत यावा.

मा.महापौर साहेब : ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :**

**ऑफिस रिपोर्ट मंजूर.** महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित अहमदनगर यांनी शहरामध्ये विद्युत पोल व ट्रान्सफार्मर (डीपी) बसविण्यापूर्वी महानगरपालिकेच्या अटी, शर्तीसह परवानगी घेणे आवश्यक आहे. रस्त्याचे काम करतांना ब-याच ठिकाणी विद्युत पोल ट्रान्सफार्मरचा अडथळा येतो

त्यामुळे रस्त्याचे काम करण्यास अडचणी निर्माण होतात भविष्यात अशा प्रकारच्या अडचणी येवू नयेत यादृष्टीने कार्यवाही हाणे आवश्यक आहे.   सदरच्या विषयास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

सुचक -   मा.श्री.अशोक किसन बडे

अनुमोदक -   मा.श्री.अनिल माधवराव शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : ५०** **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सिध्दार्थनगर भागातील लक्ष्मीमाता मंदिर जवळ मा.आमदार स्थानिक विकास निधीतून बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळेमध्ये व्यायाम साहित्य देणे बाबत...

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : 1) इकडील कार्यारंभ आदेश जा.क्र;174 दिनांक 18 जानेवारी, 2020

2) मा.आमदार श्री संग्रामभैय्या जगताप यांच्या तोंडी आदेशानुसार...

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सिध्दार्थनगर भागातील लक्ष्मीमाता मंदिर जवळ महानगरपालिकेच्या जागेत मा.आमदार श्री. संग्रामभैय्या जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतुन विर लहुंजी वस्ताद व्यायामशाळा बांधण्यात आलेली असुन सदर कामासाठी रु.629138/- इतका खर्च करण्यांत आलेला आहे व सदरील व्यायाम शाळेचे बांधकाम दिनांक 06 जुन 2021 रोजी पुर्ण झालेले आहे.

तथापि सदर व्यायाम शाळेमध्ये व्यायामासाठी साहित्य बसविणे आवश्यक असल्यामुळे मा.आमदार श्री.संग्रामभैय्या जगताप यांनी मा.जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय यांस तोंडी सुचना देवुन सदरील व्यायामशाळेत व्यायाम साहित्य बसविणे बाबत सुचना दिलेल्या आहेत तथापि सदरील व्यायामशाळेत व्यायाम साहित्य बसविणेसाठी मा.महासभेचा इराव आवश्यक असलेबाबत मा.जिल्हा क्रीडाधिकारी यांनी सांगितलेले आहे.

तरी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सिध्दार्थनगर भागातील विर लहुंजी वस्ताद व्यायामशाळा, लक्ष्मीमाता मंदिर जवळील महानगरपालिकेच्या व्यायाम शाळेत व्यायाम साहित्य बसविण्याच्या प्रस्तावास मा.महासभेमध्ये मंजुरी मिळावी.

यावर उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे पुढील कार्यवाही साठी.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :**

मा.श्री.गणेश कवडे : विषय मंजूर करण्यांत यावा.

मा.श्री.संपत बारस्कर : विषय मंजूर करण्यांत यावा.

मा.महापौर साहेब : ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सिध्दार्थनगर भागातील लक्ष्मीमाता मंदिर जवळ मा.आमदार स्थानिक विकास निधीतून बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळेमध्ये व्यायाम साहित्य जिल्हा क्रीडा कार्यालय, अहमदनगर यांचेमार्फत बसविणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

सुचक - मा.श्री.अशोक किसन बडे

अनुमोदक - मा.श्री.अनिल माधवराव शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : ५१** **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार चाहुराणा बुद्रुक सर्वे नंबर 46/1 या जागेमध्ये गोरगरीब रुग्णांसाठी अद्यावत यंत्रसामुग्रीसह सुसज्ज नविन हॉस्पीटल बांधणेबाबत...

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ :1) मा.आ.श्री.संग्राम अरुणकाका जगताप,विधानसभा सदस्य, यांचेकडील पत्र जा.क्र.1764/1/21 दि.16/11/2021 (प्राप्त दिनांक 26/11/2021)

2.मा.उपमहापौर,मनपा,अहमदनगर यांचेकडील पत्र क्रं.117 दि.26/11/2021(प्राप्त दिनांक 26/11/2021)

3. मा.सभापती स्थायी समिती यांचे अध्यक्षतेखाली दि.23/11/2021 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

4. मा.जिल्हा नियोजन अधिकारी,जिल्हा नियोजन समिती,अहमदनगरयांचेकडील पत्र क्रमांक/जिवायो 21-22 अर्थसंकल्प-तरतुद/संस.3885/2021 दि.20/08/2021

5.मा.जिल्हा प्रशासन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचेकडील पत्र क्र.न.प./कार्या -2/188 दि.08/09/2021

6. इकडील पत्र क्र.सा.बां.1666 दि.18/10/2021

7. इकडील पत्र क्र.सा.बां.1675 दि.18/10/2021

8. मा.सौ.चोपडा मिना संजय, सभापती, महिला व बालकल्याण समिती, मनपा, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र.53 दि.17/11/2021

9. श्री.संभाजी अशोकराव कदम, माजी नगरसेवक,मनपा, अहमदनगर यांचे दि.25/11/2021 रोजीचे निवेदन

विनंती रिपोर्ट की, अहमदनगर शहर व उपनगरामध्ये लोकवसाहती मोठ्या प्रमाणात वाढत असुन शहराच्या लोकसंख्येत वाढ झालेली आहे. सध्या धावपळीच्या जीवनामध्ये व मानसिक ताणतणामुळे नागरीकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार महानगरपालिकेने नागरीकांना चांगल्या प्रकारच्या आरोग्य सोयीसुविधा देणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या मालकीचे शहरामध्ये अद्यावत व सुसज्ज हॉस्पिटल

नसल्याने गोरगरीब रुग्णांना खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार घ्यावे लागतात. सदरील उपचारासाठी रुग्णांना मोठ्या प्रमाणात अर्थिक खर्च येतो. खाजगी रुग्णालयाची सेवा गोरगरीब रुग्णांना परवडणारी नसते. याकरीता अहानगरपालिकेने अहमदनगर शहरात नविन हॉस्पिटलची उभारणी केल्यास शहरातील ग्रामिण भागातील गोरगरीब रुग्णांना चांगल्या दर्जेदार व माफक दरात आरोग्य सुविधा देता येतील. यासाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नं.46/1 या जागेमध्ये गोरगरीब रुग्णांसाठी अद्यावत यंत्रसामुग्रीसह सुसज्ज नविन हॉस्पिटल बांधण्यात यावे व माफक दरात आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात असे मा.आमदार महोदय व मा.उप महापौर तसेच मा.सौ.चोपडा मिना संजय, सभापती, महिला व बालकल्याण समिती, मनपा, अहमदनगर यांनी इकडेस संदर्भिय क्र. 1, 2 व 8 नुसार निवेदन देवुन कळविले आहे. तथापि श्री.संभाजी अशोकराव कदम, माजी नगरसेवक, मनपा, अहमदनगर यांनी संदर्भ क्र. 9 नुसार निवेदन देवुन आहे त्याच जागेवर नवीन इमारतीचे काम करण्याबाबत मागणी केली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने संदर्भिय क्र.4 नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या कॅ.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुतिगृहातील सेवेचे विस्तारीकरण करणेचा रक्कम रु.17.8760 कोटी रकमेचा प्रकल्प अहवाल तयार करुन स्थापत्य कामाचा रक्कम रु.12,92,18,773/- खर्चाचा प्रकल्प अहवाल संदर्भिय पत्र क्र. 6 अन्वये मा.जिल्हाधिकारी, न.पा. अहमदनगर यांचेकडेस सादर केलेला आहे.

सदर प्रकल्पाअंतर्गत खालील बाबींचा समावेश आहे.

| अ.क्र | तपशील | अंदाजपत्रकीय खर्च |
|---|---|---|
| 1 | स्थापत्य कामे, | 12,92,18,773/- |
| 2 | विद्युतीकरण व फर्निचर (जी.एस.टी. सह) अ) विद्युत ब) उदवाहन (लिफ्ट) क) फर्निचर | 2,88,41,287/- |
| 3 | वैद्यकीय उपकरणे | 2,00,00,000/- |
| 4 | आर्किटेक्ट फि (जी.एस.टी. सह) | 28,86,356/- |
| 5 | तदनुषंगीक खर्च | 30,56,357/- |
| | **एकूण रक्कम रु.** | **17,87,60,572/-** |

सदर ठिकाणी अस्तित्वात असलेला दवाखाना हा सि.स.नं.7484 या भुखंडाचे क्षेत्रफळ 1114.80 स्क्वे.मी. म्हणजे सुमारे 12000 स्क्वे.फुट आहे. सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट केले असता इमारत मनुष्य रहीवास व वापरासाठी अयोग्य आहे, त्यामुळे ती पुर्णपणे पाडुन नव्याने इमारत बांधणे आवश्यक आहे. अस्तित्वातील इमारतीच्या शेजारील भुखंड सि.स.नं. 3850 हा 748.30 स्क्वे.मी. म्हणजे 8051 स्क्वे.फुट इतक्या क्षेत्राचा आहे. सदर क्षेत्रामध्ये

काही प्रमाणात खुली जागा व कर्मचारी निवासस्थाने सुध्दा राहण्यास अयोग्य असल्याने सदर कर्मचाऱ्यांना सदनिका रिकामे करुन देणेबाबत अंतिम नोटीसा यापुर्वीच बजावण्यात आलेल्या आहेत.

भुखंड क्र. 3850 व 7484 हे दोन्ही भुखंड एकत्रित केल्यास त्यास चटई निर्देशांक सुमारे 2 लागु होईल म्हणजे एकुण क्षेत्रफळ 1863.10 स्क्वे.मी. अनुज्ञेय बांधकाम 3726.20 स्क्वे.मी. म्हणजेच सुमारे 40000 स्क्वे.फुट व नवीन युडीसीआर नुसार आणखी अनुज्ञेय होईल. त्यांनुसार सदर कामी इमारतीचे सुधारीत व सविस्तर अंदाजपत्रके मनपाचे पॅनेलवरील आर्किटेक्ट श्री. मनोज जाधव, मे.अविष्कार ग्रुप, अहमदनगर यांचेकडुन करुन घेणेत आलेले असुन उक्तप्रमाणे अंदाजपत्रकीय खर्च अपेक्षित आहे.

सदर स्थापत्य कामाचे रक्कम रु.12,39,76,572/ चे प्रस्तावास येत्या काही कालावधीत प्रशासकिय मान्यता मिळणार आहे. त्याअंतर्गत मनपास रु.7.00 कोटी इतकी रक्कम प्राप्त होणार आहे. तत्पूर्वी आरोग्य विभागाने सदर रुग्णालय इतरत्र स्थलांतरीत केल्यानंतर सदरची इमारत निर्लेखित करुन पुर्णपणे पाडणे, मंजुर निधी वगळता उर्वरीत आवश्यक निधीची तरतुद मनपा फंडातुन करणेबाबतचा प्रस्ताव महासभेपुढे निर्णयासाठी जा.क्र.सा.बां. 1675 दि. 18/10/2021 अन्वये नगर सचिव, यांचेकडेस दाखल केला आहे.

उक्त अहवाल पाहता खाली नमुद बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

1. अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगावरोड येथील मालकीच्या चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नं.46/1या जागेमध्ये नवीन हॉस्पिटल बांधावयाचे झाल्यास त्या जागेवर कोणत्या स्वरुपाचे आरक्षण आहे, त्याठिकाणी हॉस्पिटलचे बांधकाम करता येईल काय?

2. चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नं.46/1 या जागेचे एकुण क्षेत्रफळ किती आहे.

3. नविन दवाखाना बांधकामासाठी अंदाजपत्रकीय खर्चाची तरतुद करणे.

4. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे सद्यस्थितीतील इमारत पाडुन त्या जागी प्रसुतिगृहातील सेवेचे विस्तारीकरण करावयाचे झाल्यास सदर इमारत निर्लेखन करणे.

5. आरोग्य विभागाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथील सर्व प्रकारची वैद्यकिय सेवा इतरत्र स्थलांतरीत करणे.

मा.आमदार महोदय व मा.उप महापौर व इतर यांनी इकडेस कळविलेनुसार बुरुडगावरोड येथील मालकीच्या चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नं.46/1 या जागेमध्ये नवीन हॉस्पिटल बांधावयाचे झाल्यास उक्त 1 व 2 बाबत सहाय्यक संचालक, नगररचना, यांचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे. सहाय्यक संचालक, नगररचना, यांचा अभिप्राय घेवुन सदरचा अहवाल धोरणात्मक निर्णय होणेसाठी मा.महासभेपुढे ठेवणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

यावर सहाय्यक संचालक नगररचनाकार यांचा अभिप्राय की, विषयांकित चाहु बुाा स.नं.४६/१ ही जागा मंजूर दुस-या संधारीत विकास योजने मध्ये विद्यमान प्राथमिक शाहा म्हणून दर्शविलेली असून ती सार्वजनिक निम सार्वजनिक विभागात दर्शविलेली आहे.

तसेच सदर जागेचा मालकी हक्काचा उतारा मोजणी नकाशा सोबत जोडून पाठवित आहे. UDPCR Cl.No.४.१० (ii) नुसार Public / Semipublic zone मध्ये Hospital वापर अनुज्ञेय राहील.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ व ब मधील अभिप्रायानुसार मा.महासभेपुढे निर्णय घेणेसाठी आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :**

**मा.उपमहापौर साहेब** : विषय मंजूर करा.

**मा.महापौर साहेब :** ऑफिस रिपोर्ट मंजूर..

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नंबर 46/1 या जागेमध्ये गोरगरीब व गरजू रुग्णांसाठी अद्यावत यंत्रससामुग्रीसह सुसज्ज नविन दवाखाना बांधण्यास ही सभा मान्यता देत आहे.

शहर गांवठाण भागात अस्तित्वात असलेल्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याच्या इमारत नुतनीकरणासाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त झालेला असून सदर निधीतून कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याची जुनी इमारत पाडून नव्याने बांधकाम करावयाच्या कामास बराच अवधी लागणार आहे. इमारत तातडीने पाडल्यास सद्यस्थितीत सुरू असलेल्या दवाखान्याची सुविधा नागरिकांना देण्यास अडचणी येतील. याकरिता बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. या दवाखान्यासाठी प्राप्त झालेला निधी परत जावू नये याद्दष्टिने तसेच गोरगरिब रूग्णांना अदयावत सुविधा मिळण्याच्या दृष्टिने सदरचा निधी चाहुराणा बुद्रुक सर्व्हे नं. 46/1 या जागेमध्ये दवाखाना बांधकामासाठी वापरणे बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच याच दवाखान्याच्या बांधकामासाठी उर्वरित निधीसाठी परिपूर्ण प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजने अंतर्गत मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडेस पाठविणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

तरी नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले

अनुमोदक : मा.श्री.अविनाश हरिभाऊ घुले

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७**   **प्रस्ताव क्रमांक : ५२**   **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** प्रभाग क्रमांक 14 मधील विविध ठिकाणी ओपन स्पेसमध्ये ओपन जीम साहित्य जिल्हा क्रीडा कार्यालय, अहमदनगर यांचेमार्फत बसविणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : 1) मा.उपमहापौर यांचे दिनांक 28/12/2021

वरिल विषयान्वये कळविण्यांत येते की, प्रभाग क्र.14 मधील महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी ओपनस्पेस आहेत. या ओपनस्पेसमध्ये या परिसरातील नागरीक, महिला, मुली व्यायामासाठी येत असतात. आजच्या धावपळीच्या जीवनात व्यायामाला अनन्यसाधारण महत्व असल्याने खालील ठिकाणी ओपनस्पेसमध्ये ओपन जीम साहित्य बसविणे आवश्यक आहे.

1. प्रभाग क्र.14 मध्ये समर्थनगर येथे पाण्याच्या टाकीजवळ ओपनस्पेसमध्ये ओपन जीम साहित्य बसविणे.
2. प्रभाग क्र.14 मधील बालाजी कॉलनी, बुरुडगांव रोड येथील ओपनस्पेसमध्ये आपन जीम साहित्य बसविणे.
3. प्रभाग क्र.14 मध्ये माडगे महा येथील ओपन स्पेसमध्ये ओपन जीम साहित्य बसविणे.
4. प्रभाग क्र.14 मध्ये मातोश्री गार्डन, विनायकनगर, महालक्ष्मी कॉलनी येथील ओपन स्पेसमध्ये ओपन जीम साहित्य बसविणे.
5. प्रभाग क्र.14 मध्ये जयपुर गोडावून, राजमोतीनगर येथे ओपन स्पेसमध्ये ओपन जीम साहित्य बसविणे.

तरी हे जीम साहित्य जिल्हा क्रीडा कार्यालय, अहमदनगर यांचे निधी अंतर्गत करणेकामी मा.महासभेची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने मान्यतेस्तव सविनय सादर...

यावर उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेसाठी.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. प्रभाग क्रमांक 14 मधील विविध ठिकाणी ओपन स्पेसमध्ये ओपन जीम साहित्य जिल्हा क्रीडा कार्यालय, अहमदनगर यांचेमार्फत बसविणेस ही सभा मान्यता देत आहे. या व्यतिरिक्त प्रभाग क्रमांक 5 मधील सावेडी येथील प्रोफेसर कॉलनी जॉगिंग ट्रॅक व प्रभाग क्रमांक 16 मधील केडगांव गावठाण याठिकाणी महानगरपालिकेच्या ओपन स्पेसमध्ये ओपन जीम बसविणे, प्रभाग क्रमांक 2 मधील नंदनवन कॉलनीतील ओपन स्पेस मध्ये, प्रभाग क्रमांक 7 मधील बोल्हेगांव परिसरातील नंदनवन नगर (पोलीस कॉलनी) येथील ओपन स्पेस, प्रभाग क्रमांक 7 बोल्हेगांव परिसरातील संत तुकाराम जॉगिंग पार्क ओपन स्पेसमध्ये, प्रभाग क्रमांक 14 मधील भवानीनगर येथील ओपन स्पेसमध्ये, प्रभाग क्रमांक 1 मधील सैनिक नगर येथील कसबे वस्तीतील भिस्तबाग सर्व्हे नंबर 1 मधील ओपन स्पेसमध्ये, प्रभाग क्रमांक 17 मधील केडगांव एकता कॉलनी मधील ओपन स्पेसमध्ये, इत्यादी ठिकाणी ओपन जीम साहित्य जिल्हा क्रीडा कार्यालय, अहमदनगर यांचेमार्फत बसविणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

सुचक - मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले.

अनुमोदक - मा.श्री.संपत विजय बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७** **प्रस्ताव क्रमांक : ५४** **दिनांक :- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 14 मधील महात्मा फुले चौक ते भिंगारवाला नाला व भिंगारनाल्यावर पुल बांधणे व रस्ता करणे बाबत...

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ :- 1) मा.उपमहापौर श्री.गणेश पुंडलिक भोसले, यांची दि.27 सप्टेंबर 2021 रोजीची यादी.

2) मा.आयुक्त दालनात मा.आयुक्त,मा.उपायुक्त (सा),मा.उपायुक्त (कर), मा.शहर अभियंता यांचेसमवेतची बैठक.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये रिपोर्ट सादर की, महात्मा फुले चौक ते सारसनगर या रस्त्याबाबत मा.आयुक्त दालनात स्थानिक नगरसेवक,पदाधिकारी यांचेसमवेत दि.27 सप्टेंबर 2021 रोजीच्या चर्चेनुसार यश पॅलेस ते कोठी हा प्रमुख रस्ता सुमारे 5 वर्षापुर्वी झाल्यामुळे व सदरचा रस्ता सुस्थितीत असून मोठया प्रमाणात वाहतुक होत आहे. तथापि या रस्त्यावरुन सारसनगरला जाण्यासाठी असणारा कॉक्रींटचा रस्ताहा खराब झाल्यामुळे त्यानुसार समक्ष पाहणी करुन अंदाजपत्रक तयार करणेचे सुचित करण्यांत आले. तथापि चर्चेअंती सदर कॉक्रींट खराब झालेला असून सदर रस्त्यावर काही भागात डांबरीकरण करण्यांत आलेले होते. त्यामुळे डांबरीकरणाचा वरचा पृष्ठभाग पुर्णपणे नादुरुस्त झालेला आहे. परंतु संपूर्ण मार्केटयार्ड परिसरातील पाणी उताराने सदर रस्त्यावर येते व भिंगारनाल्याला जाते. सदर पाण्यामुळे कॉक्रींटचा काही भाग व डांबरीकरणाचा भाग खराब झालेला आहे. परंतु कॉक्रींटचा रोड घरांच्या बरोबर असल्यामुळे परिसरातील नागरीक व पदाधिकारी यांचे मागणीनुसार सदर कॉक्रींट रस्ता संपुर्ण खांदून रस्ता खाली गेल्यावर व एका बाजुने गटर केल्यास व पुर्ण पाण्याचा निचरा होईल. व जलनिस्सारणाची व्यवस्था होईल. सदर अस्थित्वातील रस्त्यावर कॉक्रीटीकरण करावयाचे झाल्यास सुमारे 50.00 लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. तथापि सदर रस्ता पुर्णपणे खोदून, सर्व बाबी धरुन रस्त्याचे कामाचे ािर नव्याने करुन कॉक्रीटीकरण करणे व एका बाजुने आर.सी.सी.पाईप गटर करणे, नविन पुलाचे शेजारी जुना दगडी पुल हा पुर्णपणे नादुरुस्त झालेला असल्याकारणाने तो देखील वाहतुक योग्य करावा लागणार आहे.

त्यानुसार संपुर्ण रस्ता खोदून, एका बाजुने गटर करणे व पुलाची दुरुस्ती करणे इतयादी करीता अंदाजे रक्कम रु.2,49,95,546/- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच सर्व योजना डी.पी.रुंदीपर्यंत करणे गरजेचे आहे.सध्या अस्तित्वातील रस्ता काही ठिकाणी 12 ते 13 मीटर, काही ठिकाणी 9 मीटर इतका असून, एका ठिकाणी पीर आहे. त्यामुळे नगररचना विभागाकडून रस्त्याची संपुर्ण मोजणी करुन रस्त्यावरील अतिक्रमण काढणेकरीता अतिक्रमण विभागामार्फत कार्यवाही करावी लागेल. सदर रस्ता खोदून पुर्ण नव्याने करणे, 250 एमएम जाडीचे कॉक्रींट करणे या सर्व कामासाठी रु.2,49,95,546/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर बाबत मा.उपमहापोर श्री.गणेश पुंडलिक भोसले यांनी संदर्भीय पत्र क्र.1 अन्वये सदरचा पुल हा दोन भागांना जोडणारा मुख्य रस्त्यावर आहे. सध्याचा पुल हा 50 वर्षापुर्वीचा असल्याने मोडकळीस आलेला असून नविन पुल बांधणे गरजेचे आहे. मा.उपमहापौर यांनी यादी देवून सदर कामासाठीचा खर्च "15 वा वित्त आयोग" मधून करणेबाबत इकडेस कळविले आहे.

त्यानुसार अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र. 14 मधील भिंगारनाल्यावर पुल बांधणे व रस्ता करणे कामाचा खर्च "15 वा वित्त आयोग" "अबंधनकारक" मधून करणेस रिपोर्ट अवलोकनार्थ तथा आदेशार्थ सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.उपायुक्त कर यांचे अभिप्राय घेवून मा.महासभेसमोर सादर करणेस मान्यतेस्तव.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, 15 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीमधुन अबंधनकारक Non filed Grants निधीमधुन यापुर्वी प्रस्तावित 2.5 कोटी रुपये (250 लक्ष) रक्कम महाराष्ट्र राज्य विघुत वितरण कंपनीकडील विज बिल देणेकामी प्रस्तावित केले होते ते रद्द करुन सदरचा निधी 250 लक्ष सारसनगर येथील भिंगार नाल्यावर पुल बांधणेसाठी वर्ग करणेस मान्यता मिळावी व तसा प्रस्ताव सर्व साधारण सीोसमोर पाठविणेस मान्यता मिळावी हि विनंती.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा**

मा.श्री.संपत बारस्कर - विषय मंजूर करा.
मा.श्री.गणेश कवडे - विषय मंजूर करा.
मा.महापौर साहेब - विषय मंजूर

---*---

**ठराव :**

ऑफिस रिपोर्ट मंजूर मा.शासनाच्या 15 वित्त आयोगाच्या प्राप्त निधीमधून अबंधनकारक अनुदानामधून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडील विज बील देणेकामी रक्कम रूपये 2 कोटी 50 लाख चे काम रद्द करण्यात येत असून सदर अनुदानातून प्र.क्र. 14 मधील महात्मा फुले चौक ते भिंगारवाला नाला व भिंगारनाल्यावर पुल बांधणे व रस्ता करणेचे काम (रक्कम रूपये 2 कोटी 50 लाख ) करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कारवाई करावी.

सुचक - मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले

अनुमोदक - मा.श्री.गणेश खंडेराव कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : ५३ दिनांक:- १२/०१/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

1) सौ.आशा शिवाजीराव कराळे माझी तब्येत बरी नसल्याने दिनांक 19/10/2023 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

2) सौ.लताबाई बलभिम शेळके माझी तब्येत बरी नसल्याने दिनांक 19/10/2023 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

---*---

**ठराव :**

नोंद घेण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे

अनुमोदक :मा.श्री.परसराम बाळु गायकवाड,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश. जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.- दिनांक : ०५/०१/२०२२

**विषय : अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
बुधवार दिनांक १२/०१/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे होणा-या विशेष सर्वसाधारण सभे बाबत...

प्रति,

१) श्री.शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
२) श्री.सुधाकर राउत, सामान्य प्रशासन विभाग,
३) श्री.सुभाष ढगे, स्थायी समिती कार्यालय,
४) श्री. बाबासाहेब गुंड, महापौर कार्यालय,
५) श्री.दयानंद साळवे, विरोधी पक्ष नेता कार्यालय
६) श्री.प्रदीप निलाखे, महिला व बालकल्याण समिती कार्यालय,
७) श्री.राज चोटीले, सिक्युरिटी गार्ड

अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १२/०१/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी आपण सकाळी १०.०० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

उपायुक्त,

अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**कार्यालयीन आदेश.** जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.- दिनांक : ०५/०१/२०२२

**विषय : अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
बुधवार दिनांक १२/०१/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता होणा-या मा.विशेष सर्वसाधारण सुचना क्रमांक ०७ मध्ये आपले नावासमोरील नगरसेवकांना व्हिडीओ कॉन्फरन्सींगचे मार्गदर्शन करणे बाबत...

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०७ **बुधवार दिनांक १२-०१-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी खालील प्रमाणे आपल्या नावासमोर दर्शविलेल्या सन्माननीय सदस्यांना मिटींगला उपस्थित राहणेसाठी व्हिडीओ कॉन्फरन्सींग बाबत मार्गदर्शन करावे.

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| १ | ११ - ब | घुले अविनाश हरिभाऊ **सभापती, स्थायी समिती** | 9225322062 | श्री.विष्णु देशमुख |
| २ | ११ - ड | शेख नजीर अहमद अ.रज्जाक | 9272225862 | |
| ३ | १२ - अ | बाळासाहेब मारुती बोराटे | 9422222079 | |
| ४ | १२ - ड | कावरे दत्तात्रय हरीभाऊ | 9881777760 | |
| ५ | १३ - अ | कवडे उमेश (गणेश) खंडेराव | 9270443333 | |
| ६ | १३ - ड | लोंढे सुभाष सोपानराव | 9921799992 | |
| ७ | १४ - अ | भागानगरे प्रकाश बाबुराव | 9422230181 | |
| ८ | १४ - ड | भोसले गणेश पुंडलिक **उपमहापौर** | 9422221596 | |
| ९ | १५ - अ | गायकवाड परसराम बाळू | 9860536395 | |

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| १० | १५ - ड | शिंदे अनिल माधवराव | 9422223268 | |
| | | | | |
| ११ | ०४ – क | योगीराज शशिकांत गाडे | 9689896982 | श्री.किरण उजागरे |
| १२ | ०५ – अ | दुलम मनोज लक्ष्मण | 9225700007 | |
| १३ | ०५ – ड | गंधे (भैय्या) महेंद्र मोहनिराज | 9422220460 | |
| १४ | ०६ – ड | बारस्कर रविंद्र रावसाहेब **सभागृहनेता** | 9422221333 | |
| १५ | ०७ – ब | बडे अशोक किसन | 9822451468 | |
| १६ | ०७ – ड | वाकळे कुमार बबन | 9730015555 | |
| १७ | ०८ – क | शिंदे सचिन चंद्रशेखर | 9422229078 | |
| १८ | ०८ – ड | नळकांडे शाम किसन | 9271907171 | |
| १९ | ०९ – क | प्रदीप अमरसिंग परदेशी | | |
| २० | १० – अ | उणावणे अक्षय सदानंद | 9130065007 | |
| | | | | |
| २१ | ०६ - ब | वाकळे बाबासाहेब सोन्याबापु, | 9422226510 | श्री.किशोर कानडे |
| २२ | १० - ड | शेख मुदस्सर जहांगीर | 8007863232 | |
| २३ | ०४ – ड | शिंदे स्वप्निल रोहिदास | 7774937777 | |
| २४ | ०१ – ड | बारस्कर संपत विजय | 9890408050 | |
| २५ | ०१ – अ | बोरुडे सागर अर्जुन | 9822115406 | |
| २६ | ०२ – अ | पाऊलबुधे विनीत नाथ | 9822076968 | |
| २७ | ०२ – ड | त्र्यंबके सुनिल नारायण | 9552690159 | |
| २८ | ०३ – अ | आसिफ सुलतान | 9822828589 | |
| २९ | ०३ – ड | खान समद वहाब | 9860147715 | |
| | | | | |
| ३० | ०९ – ड | सुप्रिया धनंजय जाधव | 9860655555 | श्रीमती. हेमलता साळवे |
| ३१ | १० – ब | जाधव अश्विनी सचीन | 9850100009 | |
| ३२ | १० – क | पंजाबी अनिता जसपालसिंग | 9422236460 | |
| ३३ | ११ - अ | पारगे रुपाली जोसेफ | | |
| ३४ | ११ - क | कुरेशी परवीन आबीद | 9665025555 | |
| ३५ | १२ - ब | सुरेखा संभाजी कदम | 9422222003 | |
| ३६ | १२ - क | लोखंडे मंगल सुनिल | 9423561112 | |
| ३७ | १३ - ब | चितळे सोनाली अजय | 9881451331 | |

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| ३८ | १४ - ब | जगताप शितल संग्राम | | |
| ३९ | १४ - क | चोपडा मीना संजय | 9822025757 | |
| | | | | |
| ४० | ०४ – ब | बोरकर शोभा सुधाकर | 9225522255 | श्रीमती.मेघना निकम |
| ४१ | ०५ – ब | शिंदे सोनाबाई तायगा | 7350333303 | |
| ४२ | ०५ – क | आशा शिवाजीराव कराळे | 9422221015 | |
| ४३ | ०६ – अ | जाधव पल्लवी दत्तात्रय | 9604390180 | |
| ४४ | ०६ – क | ताठे वंदना विलास | 9527525888 | |
| ४५ | ०७ – अ | भाकरे रीता शैलेश | 9860755573 | |
| ४६ | ०७ – क | सप्रे कमल दत्तात्रय | 9822051375 | |
| ४७ | ०८ – अ | शेंडगे रोहिणी संजय **महापौर** | 9822788388 | |
| ४८ | ०८ – ब | बोरुडे पुष्पा अनिल | 9422227473 | |
| ४९ | ०९ – अ | चव्हाण शीला दीप | 9422221555 | |
| | | | | |
| ५० | ०९ - ब | ढोणे मालन सुरेश | ९९२३३१४२२४ | सौ.जोशी स्मिता |
| ५१ | १७ – क | शेळके लताबाई बलभिम **सभापती,महिला व बा.समिती** | 9657979797 | |
| ५२ | १३ – क | गेनाप्पा सुवर्णा संजय **उपसभापती, मबाकस** | 9420689999 | |
| ५३ | ०१ – ब | सौ.मिना शिवाजी चव्हाण | 8788206185 | |
| ५४ | ०१ – क | बारस्कर दिपाली नितीन | 9822415757 8087099198 | |
| ५५ | ०२ – ब | वारे रुपाली निखील | 9850000852 | |
| ५६ | ०२ – क | पवार संध्या बाळासाहेब | 9561252700 8888757636 | |
| ५७ | ०३ – ब | खान मीनाज जाफर | 9021112312 | |
| ५८ | ०३ – क | शेख रिजवाना फारूक | 9881870245 | |

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| ५९ | ०४ – अ | सौ.ज्योती अमोल गाडे(कर्डीले) | 8975872525 | |
| | | | | |
| ६० | १५ - ब | जाधव सुवर्णा दत्ता | 9271881256<br>9404615151 | श्री.उपलंची |
| ६१ | १५ - क | खैरे विद्या दिपक | 9881742471 | |
| ६२ | १६ - अ | शिंदे शांताबाई दामोदर | 9890537625 | |
| ६३ | १६ - ब | कोतकर सुनिता संजय | 8888026575 | |
| ६४ | १६ - क | पठारे विजय मोहनराव | 9623240303 | |
| ६५ | १६ - ड | येवले ज्ञानेश्वर ऊर्फ अमोल शिवाजी | 9881778181 | |
| ६६ | १७ - अ | कांबळे राहुल दादु | 9922708803 | |
| ६७ | १७ - ब | ननावरे गौरी गणेश | 9422319181 | |
| ६८ | १७ - ड | कोतकर मनोज शंकर | 9890449126 | |
| | | | | |
| ६९ | स्विकृत सदस्य | आढाव मदन संपत | ९२७२८१७१११ | श्री.सोनु चौधरी |
| ७० | स्विकृत सदस्य | शेळके संग्राम बबनराव | ९६८४११११११ | |
| ७१ | स्विकृत सदस्य | आंधळे रामदास नानाभाउ | ९८२३०३६१६१ | |
| ७२ | स्विकृत सदस्य | शेटीया विपुल मुलचंद | ९८२२०६९८११ | |
| ७३ | स्विकृत सदस्य | कातोरे राजु आसाराम | ९८९०९०२२९१ | |

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश. जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.- दिनांक : ०५/०१/२०२२

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०७ **बुधवार दिनांक १२-०१-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त (सा),
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| २) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. सदरच्या येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. |
| ३) | इलेक्ट्रीक विभाग प्रमुख | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची व्यवस्था करण्यात यावी. सदर दिवशी विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ४) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहाय्यक, आयुक्त कार्यालय, | : | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ५) | श्रीमती.मेघना निकम, नगरसचिव विभाग | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ६) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

## नगरसचिव विभाग

---*---

**अहमदनगर महानगरपालिकेची सभा सुचना क्रमांक ०७, बुधवार दि. १२/०१/२०२२ रोजीचा विशेष सर्वसाधारण सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

| पान क्रमांक | नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री.-------------------------, | |
| २ | श्री.-------------------------, | |
| ३ | श्री.-------------------------, | |
| ४ | श्री.-------------------------, | |

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

नगरसचिव विभाग.-                                                                 दिनांक : २१/०६/२०२१

विषय : शुक्रवार दिनांक - २५ / ०६ /२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०२ च्या चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक २ शुक्रवार दिनांक २५/०६/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर येथे व्हीडीओ कॉन्फरन्सींग व्दारे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.४७०/- (अक्षरी रक्कम रुपये चारशे सत्तर फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या * **सभेचे चहा नाष्टा बील** * या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.किशोर कानडे, लिपीक टंकलेखक, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.किशोर चंद्रकांत कानडे, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | : | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | : | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | : | |
| **२ व ३ ची बेरीज** | : | |
| **उपलब्ध शिल्लक** | : | |

नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

चर्चा :-

मा.महापौर साहेब : सभा सुरु करा.

विषय क्रमांक 26 चे वाचन करण्यांत यावे.

मा.श्रीमती.चितळे : मुलीच्या लग्नाचे वय 21 केले.त्या बद्दल मा.पंतप्रधान मोदी साहेबांचे आभार. महिलांसाठी शक्ती कायदा लावला त्याबद्दल मा.मुख्यमंत्री साहेब यांचे आभार

मा.बाबासाहेब वाकळे : हा विषय घेण्यामागचा हेतू काय

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले : ऑफिस रिपोर्ट वाचा.

मा.बाबासाहेब वाकळे : रस्ता वगळण्या मागील उद्देश काय आहे.

इंजिनियर श्री.बल्लाळ : 16 मे, 2015 मध्ये मुळ डी.पी. नव्हता 16 मे, 2015 ला शासनाने ट्रक टर्मिनेस मंजूरकरतांना शासनाने रस्ता दर्शविला आहे. एस.टी.महामंडळाची जागा 9 मीटर व ट्रक टर्मिनन्स च्या जागेतून 9 मीटर रस्ता गेला. मनमाड रोड व लिंक रोडला जोडणारा हा रस्ता आहे. एस.टी.महामंडळा कडुन समाजकल्याण विभागाने जागा खरेदी केली आहे. वापर मंजूर झाल्यानंतर सामाजीक न्याय विभागाचे काम सुरु झाल्यानंतर सामाजिक संघटना, रिपब्लीकन पार्टी या संघटनेमार्फत हा रस्ता वगळणेबाबत मागंणी केली आहे . वगळणे हा पार्ट नाही 18 मीटर ऐवजी 9 मीटर रस्ता करायचा आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : हा रस्ता विकसीत झालेला नाही. 9 मीटर रस्ता विकसीत झालेला नाही. कुठेही रस्ता विकसीत झालेला नाही तेथे रहिवासी आहेत. कमी का असेना पण रस्ता राहू द्या जागेवर रस्ता अजिबात नाही.

इंजिनियर श्री.बल्लाळ : WBM रोड विकसीत झालेला आहे. देवांग कोष्टी समाजाच्या मागे रस्ता विकसीत झाला आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : 9 मीटर रस्ताच अस्तीत्वात नाही .

मा.श्री.गणेश कवडे : 12 मीटर विकसीत केला तर चालेल.

इंजिनियर श्री.बल्लाळ :गट नकाशात 18 मीटर रस्ता आहे डिस्ट्रीक्ट कमर्शिअल सेंटर विकसीत करतांना जागा हस्तांतरण केली आहे.

मा.श्री.गणेश कवडे : लोकांची गैरसोय झाली नाही पाहिजे. 12 मीटर करावा.

इंजिनियर श्री.बल्लाळ : आपल्याच मालकीची जागा आहे 9 मीटर रस्त्यावर कमर्शिअलची कामे होणार नाही.

मा.श्री.शाम नळकांडे : 12 मीटर केला तर पुढची गैरसोय टाळली जाईल.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : या ठिकाणी सर्व पक्षाच्या नगरसेवकांनी समक्ष पाहणी करावी.

मा.श्री.अनिल शिंदे : 18 मीटर रस्ता वगळण्या संदर्भात विषय घेतला आहे. सामाजिक

न्याय विभागाची जागा 1 हेक्टर आहे. शासनाची जागा आहे. आजुबाजुला जे शेतकरी असतील उद्या त्यांना ले आऊट करायचा असेल तर तेथे उद्याच्या काळात गाड्या लागल्या तर 12 मीटर केला तरी जायला यायला रस्ता राहील का. 12 मीटर करणे कितपत योग्य आहे. उद्याच्या काळात रस्ताही कमी केला तर त्रास होणार नाही का. महापौर जे रुलिंग देतील ते मान्य करु. नगर शहर झपाट्याने वाढत आहे. सावेडी परिसरात वाढ होत आहे. 2017 साली याचा आपण ठराव केला आहे. शासनाकडे पाठवला शासनाचे काय उत्तर आले.

इंजिनियर श्री.बल्लाळ :हरकती मागवून सुनावणी घेण्यात आली आहे.
आता जो सभा निर्णय घेईल तो शासनाकडे जाईल मागचा ठराव गेलेला नाही.

मा.श्री.अनिल शिंदे : माझे मत  9 मीटर किंवा 12 मीटर योग्य आहेत शेजारचे उद्या कोर्टात गेले तर अडचणीचे ठरणार नाही का.

इंजिनियर श्री.बल्लाळ : शेजारी जर कोर्टात गेले तर अडचणीचे ठरेल. आयुक्त साहेब या ठिकाणी आहेत योग्य तो निर्णय घ्यावा. शेजारच्या शेतक-यांची बाजू ते जर कोर्टात गेले तर स्ट्रॉंग होईल. या सभागृहाने योगय तो निर्णय घ्यावा असे माझे ठाम मत आहे.

मा.महापौर साहेब : आता विषय स्थगीत ठेवण्यांत येत आहे. प्रत्यक्ष पाहणी करुन पुढच्या सभेत विषय घेवू. पुढचा विषय घ्या.
विषय क्रमांक 27 चे वाचन.

मा.श्री.अनिल शिंदे : ऑफिस रिपोर्ट मंजूर करा.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : या विषयात महानगरपालिकेला फायदा काय त्याचे डीटेल्स द्या. आपल्याला भाडे देणार का. सांस्कृतिक भवन विकसीत करणेसाठी सिंध हिंद संवा मडल चॅरीटेबल ट्रस्ट  यांना  जागा देणार आहोत. उत्पन्नाचे साधन करुन तुम्ही जर पैसे कमवले तर?

इंजिनियर श्री.बल्लाळ :रोटरी क्लबला जी जागा देणार त्या जागेचे नियमाप्रमाणे भाडे ते देणार आहे. नियमाप्रमाणे भाडे घ्यावे लागणार त्रिसदस्य समिती जे भाडे ठरवणार ते घ्यावे लागेल.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : महानगरपालिकेच्या कर्मचा;यांना त्या दवाखान्यात उपचारासाठी फायदा द्यावा अशी अट टाका.कर्मचार्यांना मोफत उपचार करणे अशी अट टाका.

मा.श्री.गणेश कवडे : 26 नंबरचा विषय तहकुब करण्यापेक्षा प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी कर व त्या ठिकाणी निर्णय घेवू. विषय तहकूब करु नका.

मा.महापौर साहेब : ठिक आहे.पहाणी करुन निर्णय घेउ.

मा.श्री.आसीफ सुलतान : 22 नंबर 21 डिसेंबर, 2021 ला प्रस्ताव नगरसचिव विभागाने परत निकाली न काढलेले किती प्रस्ताव परत पाठविले याची माहिती द्यावी.

नगरसचिव श्री.तडवी : नगरसचिव विभागाकडे प्रस्ताव सादर होतात 90 दिवसाच्या आत पिठासीन अधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करतो त्यावर जर निर्णय झाला नाही तर 90 दिवसानंतर परत संबंधित विभागाकडे प्रस्ताव पाठवून देतो. यादी मागवून माहिती देतो.

मा.श्री.आसीफ सुलतान : याची जबाबदारी निश्चीत करा.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले : किती विषय पाठवले याबाबत नगरसचिव माहिती दिली दोन दिवसात लेखी माहिती द्यावी. याबाबत नगरसचिवांना आदेश देतो.

मा.श्री.आसीफ सुलतान : आर. क्र .300 विकसीत करण्यासाठी मी कागदपत्र मागीतले आहे. अजुन माहिती दिली नाही. नगररचना विभागानी माहिती दिली नाही. नगररचनाची माहिती का दिली नाही.

नगररचनाकार श्री.चारठाणकर : दोन दिवसात माहिती देतो.

मा.श्री.आसीफ सुलतान : आत्ताच माहिती द्या युडीसीपीआर मध्ये जेवढया बांधकाम परवानगी दिली याची माहिती देत नाही. प्रभागातर्फे साधे चेंबर रिपेअर होत नाही. आमच्यावरच अन्याय का आयुक्त साहेबांवर कारवाई करा. त्यांची मुक संमती दिसते आहे.असा माझा आरोप आहे.

मा.श्री.अशोक बडे : सन्माननीय नगरसेवक किरकोळ मुद्दे मांडतात ते सुध्दा कामे होत नाही.

मा.श्री.आसीफ सुलतान : सभेतच आम्हाला प्रश्न विचारायला संधी मिळते.

मा.श्री.अशोक बडे : प्रशासन काम करीत नाही.

मा.श्री.आसीफ सुलतान : हे अधिकारी 3 वर्षे काढुन गोळा करुन निघुन जातात असा माझा स्पष्ट आरोप आहे. मागच्या वेळेस फेज-2 वर कनेक्शन शिफ्ट करतांना कोणतेही दर आकारु नये असे महापौर यांनी आदेश दिलेले असतांना आयुक्तांनी असे करता येणार नाही असे आदेश दिले.
ठेकेदाराच्या घशात घालायचे का.

मा.आयुक्त साहेब : आपलयाला माहित आहे फेज-2 चे सगळया लोकांनी कनेक्शन ऑलरेडी घेतले दर वगैरे पॉलिसी घेवून ठरवले ते कमी कसे करणार एका भागासाठी एक न्याय व दुस-या साठी दुस-यासाठी वेगळा न्याय असे करता येणार नाही.दर रद्द करायचे असा सभागृहात निर्णय झालेला नाही. ज्या लोकांनी पैसे भरले मग त्यांचे पैसे परत करायचे का व्याज आकारायचे नाही. जे कनेक्शन बेकायदेशीर घेतले त्यावर काय निर्णय घ्यायचे ते ठरवा.

मा.महापौर साहेब : व्याज आकारु नका असा विषय झाला.

मा.श्री.अनिल शिंदे : जे अनधिकृत कनेक्शन असतील त्यांच्यावर फौजदारी कारवाई करायचे असा निर्णय मागच्या सभेत झाला आहे.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले : तसा ठराव घ्यावा लागेल असे कमी होणार नाही.

मा.श्री.योगीराज गाडे : नविन कनेक्शन घ्या असे अवाहन कचरा गाडीवर अलौसिंग करा.

मा.आयुक्त साहेब :आम्ही फेज-2 च्या लाइनवर नविन कनेक़्शन घेणेबाबत जाहीर आवाहन पेपरमध्ये दिले. अलौसिंग केले. नोव्हेंबर पर्यंत अधिकृत साठी संधी देवू माझी पॉलिसी ठरवतो. पण 30 नोव्हेंबर पर्यंत नागापुर ,बोल्हेगाव वॉर्डातील लोकांना नळ कनेक़्शन साठी आवाहन केले पण लोकांनी अजुन रिसपॉन्स दिला नाही.

मा.श्री.कुमार वाकळे : भालेराव हा कर्मचारी नागरिकांना नळ कनेक्शन साठी पैसे मागतो. आपले कर्मचारी यांना सांगा सरंजाम शाही बंद करा. आपले कर्मचारी त्रास देतात. फिल्डवर येत नाही. मी यापुर्वी पत्र दिले ज्यावेळेस बांधकाम परवानगी देतो त्याचवेळेस पैसे भरुन घ्या. बिल्डर घर बांधून निघून जातो. व नंतर अडचणी येतात. बिल्डरने बांधलेल्या पुर्ण युनिटचे नळ कनेक्शनचे पैसे भरुन धेतल्याशिवाय परवानगी देवू नये बिल्डर कनेक्शन धेत नाही एखाद्या ठिकाणी 30 फ्लट आहेत त्यापैकी 10 फ्लट धारक कनेक्शन घेतात. माझे असे मत आहे सर्वांनी यात लक्ष घालून जेवढया फ्लटची बांधकाम परवानगी काढली तेवढे कनेक्शन घेतले की नाही हे पाहिले पाहिजे.

मा.आयुक्त साहेब : बांधकामासाठी पाणी लागणार असेल तर तो बांधकामासाठी घेतो. कुठलाही बिल्डर स्वतःच्या नावावर कनेक्शन घेणार नाही. प्लन अडवला तर जाणून बुजून प्लन अडवला असे म्हणेल फायनल कंम्प्लीशन देतो त्यावेळी देवू नये असे ठरवू शकतो.

मा.श्री.कुमार वाकळे : बिल्डर विकुन मोकळे होतात.

मा.आयुक्त साहेब : एनओसी दिल्याशिवाय बिल्डर विकणार नाही.

मा.श्री.कुमार वाकळे :बोल्हेगाव, नागापुर भागात नव्याने वसाहती होत आहे. कित्येक ठिकाणी फेज-2 ची पाईपलाईन पडलेली नाही. ठेकेदार म्हणतो पाईप संपले. तोडमल हा ठेकेदार कोव्हीड मध्ये वारला त्याची 3 लाख 62 हजार बाकी आहे. ती सुध्दा दिली नाही.ठेकेदार काम करायला तयार होत नाहीत त्यांची बिले लवकर दिले पाहिजे.

नगरसचिव श्री.तडवी : दोन तीन दिवसांपूर्वी चेक दिला आहे.

मा.श्री.कुमार वाकळे : बिल्डरने बांधलेल्या प्रॉपर्टीना नळ कनेक्शन नविन भागात पाईपलाईन कशी टाकायची हे कायद्यात बसवून करा.

मा.सौ.पुष्पा बोरुडे : सर्व पदाधिका-यांना वाहन प्रतिपूर्ती मंजुर करावी. त्यांना नागरिकांपर्यंत पोहोचावे लागते.

मा.श्री.कुमार वाकळे : विषय क्रमांक 27  माहिती पाहीजे ती जागा कोठे आहे. एरिया कोठे आहे.

इंजिनियर श्री.बल्लाळ : साईदिप हॉस्पीटल शेजारी विराज कॉलनीचे पालिकेच्या लेआउट मधला ओपन स्पेस आहे.

मा.श्री.कुमार वाकळे : त्यांच्या हॉल मध्ये दुस-याला कार्यक्रम करता येईल का. अशी समाजाला जागा देता येते का ?

इंजिनियर श्री.बल्लाळ : यापुर्वी दिलेली आहे. पुर्वीचे ले आउट मध्ये जागा आपल्या मालकीच्या झालेल्या आहेत. 2020 च्या आगोदरच्या ले आउट मध्ये देता येईल. नंतरची मालकी ले आउट धारकाकडे जाते.

मा.श्री.कुमार वाकळे :जागा मागणीसाठी कोणती कागदपत्र देणे आवश्यक आहे.

ले आउटची कॉपी व संख्या  काय अक्टीव्हीटी करतात ही कागदपत्र आवश्यक आहेत .

.आयुक्त साहेब : विद्युत विभागाकडे आपण मागीतलेली  एलईडीची माहिती मी द्यायला सांगीतले आहे जोशी होते त्यांना कोरोना झाला त्या विभागात आजून काम करायला अधिकारी नाही.

मा.श्री.आसीफ सुलतान : संबंधित ठेकेदार आम्हाला पैसे मागतो.

मा.आयुक्त साहेब : वायर वगैरे द्यायचे काम महानगरपालिकेचे आहे फक्त फिक्चर तो लावणार आहे. 9500-10000 लाईट लावून झाले आहेत. जर लक्स मध्ये फरक दिसला तर दंडात्मक कारवाई 100 % करतो. पूर्वीच्या लक्स पेक्षा कमी जर लावले तर 100% कारवाई करतो. महानगरपालिकेचा 85% आस्थापना खर्च आहे तो कमी होत नाही तो पर्यंत नवीन पद भरती करता येणार नाही.

मा.श्री.आसीफ सुलतान : इलेक्ट्रीक विभागात माणूस नाही तो बंद करुन टाका एमएसईबी कडे देवून टाका कोटयावधीची उधळपट्टी चालू आहे. आमचे छोटे छोटे कामे होत नाहीत.

उपमहापौर श्री.गणेश भोसले : आता पुढचा विषय घ्या आसिफ सुलतान यांनी विचारलेल्या प्रश्नांची लेखी उत्तर देण्यांत येतील.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : पाणी पुरवठा अमृत योजनेचे जे काम पाहतात त्यांना बोलवा.

मा.श्री.अनिल शिंदे : 27 नंबरचा जो विषय आहे 1174.87 चौ.मी. मध्ये 12643 होती तो प्लॉट देतो या ठिकाणी आत्तापर्यं ब-याचशा संस्थांनी मागणी केली त्यांना आपण ओपन स्पेस दिले आपण ले आउट मंजूर करतो.कोणी पहाणी करतो का त्या ठिकाणी . ओपन स्पेस

1 रुपया नाममात्र दराने जागा नावावर करतो.

नगररचनाकार श्री.चारठाणकर : 2500 ओपन स्पेस पैकी 1200 ची नांव लागले आहे. जुन्या हद्दीतील ले आउट ट्रान्सफर झाले नाहीत. बाकीच्यांची प्रोसेस चालू आहे.

मा.आयुक्त साहेब : चेंबर झाकणा बाबत माहिती देतो. नव्याने बनवून घेतले प्रशासन काहीच करत नाही अशी भूमीका घेवू नये.

मा.श्री.अनिल शिंदे : चांगल्या लोकेशनच्या जागा आपण कोणाला देवून मोकळे होतो. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे कोणीतरी बघणार आहे कि नाही. कमिटी करा. सर्व्हे करा 5000 हजाराच्या पुढे भाव आहे त्या ठिकाणी कोणीतरी पाहते का. आपले हित पाहीले पाहिजे त्या ठिकाणी गाळे काढून उत्पन्न मिळू शकते. हे शहर उद्याच्या काळात बदलणार का नाही. मोक्याच्या ठिकाणी कॉम्प्लेक्स बांधुन मिळू शकते. सभागृहात जागा देवून मोकळे व्हायचे. आयुक्त साहेब तुम्ही  पाण्याचे काम चांगले केले आहे. आनंद नगर मध्ये 10-12 घरासाठी पाईपलाईन टाकायचे आहे त्याठिकाणचे ड्राईंग मध्ये तो भाग आहे. मग त्या ठिकाणचे पाईप कोठे गेले. रस्ते 3 त्याठिकाणी मंजूर झाले आहेत. पण ते करता येत नाही. एस्टीमेटमध्ये पाईप धरलेले आहेत मग ते उपलब्ध का होत नाही.

मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम : अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेत जे ड्राईगमध्ये धरले त्या ठिकाणी पाईप लाइन टाकण्यात आल्या आहेत. वाढीव भागात काही संदस्यांचे पत्र आल्यानंतर तांत्रिक मंजूरी घेवून त्या ठिकाणी पाईप लाईन टाकण्यांत येत आहे.अस्तित्वाच्या भागात 40 मीटर किंवा 80 मीटर राहिला आहे. हाच प्रकार आनंदनगर मध्ये आहे. तो राहुन गेला आहे. या प्लॅनमध्ये आहे त्याठिकाणी ठेकेदाराला टाकावेच लागणार वाढीव भागात पाईपलाईन ठेकेदार टाकू शकत नाही.

मा.आयुक्त साहेब : फेज-2 च्याबाबतीत पाहिले गेले तर 8 ते 10 वर्ष या योजनेचे काम चालु आहे मी पदभार घेतल्यानंतर वारंवार  आढावा घेवून पाणी पुरवठा योजना पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केला आहे. 800 ठिकाणी जॉईन्ट जोडून झाले आहेत. त्याठिकाणी जॉईन्ट जोडल्या शिवाय पाणी सोडू शकत नाही.

मा.श्री.कुमार वाकळे : फेज-2 अतिशय चांगले काम माझ्या वॉर्डात झाले. पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन नागरिकांनी घेतले, नविन ठिकाणी लाईन टाकणे आवश्यक आहे. त्या बाबतचा निर्णय घ्यावा. माझ्या प्रभागात  15 ते 20 फुट पाणी उडले आहे. तुमच्या सर्वांचे आभार.

मा.आयुक्त साहेब : गॅप काढायचे काम केले पाणी जोपर्यंत टाक्यातुन सोडत नाही ते 10-20%  काम बाकी आहे,ते झाल्याशिवाय फेज-2 चालू करु शकत नाही याचा पुढचा टप्पा जी.एस. मधुन ESR मध्ये कसे भरायचे मी पाणी पुरवठा विभागाला आदेश दिले. पाणी कसे

डायरेक्ट भरता येईल. याबाबत पाणी पुरवठा विभागास आदेश दिले. ज्या ठिकाणी नविन भाग वाढला स्वतत्र एस्टीमेट बनवावे  लागेल. ठेकेदार काम करणार नाही.

मा.श्री.अनिल शिंदे : 25 वी घटना दुरुस्ती झाली त्यामध्ये शेवटच्या घटकापर्यत न्याय मिळाला पाहिजे.अशी तरतुद केलेली आहे.

मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम : उपनगरात काही ठिकाणी वस्ती वाढल्या त्या ठिकाणी नाही करता येणार. स्वतंत्र वेगळा निधी करावा लागेल. पाईपची लेंथ संपली आहे.

उपमहापौर श्री.गणेश भोसले : कुठे कुठे टाकायचे त्याचे पत्र घ्या व त्याचे एस्टीमेट बनवा.

मा.श्री.अनिल शिंदे : 1300, 7/12 वर नांव लावायचे शिल्लक आहे ते किती दिवसात करणार श्री.पठाण यांनी काम केले 750 एकर जागा महानगरपालिकेच्या नावावर त्यांनी करुन दिली. आयुक्त साहेब यांनी ओपन स्पेसची पाहणी करावी काही ठिकाणी विट भट्टया झाल्या आहेत.

नगररचनाकार श्री.चारठाणकर : पूर्ण यादी 8 दिवसात देतो.

मा.श्री.अनिल शिंदे : पुढच्या सभेपर्यंत द्या.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : अमृत योजने बाबत द्या

इंजिनिअर सातपुते - 2017 ला 107 कोटी वर्क ऑर्डर दिली. महापौर बाबासाहेब वाकळे यांच्या काळात 80% काम पूर्ण झाले जागा ताब्यात घेणे, कोर्टाची अडचण असणारी प्रकरणे, यात वेगवेगळे  शेततळे होते, घरे होते विळदला टेस्टींग केली.

मा.श्री.अनिल शिंदे : वर्क ऑर्डर कोणाच्या काळात दिले. सुरेखा कदम यांच्या काळात काहीच काम झाले नाही का. त्यांचे नांव घ्याना.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : काम किती बाकी आहे.

इंजिनियर श्री.सातपुते : अमृत कार्यक्रमा अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेचे काम मे. शोनन इंजिनिअरींग प्रा.लि.पुणे मार्फत प्रगती पथावर आहे. सदर काम 88 टक्के पर्यत पूर्ण झालेले आहे. योजनेच्या अशुध्द पाणी गुरूत्ववाहिनीचे मुळाड■ ते विळद जलशुध्दीकरण केंद्रा पर्यतचे काम सर्व अडथळे मनपा मार्फत दूर करण्यात येवून पूर्ण झालेले आहे. विळद जलशुध्दीकरण ते वसंतटेकडी पर्यत मार्गातील बहुतेक अडथळे मनपा मार्फत दूर करण्यात येवून 16050 मीटर लांबीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरित पाईप लाईन टाकण्याचे काम जागा उपलब्धतेनुसार प्रगतीपथावर आहे. तथापी उर्वरित लांबीपैकी सुमारे 825 मीटर लांबीचे काम पूर्ण करणे अदयाप अडथळयामुळे बाकी आहे. विळद जलशुध्दीकेद्राजवळ श्री रवि चव्हण यांचे जागेतील सुमारे 65 मीटर लांबीचे काम , कातोरे प्लॉट कार्यक्षेत्रात श्री कांडकर यांनी दोन ठिकाणच्या आरसीसी चेअर्स सह नाला क्रासिंगचे

काम करण्यास विरोध दर्शविला आहे, श्री.गिते यांच्या मालकीच्या कार्यक्षेत्रातील किमान 250 मीटर लांबीच्या कामाबाबत सहमती प्राप्त नाही, श्री.डोंगरे यांच्या मालकीच्या कार्यक्षेत्रातील 120 मीटर लांबीचे काम, औरंगाबाद बायपास जवळील खाजगी शोरूमच्या मालकी क्षेत्रातील 20 मीटर लांबीचे काम, श्री.शेळके यांच्या संत्राबाग हद्दीतील 200 मीटर लांबीचे काम करण्यास अदयाप सहमती प्राप्त झालेली नाही. सुखकर्ता कॉर्नर जवळ 80 मीटर लांबीचे काम कायम स्वरूपी बांधकामामुळे करता आले नाही. . खाजगी जागा मालकांनी विरोध दर्शविल्याने सदर काम प्रलंबित आहे. 1200 मीटर काम बाकी आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : 1200 राहीलच नाही कमी राहीले.

इंजिनियर श्री.सातपुते : डॅम ते विळद पर्यंत पूर्ण

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : विळद पाण्याची टाकी पासून 22 मीटर काम शिल्लक आहे रवि सातपुते, चव्हाण जागेचा मोबदला मागतो.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : एखाद्याचा 7/12 नसेल तरी काम तुम्ही थांबवता थांबवू नका. चार वेळा मुदतवाढ दिली तुम्ही कामे मागे का ठेवता कोणाचा हितसंबंध आहे का. का शहराला वेठीस धरले जाते. आपली संस्था आहे आपण जागेवर का जात नाही.

इंजिनियर श्री.सातपुते : 1200 मीटर पै 600-700 मीटरचे काम बाकी आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : आपण किरकोळ प्रश्न सोडवत नाही. धरणात पाणी आहे तरी आम्हाला पाणी मिळत नाही. नागरीक असे प्रश्न विचारतात शहराला पाणी मिळत नाही सर्वाच्या वॉर्डातला प्रश्न आहे.

इंजिनियर श्री.सातपुते : जागे बाबत अडचण नाही.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : किती दिवसात पूर्ण होईल ते आयुक्त यांनी सांगावे 700 मीटरचे काम बाकी आहे. पीएमसी ते पंप हाउसवर मोटर धरली का.

मा.आयुक्त साहेब : योजनेमधला जो पंपाचा गॅप आहे. मंगळवारी मी प्रधान सचिवाकडे जाणार आहे.एस एल टी सी ची बॅठ्क जर पुढच्या आठ ते दहा दिवसात लागली व मंजुरी मिळाली तर पंप येण्यासाठी दोन ते अडीच महिने लागतील.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : ट्रान्सफॉर्मर आहे का घेतला पाहीजे. केबल टाकली पाहीजे.

मा.आयुक्त साहेब : 1500 चा लोड आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : पीएमसी ला कळाले नाही का त्यांच्या ही बाब लक्षात यायला हवी होती. नविन पंप बसवावा लागेल. त्याठिकाणी ट्रान्सफार्मर, केबल बसवाव्या लागतील एवढया दिवसात पुर्तता व्हायला पाहिजे होती ;;;;;;;;

मा.आयुक्त साहेब : एस एल टी सी ची मिटींग झाल्यानंतर मंजुरी मिळाल्यानंतर पंपाची ऑर्डर दिल्या नंतर मॅक्झीमम एप्रिल पर्यंत पाणी येईल

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : यात जे कोणी इंजिनियर दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करा.

इंजिनियर श्री.सातपुते :पाईप पुरवठा झाल्यानंतर 20 ते 22 दिवसात पाईप टाकुन देवू.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले : तुम्ही स्वत: उभे राहुन काम करुन घ्या

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : एक महिन्यात 600-700 मीटर पाईपलाईन टाकुन झाली पाहीजे नाहीतर तुम्हाला जबाबदार धरु.

प्रतिनिधी SLTC मंजूर झाल्यानंतर अडीच तीन महिन्यात पंप येतील. 10 दिवसात बसवू.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : 3 महिन्यात पाणी येईल अशी सभागृहात माहिती द्या.

मा.आयुक्त साहेब : SLTC च्या मंजूरीनंतर तीन महिन्यात पाणी येईल. आपल्याला माहिती आहे. किलोस्करचे पंप चांगले आहेत. SLTC ची मंजूरीनंतर शासन 4-5 कोटी देणार आहेत. त्यामुळे काम थांबवले आहे. विळद मुळा डॅम, वसंतटेकडी वर मीटर बसविले जाणार आहेत. कोणीही पाहू शकतो. पाणी कीती वाढले. डिस्ट्रीब्युशन मधल्या चुका सुधारल्या शिवाय सर्वांना पाणी मिळणार नाही यासाठी कनेक्शन घेणे गरजेचे आहे. दोन्ही लाईन काही ठिकाणी चालू आहे. राजकीय विरोध घेवून मी आगरकर मळयात मी एक लाईन बंद केली.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे : 15 दिवसात याबाबत बैठक घ्या. अडचणी असल्यास त्यावर निर्णय घेण्यात यावा.

मा.महापौर साहेब : विषय क्रमांक 27 ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मा.सौ;बारस्कर : नगरसेवक स्वेच्छा निधी कॅश केला त्याबाबत माहिती द्या. कॅशफंड नसेल ठेकेदार काम करत नाही.

श्री.अनिल लोंढे : 2021-2022 या आर्थीक वर्षात माननीय नगरसेवक स्वेच्छा निधी रोख स्वरुपात देण्यात येईल. असा निर्णय घेण्यात आला होता परंतु प्रशासनाकडून याबाबत आर्थिक परिस्थिती पाहून निर्णय घेण्यांत येईल.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले : नगरसेवक स्वेच्छा निधीतील ठेकेदाराचे पैसे द्या.बाकी सगळे स्टॉप करा.

अकौंटट श्री.तडवी : हो.

मा.सौ.दिपाली बारस्कर : यावर्षी नगरसेवक स्वेच्छा निधी रोख वाटणार का.

मा.महापौर साहेब : वाटणार. पुढचा विषय घ्या.

मा.श्री.अनिल शिंदे : स्वेच्छा निधी अंतर्गत बारस्कर ताईंनी प्रश्न उपस्थित केला मागील सभेत ठराव केलेला आहे. एक कोटी 85 लाख मुद्रांक शुल्काचे पैसे आले ते काय

केले. तुम्ही म्हणता पैसे नाही. मग आम्हाला पैसे द्या. आपल्यावर काय कोणाचे कर्ज आहे का. 55 कोटी ठेवी आहेत. मुद्रांक शुल्कातुन द्यायला सांगा.

उपायुक्त श्री.डांगे साहेब : 6 कोटी लाईट बील द्यायचे बाकी आहे.

मा.आयुक्त साहेब : 2 कोटी पाणी बील द्यायचे.

मालमत्ता कर 45 कोटी वसुल केले.

मा.श्री.अनिल शिंदे : नगरसेवक स्वेच्छा निधी रोख़ होण्याबाबत ठराव करा. लाईट बील वगैरे देवू नका.

मा.श्री.सचिन शिंदे : दोन तीन उपायुक्त आहेत. त्यांच्याकडे वसुलीची जबाबदारी द्या.

उपायुक्त श्री.डांगे साहेब : 13 कोटी रुपये स्थायी खर्च आहे. तो द्यावाच लागणार आहे.

मा.श्री.अनिल शिंदे : उत्पन्नाकडे लक्ष देणार नाही का. तुमची जबाबदारी नाही का घरपट्टी व पाणीपट्टी वसूल करण्याची.

उपायुक्त श्री.डांगे साहेब : दरवर्षी घरपट्टी व पाणीपट्टी मिळून 50 कोटी वसूल होतात. यावर्षी मार्च 2022 पर्यंत 70 कोटी वसूल करणार आहोत.

मा.श्री.अनिल शिंदे : सौ.स्मिता झगडे मद्यम उपायुक्त होत्या त्यांनी एका वर्षात 85 कोटी वसूल केले.

मा.आयुक्त साहेब :आता पर्यंत हायस्ट 59 कोटी आहे. कारवाई सुरु केली तर आम्हाला फोन यायला लागले आम्हीच दिसतो का.

मा.श्री.अनिल शिंदे : सरकारी कामात अडथळा आणला तर कारवाई करा.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले : कालपरवा पेपरला आले भाउगर्दीच्या भांडणामध्ये कोटी अडकले तीन भाउ असतील तर त्यांचे नावे समान घरपट्टी टाका. जो त्याचे हिश्शाची घरपट्टी भरायला तयार असेल त्याचे भरुन घ्या समान हिस्से करुन भरुन घ्या. भावांच्या भांडणात महानगरपालिकेसे पैसे अडकले आहेत.

मा.श्री.अनिल शिंदे :आयुक्त साहेबांनी अमृतचे चांगले काम केले त्याबद्दल आपले अभिनंदन. मी सन 2003 पासून नगरसेवक आहे. तुम्ही जसा पाणी प्रश्न सोडवला तसे डांगे साहेब राउत साहेब यांना कामाला लावा. आला दिवस असा चालला कामावर यायचे टायमिंग ठेवा. 12 ला यायचे 6 वाजता घरी जायचे.

मा.श्री.कुमार वाकळे : विषय क्रमांक 28,29,30,31 विषयांचे वाचन केले हा विषय या संदर्भातील अधिकारी असतील तर संबंधित अधिकारी यांना व्यासपीठावर माहिती देण्यासाठी बोलवा. स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांचा विषय 2007 चा, हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणेचा विषय 2016-2017, माळीवाडा वेस येथील महात्मा ज्योतीबा फुले यांचा अर्धाकृती पुतळ्याच्या जागी पुर्णाकृती पुतळा

बसविणेचा विषय जूना आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकती पुतळा बसविणेचा विषय जुना आहे. महानगरपालिका आयुक्त व प्रशासनाला विनंती कशामुळे प्रशासनाला वेळ लागला.

शहर अभियंता श्री.इथापे : कुमार भाऊंनी जे 28, 29, 30, हे विषय उपस्थित केले त्याबाबत खुलासा करतो. स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती ब्रॉंझ पुतळा प्रोफेसर कॉलनी चौक येथील न र यो क अंतिम भुखंड क्र . 129 मनपाच्या जागेत बसविणे कामी स्थापन झालेल्या समितीनुसार दिनांक 18/08/2021 रोजी झालेल्या पुतळा समितीच्या समितीच्या बैठकीत 2 मे 2017 मधील शासन निर्णय मार्गदर्शक तत्वातील मुद्दा क्र. 20 नुसार ठराव व नाहरकत 1 वर्षापेक्षा अधिक कमी असल्याने उपरोक्त विषयी नव्याने ठराव करणे आवश्यक असल्याने आजच्या विषय पत्रिकेवरील 4 विषय घेण्यात आले आहे. यापूर्वी छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती ब्रांझ पुतळा प्रोफेसर कॉलनी चौक येथे उभारणीसाठी मे.एस.बी.परदेशी आर्टस पुणे यांचेकडून तयार करण्यात आलेला आहे. व त्यांना त्यापोटी रू.8 लक्ष देण्यात आलेले आहेत.

हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारती समोरील जागेत बसविणेस मा.महासभा ठराव क्र. 10 दि. 25/6/2019 अन्वये मंजूरी दिलेली आहे. तदनंतर नगररचना विभागाची नाहरकत घेवून आर्किटेक्ट मनोज जाधव यांना अदांजपत्रक, संकल्पचित्र , चबुत-याचे आराखडे, पुतळयाचे लाईन प्लान इ. तयार करून सादर करणेस पत्र दिलेले आहे. परंतु अदयाप त्यांचेकडून प्रतिसाद मिळालेला नाही. तसेच मुख्य वास्तुशास्त्रज्ञ मुंबई यांना दि. 11/7/2019 रोजी पुतळा उभारण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याचे विंनती पत्र दिले आहे. अदयाप त्यांचीही परवानगी मिळालेली नाही. त्याचप्रमाणे मा.पोलिस अधिक्षक अहमदनगर यांना स्मरणपत्र देवून पुतळा बसविणेस नाहकरत प्रमाणपत्र दिले असता त्यांनी दिनांक 3/7/2020 रोजी पुतळा उभारण्या संदर्भात मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करावा त्याबाबत मा.जिल्हा अधिकारी यांनी पोलिस अधिक्षक अहमदनगर यांना अहवाल मागितले तर चौकशी अंती नाहरकत देणे बाबत कार्यवाही करणेत येईल. असे कळविले असता त्यानुसार दि. 28/6/2020 रोजी मा.जिल्हाधिकारी यांना परवानगी दिले असता. मा.जिल्हाधिकारी यांनी दि. 4/9/2020 रोजी कागदपत्रांची पुर्तता करून परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेस कळविले असता त्यांचेकडे 5 प्रमाणपत्रासोबत जोडून पत्र दिले असता मा.जिल्हाधिकारी यांनी दि. 3/6/2021 रोजी परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेस कळविले आहे. मा.जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविलेल्या पुर्ततेंबाबत कार्यवाही सुरू आहे.

मा.श्री.कुमार वाकळे : महानगरपालिकेला दर सभेमध्ये तेच बोलता मागच्या सभेत व या सभेत काय वेगळे उत्तर दिले. इतर शहरात रस्त्यावर पुतळे बसविले आपली मानसिकता

असेल तर ते निश्चीत बसवू शकतो. सर्व पुतळया बाबत नगरवासियांची भावना लक्षात घेता 4-4 वर्ष झाले आम्ही बोलतो एक एक वर्ष मंजूरीला लागले या शहरामध्ये इमारतीचे वैभव वाढणार आहे. शहराचे वैभव वाढणार आहे. अधिका-यांची मानसिकता अशी का नाही. जी कारवाई झाली याला जबाबदार कोण का कोणी सांगीतले हे पुतळे बसवायचे नाहीत. महिना भरात जर पुतळयांच्या बाबतीत अक्शन घेतली नाही तर महानगरपालिकेच्या इमारतीत पुतळा बसवू. राउत साहेबांनी एक वर्षाच्या आत पुतळा बसविला नाही तर तो ठराव रद्द ठरतो असा शोध लागला. राउत साहेबांना माहिती आहे ती इतर अधिका-यांना माहिती नाही का. प्रशासन यापुर्वी खोटी माहिती देत होते का.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे : लगतच्या एक वर्षातील ठराव पाहीजे जुना ठराव बाद झालेला नाही.

मा.श्री.कुमार वाकळे : छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती संभाजी महाराज या पुतळयांना एवढा विरोध का. पुतळे बसवू शकत नाही त्याबाबतीत एवढी नालस्ती होते. शिवप्रेमी, भिमप्रेमी चळवळीतील लोक बोलतात प्रत्येक नगरसेवक मानधन द्यायला तयार होते. पुण्यात रस्त्यावर पुतळे बसविले. आपल्या शहरात सगळे दंगलीचे लोक आहेत का. रस्ता, पाणी, लाईट या गोष्टी चालू राहणार महान पुरुषांचे पुतळे आपण बसवू शकत नाहीत. तर यापेक्षा वाईट गोष्ट नाही. कुठेतरी याबाबतीत विचार व्हायला पाहिजे. सर्वांना महापुरुषांचा गर्व आहे. सर्व नगरसेवक खर्च करतील. मला ठराव द्या 1 रुपया खर्च करु नका. तुम्ही जर हा पुतळा बसवला नाही तर एक महिन्यात नियोजीत जागेवर जावून आम्ही पुतळे बसवू. आपण दोन नंबरचे धंदे करतो का.? छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा मुख्य प्रशासकीय इमारतीतील कंम्पौडमध्ये असणार आहे. या ठिकाणी सुरक्षितता आहे. सिक्युरिटी गार्ड आहे. मग अडचण काय आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयासाठी आमदार साहेबांनी स्टॅण्ड समोर जागा मागीतली आहे.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले : विरोधी कोणी केला नाही.

मा.श्री.कुमार वाकळे : आज जर ठराव केला तर पुन्हा एक वर्षाने बाद होणार आहे. एक वर्षात जर पुतळे बसविले नाही तर संबंधित अधिका-यांची जबाबदारी निश्चीत करुन कारवाई करा.

मा.श्री.कुमार वाकळे : सभागृहात जबाबदारी निश्चीत करुन एक वर्षात पुतळे बसविले गेले पाहीजे.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले : लवकरात लवकर बसवू.

मा.महापौर साहेब : विषय मंजूर पुढील विषय घ्या. विषय क्रमांक 32 मंजूर. विषय क्रमांक 33 मंजूर.

मा.आयुक्त साहेब : क्ले मॉडेल अंतिम करण्यासाठी एसपी ऑफिसरची ची एनओसी लागते एसपी ऑफिसचे म्हणणे जिल्हाधिकारी यांनी कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याशिवाय शिवाय बसवू शकत नाही मा.आमदार साहेबांना मी ही बोललो आहे. महिना दोन महिन्यात पुतळा बसविणेकामी आवश्यक ती पुर्तता केली जाईल.

मा.महापौर साहेब : विषय मंजूर पुढील विषय घ्या. विषय क्रमांक 34 ; 35

मा.श्री.कुमार वाकळे : अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाचे घाट उत्तरप्रदेशमध्ये बांधले. जेजूरी असेल विकासासाठी पैसे त्यांनी दिले. जंगलतोडी, रस्ता बंदीचा कायदा आणला. पतीच्या निधनानंतर मोलाचा वाटा त्यांचा आहे. त्यांचा जन्म चौंडी या गावी झालेला आहे. हे आपणांस भुषणावह आहे. पत्ता सांगण्यास अडचण येत होती. त्यामुळे आरोग्य केंद्रास अहिल्यादेवी होळकर यांचे नांवे द्यावे. त्यांच्या कार्यास फुल ना फुलाची पाकळी म्हणून आपलेही योगदान राहील. नागापूर बोल्हेगांव प्रभाग क्र. 7 या भागातील आंबेडकर चौक येथील आरोग्य केंद्रास **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आरोग्य केंद्र** असे नांव द्यावे अशी मी बोल्हेगांव नागापूरकरांच्या वतीने विनंती करतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांचे कार्यकिर्दीत सुशासन राबविले. मोठी धरणे बांधली. स्वराज्याच्या रक्षणासाठी किल्ले बांधले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात शेतक-यांना बिन व्याजी कर्ज मिळत होते. धान्य वाटप होत होते. धान्य पिकवून त्यातुन कर्ज फेड होत होती. सामाजिक सलोखा ठेवला जातो. जाती व्यवस्था रद्द केली. कसेल त्याची जमिन हा कायदा इ शिवाजी महाराजांनी काढला. त्यांचे या कार्यातून आपण उतराई होवू शकत नाही. येणा-या नविन पिढीला आदर्श मिळाला पाहीजे. यासाठी नागापूर बोल्हेगांव प्र.क्र. 7 या भागातील जिल्हापरिषद शाळा केशव कॉर्नर ते सोनवणे वस्ती ते शंभूराजे चौक ते गणेश चौक ते बोल्हेगांव फाटा या मुख्य रस्त्याला **'छत्रपती शिवाजी महाराज मार्ग** असे नांव देण्याबाबत ठराव मंजूर करावा ही विनंती

मा.श्री.मदन आढाव : छत्रपती शिवाजी महाराजांचे नांव द्यावे आम्ही पत्र दिले होते.

मा.श्री.अशोक बडे : हा जो विषय आहे त्यात आपल्या सर्वांचे पत्र आहे एक जागा फिक्स करुन मार्बल वगैरे लावावे. 2017 साली आरोग्य केंद्र मी मंजूर केले.

मा.महापौर साहेब : पुढचा विषय घ्या.

विषय क्रमांक 32 चे वाचन

उपायुक्त श्री.डांगे : 14 व्या वित्त आयोगातून 7.5 कोटी व्याज जमा झाले. कोव्हीडच्या दुस-या लाटेसाठी 2 कोटी 69 लाख खर्च प्रस्तावित, अंत्यविधी 47.73 लाख खर्च,

एमआरआय सेंटर बसविणेसाठी 50 लक्ष तरतुद केली खर्च, बाधीत रूग्णांचे फोन मट्टींगसाठी 25 लाख खर्च केले. कोव्हीड डेटासाठी फेब्रुवारी पासून मे पर्यत 41 लाख खर्च केला.

मा.श्री.शाम नळकांडे : स्वच्छता निरीक्षक किती आहेत.

उपायुक्त श्री.डांगे : आठ स्वच्छता निरीक्षक आहेत.

मा.श्री.शाम नळकांडे : आठ ने काय होते. बाह्य यंत्रणेमार्फत उपलब्ध करुन घेतले. वाहन खरेदी केले. शासनाचा डीपीआर मंजूरी नंतर आपण वाहने खरेदी केली.

उपायुक्त श्री.डांगे : 7 कॉम्पपक्टर होते. कचरा संकलन वाहतुकीसाठी आऊट सोरसिंगद्वारे टेंडर दिल्याने कम्पपक्टर घेतले नाहीत.

मा.श्री.शाम नळकांडे : ठेकेदाराने ठेका बंद केला मग आपण ठेंकेदाराला कॉम्पपक्टर मागायचे का. एकच कॉम्पपक्टर घेतला. गाड्या का घेतल्या. कचरा गाड्या जर कचरा गाड्या प्रत्येक प्रभाग समितीला एक कॉम्पपक्टर गेला असता डीपीआर मध्ये बदल करु नका. तुम्ही वजनकाटा कधी बसविला .

उपायुक्त श्री.डांगे : डिसेंबर मध्ये बसविला आहे. .

मा.श्री.शाम नळकांडे : लवकर जर बसविला असता तर दररोज जो 135 टन कचरा जमा होतो त्यावेळी कोव्हीडमुळे शहर बंद होते. काटा वेळेवर बदलला असता तर चुकीचे बील त्याला गेले नसते. संबंधित अधिका-यावर दप्तर दिरंगाई कायदयाखालील कारवाई करण्यात यावी. जानेवारी 2020, फेब्रुवारी 2020 83 लाखाची जी बीले काढली अशी ठेकेदाराची यादी देण्यांत यावी.

मा.श्री.मदन आढाव : दिनांक 20 मे 2019 ला मनपा बंद होती त्या चार दिवसांचे बील काढले.

उपायुक्त श्री.डांगे : 19 नोव्हेंबर 2019 ला ठेका दिला.

मा.श्री.शाम नळकांडे : उद्या जर ठेकेदाराने ठेका सोडून दिला तर. वजनकाटा लवकर बसवला असता तर 120 टन कचरा जमा होतो 4.5 लाख रुपये रोज आपण ठेकेदाराला देतो. तो जर सोडून गेला आपले वाहने असतील तर तो आपण स्वतः उचलू शकतो. आपले ते वाहने डीपीआर मध्ये मंजूर आहेत. ती लवकरात लवकर खरेदी करण्यांत यावी. बिगारी नाही एक जेसीबी महानगरपालिकेकडे नाही. उद्या जर काही झाले तर कोणाला जबाबदार धरणार

मा.आयुक्त साहेब : कोरोना मुळे बंद असतांना कच-याचे बील काढले याबद्दल माहिती देतो. नोव्हेंबरला तो ठेका दिला. त्यांचे अगोदरचा कचरा मोठया प्रमाणात निघाला असे सांगीतले. त्याचे कारण असे की कोरोनामुळे बाजारपेठ बंद असली तरी घरोघरचा कचरा नागरिकांनी वाहनात जमा केला. कचरा निर्माण होण्याचे प्रमाण कमी होत नाही. कचरा दुकानात नियमीत तयार होतो. डीपीआर मध्ये वाहने घ्यावीत या मताशी मी सहमत आहे.

आपण सांगीतलेल्या सूचनांचा विचार करु.

मा.श्री.शाम नळकांडे : आपण जर वजनकाटा वेळेत घेतला असता तर कच-याचे वजन चोरीचे प्रमाण झाले नसते. या बाबत जबाबदारी निश्चीत करा.

मा.आयुक्त साहेब : वेळोवेळी कच-याचे वजन केले जाते.

मा.श्री.शाम नळकांडे : येणा-या प्रत्येक बीलातुन भाडे वसूल करण्यांत यावे. एक ते 1.25 कोटी वसूल होणे अपेक्षित होते. 51 ते 75 लाख वसूल झाले आहेत. निविदेमध्ये ठरल्याप्रमाणे येणा-या बिलातुन पैसे वसूल करावेत. वजनकाट्याला उशीर का झाला याबाबत महापौर यांनी माहिती द्यावी. यास जबाबदार असणा-यांवर दप्तर दिरंगाई ची कारवाई करा.

मा.आयुक्त साहेब : खुलासा मागवतो.

मा.श्री.गणेश कवडे : 13 तारखेला कोंडवाडयातील जनावरांचा लिलाव ठेवला आहे.

उपायुक्त श्री.डांगे : पारंजरापोळला द्यायला कॉटॅक्ट केला ते घेवू शकत नाही. शेतकरी जर आले तर आपण देवू.

मा.श्री.गणेश कवडे : महाराष्ट्र प्रिझरव्हेशन अक्ट साठी आपण देवू शकत नाही. सध्या महाराष्ट्रात गोहत्या बंदी चालू आहे. यातुन काही घटना घडू शकते. संबंधित जे काही जनावरे असतील संबंधित गोशाळांना द्या. फौंडेशन घ्यायला तयार असतील तर त्यांना द्या. 13 तारखेचा लिलाव रद्द करा.

उपायुक्त श्री.डांगे : ठिक आहे.

मा.श्री.संपत बारस्कर : ढवणवस्ती लेखानगर, पाण्याचा प्रचंड विस्कळीतपणा झाला आहे त्या लोकांना पाणी येत नाही. विस्कळीतपणा जादा झालेला आहे. लोकांचे पाण्याचे प्रश्न आहेत. पाणी नेमके जाते कुठे. हा विस्कळीतपणा थांबणार आहे कि नाही.

इंजिनियर श्री सातपुते : ढवणवस्ती पाणी प्रश्न संदर्भात आयुक्त साहेब यांचे दालनात चर्चेनुसार 36 लाखाचे एस्टीमेट तयार केले.आहे नविन बजेटमध्ये निधी मंजूर झाल्यानंतर निविदा मंजूर केली जाईल

मा.श्री.संपत बारस्कर : पाणीच नाही मग लाईन टाकून काय उपयोग. नागरिकांना अर्धा तास फोनवर उत्तर द्यावे लागतात. ठेकेदारांचे बिल निघत नाही.

इंजिनियर श्री सातपुते : अमृतचे जेंव्हा पाणी वाढेल तेंव्हा मार्ग निघेल. एरिया वाढत चालला त्यामुळे पाणी कमी पडते. लोकसंख्या वाढत आहे.

मा.श्री.संपत बारस्कर : महिन्या भरापुर्वी पाणी चांगले येत होते. आता का येत नाही. मग बंद कसे झाले.

मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम : ढवणवस्ती निर्मलनगर वसंतटेकडी या परिसरासाठी जुन्या टाकीतुन तेथील उंच टाकीत पंपाचे पाणी घ्यायचो आता नविन टाकी चालू केली.

पीएमसीने सांगीतलेल्या नुसार पंप बसविले पण डिस्चार्ज मिळत नाही. उंच टाकीत पाणी घेवून ढवणवस्तीला पाणी मिळू शकते.

मा.आयुक्त साहेब : जुन्या ईएसआर मधुन पाणी जाणे बंद आहे. नविन ईएसआर केला. पुर्वीच्या ईएसआर मध्ये पाईपलाईन खाली होती. त्यामुळे प्रेशर मिळत नाही. असे मला सांगीतले. पंपाचा प्रयोग करु. इतर ठिकाणी पाणी जास्त मिळते त्याबाबत पाहणी करु.

मा.श्री.संपत बारस्कर : पाईपलाईन रोडला रिटनचे पाणी येते. त्याला 24-25 आटे दिले तर प्रोफेसर कॉलनी पर्यतच्या भागास व्यवस्थीत पाणी पुरवठा होवू शकतो.

मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम : रिटनचे पाणी सोडतो. त्याचवेळी नागापूरचा पंप ओव्हर फ्लो होतो. फक्त ढवणवस्ती साठी टाकीतुन पाणी वितरीत करतो. पंप डिस्चार्ज होतो त्यामुळे प्रत्यक्षात पाहिजे तेव्हढे पाणी उपलब्ध होत नाही. त्यासंदर्भात एमजीपीच्या अधिका-यांशी चर्चा केली. 50 एचपीचा आणखी नविन पंप बसविणार आहोत. दोन तीन दिवस लागतील.

मा.श्री.संपत बारस्कर : वॉर्डात काही ठिकाणी वॉल लागतात ते वॉल आले का. वॉल आपल्या कोणी देत नाही. ठेकेदार रडतात.

मा.आयुक्त साहेब : गेल्या सात आठ वर्षात त्यांचे पैसेच दिले नाही. मी आल्यानंतर थोडे थोडे द्यायला सांगीतले 40 कोटी मी एकदम देवू शकत नाही. कॉन्ट्रक्टरला विश्वासात घ्यावे लागते. तेंव्हा ते कामे करतात.

मा.श्री.संपत बारस्कर : लोकांनी सांगीतलेल्या समस्या सोडविल्या पाहीजेत.

मा.श्री.गणेश कवडे : हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंती निमित्त सायकलिंग स्पर्धेचे आयोजन केले आहे. सोशल डिस्टसिंगचे पालन करुन महासभेने सायकलिंगची स्पर्धा घेण्यासाठी मान्यता द्यावी.

मा.महापौर साहेब : ठिक आहे. मंजूर.

उपायुक्त श्री.डांगे : माझी वसुंधरा मध्ये सायकल चालवण्यासाठी प्रोत्साहन द्यायचे आहे तसेच स्वच्छ सर्व्हेक्षण मध्ये हा घटक घेता येईल भुईकोट किल्ल्यावर स्पर्धेचा समारोप करु. टीशर्ट वगैरे देवू.

मा.श्री.सचिन शिंदे : कल्याण रोडला स्पर्धा घ्यायची.

उपमहापौर श्री.गणेश भोसले : क्रीडा अधिकारी यांचेशी आपली चर्चा झाली आहे. त्याप्रमाणे घ्या.

विषय क्रमांक 36

मा.महापौर साहेब : मंजूर.

मा.श्री.मनोज कोतकर : गेल्या दोन महिन्यांपासुन पाण्याची अडचण आहे. इंडस्ट्रीयल

टाकीत जाणारी लाईन वारंवार फुटते 3-4 दिवस लक्ष दिले जात नाही. आम्ही स्वतः किती दिवस लक्ष द्यायचे.

इंजिनियर श्री.सातपुते : स्टाफची कमतरता आहे. त्यामुळे सर्व ठिकाणी पोहोचू शकत नाही

मा.श्री.मनोज कोतकर  सुभद्रा नगर दौंड रोड येथे टँकर चालू आहे. 2 दिवसातुन टँकर पाठवला जातो. लवकरात लवकर पाईपलाईन टाका.

इंजिनियर श्री.सातपुते : बजेटच्या विषयात मंजूरी मिळाली. व निधी मिळाला की, व निधी उपलब्ध झाला की,  लवकरात लवकर टेंडर काढू. रिअप्रोप्रिएशन मध्ये कामाचे नावासह तरतुद आपण मंजूर करुन घ्यावी.

इंजिनिअर सातपुते-  आम्ही मागणी करणार पण तुमची मंजूरी तुम्ही घ्यायची.

मा.श्री.मनोज कोतकर : केडगांवचे पाणी दिवसाआड केले तर बरे होईल.

इंजिनियर श्री.सातपुते : अमृत योजना झाली की सर्व ठिकाणी पाणीपुरवठा होईल.

मा.श्री.अविनाश घुले : अमृतचे योजनेच्या कामात मनोज कोतकर यांचेही नांव घेत जा.

मा.श्री.मनोज कोतकर : मोटरची ऑर्डर दिली का.

इंजिनियर श्री.सातपुते : मा.आयुक्त साहेब यांनी दोन तासापूर्वी माहिती दिली आहे. SLTC च्या मिटींगमध्ये विषय गेलेला आहे.

मा.श्री.मनोज कोतकर -   अनेक महानगरपालिकांनी मोटरची ऑर्डर दिली आहे. 4-5 महिने लागतील मोटर यायला अशी आमची माहिती आहे.

मा.श्री.मनोज कोतकर : दोन महिन्यात जर मोटारी आल्या नाही तर सातपुते साहेब.

इंजिनियर श्री.सातपुते : मी अक्युरेट सांगू शकत नाही. अमृत योजनेचे काम दोन वर्ष झाले चालू आहे. SLTC मंजूरी होणे ती केव्हा मिळेल हे नक्की नाही. पीएमसी ची मदत लागेल. हे टीम वर्क आहे सगळयांनी मिळून जर प्रयत्न केले तर तीन महिने लागतील.

मा.श्री.मनोज कोतकर : अमृत योजना चालू कधी झाली.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले : 2017 साली चालू झाली सातपुते साहेबांनी सांगीतले 3 महिन्यात होईल.

मा.श्री.मनोज कोतकर : तुम्ही कधी मोटरी टाका पण नगर केडगांवाला दिवसाआड पाणी द्या. तुमच्याकडून पाणी वाढवून घेतल्यानंतर सुभद्रा नगरला पाणी देवू शकतो.

मा.श्री.प्रकाश भागानगरे : समर्थनगर शांतीनगर मधील टाकीत पाणी केंव्हा येणार.

मा.श्री.संपत बारस्कर : आमच्या भागाला प्लॅनमध्ये टाकी का नाही.

मा.महापौर साहेब : सर्व विषय मंजूर.